म. ग्रं. सं. ठाणे
विषय ग्रंथ
सं. क्र. 9832
9८८६

# साहित्य-कलह

वा. रा. ढवळे
व. दि. कुलकर्णी

REFBK-0014079
REFBK-0014079

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

# साहित्य-कलश

प्राचीन व अर्वाचीन
निवडक कवितांचा संग्रह

संपादक

**वा. रा. ढवळे**
**व. दि. कुलकर्णी**

REFBK-0014079
REFBK-0014079

महाराष्ट्र-साहित्य-परिषद
टिळक-रस्ता, पुणे २

प्रकाशक :
प्रा. अरविंद मंगरूळकर
चिटणीस, म. सा. परिषद
टिळक-रस्ता, पुणे २

प्रथमावृत्ती :
जुलै, १९६४

मूल्य :
तीन रुपये

मुद्रक :
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस, प्रा. लि.,
२८३, नारायण पेठ, पुणे २

अनुक्रम ३७२६८-वि
क्रमांक १६३२ नों: दि:

मराठी साहित्याच्या चिकित्सापूर्वक आणि व्यापक अभ्यासाला साहाय्य व्हावे, म्हणून महाराष्ट्र-साहित्य-परिषदेने आजपर्यंत काही प्रकाशने सादर केलेली आहेत. ही प्रकाशने वरच्या श्रेणीचा चिकित्सक वाङ्मयाभ्यासक आणि मराठी वाङ्मयाचा सर्वसाधारण परिचय करून घेणारा विद्यार्थी अशा उभयविध जनांसाठी होती. यंदा प्राधान्याने विद्यार्थिगणांना साहाय्यभूत होतील, असे गद्य-पद्य-वेच्यांचे संग्रह प्रकाशित करण्याची एक योजना परिषदेने तयार केली आहे. तिला अनुसरून प्रस्तुत पुस्तक – ' सा हि त्य - क ल श ' – परिषदेसाठी श्री. वा. रा. ढवळे आणि प्रा. व. दि. कुलकर्णी यांनी सिद्ध केलें आहे. या कामी या उभय संपादकांनी जी मेहनत घेतली, त्यासाठी मी परिषदेच्या वतीने त्यांचे अत्यंत मन:पूर्वक आभार मानितो. परिषद त्यांची ऋणी आहे.

'साहित्य-कलशां'त आपल्या कविता समाविष्ट करण्यासाठी वि. दा. सावरकर, यशवंत, अनिल, आचार्य अत्रे, अनंत काणेकर, बा. भ. बोरकर, वि. वि. शिरवाडकर या कविवर्यांनी व व्हीनस प्रकाशन ( माधव जूलियन ), मराठवाडा साहित्य - परिषद ( र. लु. जोशी ), कृ. ब. महाबळ ( कवि गोविंद ), दे. ना. टिळक ( रे. टिळक ), नेर्लेकर बुकसेलर्स (गोविंदाग्रज), श्रीमती पार्वतीबाई ठोमरे ( बालकवी ), भा. चं. गोऱ्हे (चंद्रशखर) म. भा. तांबे ( भास्करराव तांबे ), श्रीमती मालती काटदरे ( माधव ), सोपानदेव चौधरी ( बहिणाई ), या हक्कदारांनी त्यांच्या नावांपुढे कंसांत नमूद केलेल्या कवींच्या कविता या संग्रहांत समाविष्ट करण्यास उदारपणाने परवानगी दिली, तीबद्दल परिषदेच्या वतीने मी त्यांचे हार्दिक आभार मानतों. परिषदेवर त्यांनी असाच निरंतर लोभ ठेवावा, अशी विनंती आहे.

**अरविंद मंगरूळकर**

दिनांक : ३१ जुलै, १९६४

चिटणीस,

**महाराष्ट्र-साहित्य-परिषद, पुणे**

# निवेदन

महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या वतीने मराठी वाङ्मयाभ्यासकांसाठी जी पाच प्रकाशने यंदा सादर व्हावयाची आहेत, त्यांतले कवितासंग्रहाचे प्रस्तुत पुस्तक सादर करिताना आम्हांला आनंद होत आहे. आमच्या दृष्टीपुढे जे वाङ्मयाभ्यासक आहेत, ते विद्यार्थिगण आहेत. त्याच दृष्टीने प्रस्तुत संग्रहाची रचना आणि योजना केलेली आहे. मराठी कवितेची परंपरा आणि तिच्या विकासाची दिशा स्थूल मानाने ध्यानी यावी, हा काव्याभ्यासाचा हेतू आहे. त्यास अनुसरून प्रस्तुत संग्रहात प्राचीन श्रेष्ठ मराठी कवितांचे जे वेचे घेतले आहेत, त्यांतून काव्याचे सौंदर्य जसे सहजपणे प्रतीत होईल, तशीच त्यामुळे त्याची गोडीही लागेल. अर्वाचीन कवितेबाबत 'केशवसुत ते मर्ढेकर' असा मर्यादित कालखंड स्वीकारिलेला आहे. तथापि अर्वाचीन कविश्रेष्ठांचे वेगळेपण स्पष्ट करणारी आणि कालवैशिष्टयही सूचित करणारी अशीच कविता निवडण्याची दक्षता घेतली आहे, हे अभ्यासकांस जाणवेल. प्राचीन आणि अर्वाचीन प्रमुख कवींच्या विविध भावानुभूती, नैकविध वृत्ति-प्रवृत्ती आणि रचनापद्धती यांचाही प्राथमिक परिचय या संग्रहाने व्हावा, अशीही योजना करण्यात आली आहे.

या 'साहित्य-कलशा'ची प्रस्थापना 'मंगल' गाऊन केलेली आहे. 'मंगला'च्या कवितांतून एकच-एक मराठी मन, भारतीय भूमिकेतून महाराष्ट्राची, मराठी भाषेची आणि सरस्वतीची भूपाळी गाताना आढळेल. मराठी सारस्वताच्या अभ्यासकांची मनोभूमिका यातून ध्वनित होईल.

'साहित्य-कलशा'च्या शेवटी कविचरित्र आणि कविता याविषयी टीपा देण्यात आल्या आहेत. कवींच्या लौकिक चरित्राचा तपशील देण्यापेक्षा त्यांचे कविदृष्टया वैशिष्टय काय आहे, यावर अधिक लक्ष देण्यात आले आहे. काव्यदृष्टया पडणाऱ्या संप्रदायांची माहितीही या टीपांतून मिळू शकेल; शिवाय प्रत्येक कवितेच्या सौंदर्याचे वेगळे दर्शनही घडविल्याचे आढळेल. प्राचीन कवींच्या बाबत, त्यातल्यात्यात कमी वादग्रस्त ठरलेले असेच जन्ममृत्यूंचे सन स्वीकारण्यात आले आहेत. 'ज्ञानदेवी', 'तुकारामाचे अभंग' आणि 'दासबोध' या ग्रंथांच्या अनुक्रमे 'राजवाडे-प्रत', 'सरकारी प्रत', आणि 'शं. ना. जोशी–संपादित प्रत' यांचा उपयोग वेचे निवडण्यासाठी केला आहे.

मुंबई–२
दि. ३१ जुलै, १९६४

वा. रा. ढवळे
व. दि. कुलकर्णी

# क्रमणी

## मंगल


| | | |
|---|---|---|
| १. वि. दा. सावरकर | स्वतंत्रतेचे स्तोत्र | ... १ |
| २. माधव जूलियन | मराठवाणा | ... २ |
| ३. र. लु. जोशी | मायबोलीची भूपाळी | ... ३ |
| ४. कवि गोविंद | सरस्वतीची भूपाळी | ... ४ |
| **प्राचीन पद्य** | | ... ५ |
| १. ज्ञानदेव | अ. श्री-व्यास-प्रशस्ती | ... ७ |
| | आ. श्रोत्यांस विनंती | ... ९ |
| २. मुक्तेश्वर | 'धांव धांव गा ! श्रीपती !' | ... १० |
| ३. तुकाराम | स्फुट अभंग | ... १३ |
| ४. रामदास | 'ॐ नमो जी गणनायका' | ... १५ |
| ५. वामनपंडित | भरतशोक | ... १७ |
| ६. मोरोपंत | 'रथचक्र उद्धरू दे !' | ... २० |
| **अर्वाचीन पद्य** | | ... २३ |
| १. केशवसुत | अ. नवा शिपाई | ... २५ |
| | आ. आम्ही कोण ? | ... २७ |
| २. ना. वा. टिळक | 'पाखरा ! येशिल का परतून ?' | २८ |
| ३. विनायक | कृष्णाकुमारी | ... २९ |
| ४. गोविंदाग्रज | अवेळी ओरडणाऱ्या कोकिळेस | ... ३३ |
| ५. बालकवी | अ. पारवा | ... ३६ |
| | आ. खेड्यातील रात्र | ... ३७ |
| ६. चन्द्रशेखर | कवितारति | ... ३८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. भा. रा. तांबे | अ. | निजल्या तान्ह्यावरी | ...४० |
| | आ. | रिकामे मधुघट | ...४१ |
| ८. माधव | | जिवबादादा बक्षी | ...४२ |
| ९. माधव जूलियन | अ. | प्रेम होईना तुझ्याने | ...४६ |
| | आ. | रावबहादूर ठोसर | ...४७ |
| १०. यशवन्त | अ. | वन्दन तुज मायभूमि | ...५३ |
| | आ. | गृहिणी मी; नच देवी | ...५५ |
| ११. अनिल | अ. | 'पेर्ते व्हा!' | ...५७ |
| | आ. | तटस्थ | ...६१ |
| १२. केशवकुमार | | प्रेमाचा गुलकंद | ...६३ |
| १३. अनंत काणेकर | अ. | चांदरात | |
| | आ. | 'बेगमेच्या विरहगीता'ला शिवाजीचे उत्तर | ...६५ |
| १४. बा. भ. बोरकर | अ. | माझ्या गोव्याच्या भूमीत | ...६६ |
| | आ. | हृदयच जेव्हा होते कोकिळ | ...६१ |
| १५. कुसुमाग्रज | अ. | देवाच्या दारी | ...७० |
| | आ. | ताजमहाल | ...७३ |
| १६. बहिणाई | अ. | मोट हाकलतो एक | ...७५ |
| | आ. | लपे करमाची रेखा | ...७६ |
| १७. बा. सी. मर्ढेकर | | फलाटदादा, फलाटदादा | ...७७ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 30288 वि:
क्रमांक 9६५२ नों दि

मंगल

वि. दा. सावरकर

# स्वतंत्रतेचे स्तोत्र

चाल : चंद्रकांत राजाची०

जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वन्दे ।। ध्रु० ।।

राष्ट्राचे चैतन्य मूर्त तू नीति-संपदांची
स्वतंत्रते भगवति ! श्रीमती राज्ञी तू त्यांची
तू सूर्याचे तेज, उदधिचे गांभीर्यहि तूची
स्वतंत्रते भगवती ! अन्यथा ग्रहण नष्ट तेची
मोक्ष मुक्ति ही तुझीच रूपे तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवती ! योगिजन परब्रह्म वदती
जे-जे उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर ते-ते
स्वतंत्रते भगवती ! सर्व तव सहचारी होते.

ग्रंथालय ठाणे
दा. क्र. १४०८
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

## मराठबाणा

महासिन्धु याला असे पाठिराखा, तसे साह्य सह्याचलाचे कड
खडे दुर्ग साल्हेर, फोण्डा, पराण्डा, अशेरी असे दक्ष चोहीकडे;
महाराष्ट्र हा कृष्णपाषाणदेही, परी लोहपाणीहि अङ्गात या;
नद्या न्हाणिती तापि, कृष्णा नि गोदा, भिमा, मान्जरा, वैनगङ्गा तया

महात्मा खरा जो स्वधर्माभिमानी परी धर्मवेडास थारा न दे,
समत्वे गुणग्राहकत्वेच योजी स्वकीयांस जो राष्ट्रकार्यामधे,
सदा वन्द्य जो क्षात्रकर्मप्रणेता महाराष्ट्रसम्राट् शिवाजी प्रभू
तया पूज्य ती पूज्य तत्सेवकाला न का सन्तमाता महाराष्ट्रभू ?

जिचा 'अमृतातेहि जिङ्कील पैजा' असा बोल ये प्रत्ययाचा निका,
पहा भिन्नजातीय पुष्पाकरांही दिसे गालिचा की हिची वाटिका,
मराठी अशी ज्ञानदेवी जयाची असे मायबोली मराठीच तो,
हृदी रक्त दे साक्ष तो बन्धु माझा, कुठेहि असो उच्च वा नीच तो.

मराठीस अन्याय कोठेहि झाला, स्वदेशी विदेशी कुणी गाञ्जिले
मराठी कसा मी न सन्ताप माझा धडाडे जरी तीव्र दुक्खानिले ?
मराठी जनांचेच वर्चस्व राहो स्वतःच्या महाराष्ट्रदेशी तरी
प्रसादे तुझ्या कोणती व्यक्त आशा करू अन्य हे वन्द्य वागीश्वरी ?

र. लु. जोशी

# मायबोलीची भूपाळी

प्रभातकाळी तुझी लागली ओढ मायबोली
भवती गुंजे तव गुणगानीं मंगल भूपाळी १.

ज्ञानामृत गे तुला पाजिले संत ज्ञानदेवे
नाथ समर्थे तुझी फोडिली शब्दांची पेवे २.

भक्त तुका तव तार छेडिता जनमत आंदोळे
साथ कराया भवती जमले संतांचे मेळे ३.

शिवशाहीचे भाट बाहती तुला कुर्निसात
शृंगारावरि वीररसाची झाली बरसात ४.

चलन पटविती तुझे घोंगडे मर्द गावढाळ
जिवट किती ही मूस रांगडी तुझी टाकसाळ ५.

रोखठोक हा नाद छणाणे नित रानोमाळी
भवती गुंजे तव गुणगानी मंगल भूपाळी ६.

गो विंद

# सरस्वतीची भूपाळी

नमने वाहुनि स्तवने उधळा, जयजयकार करा
बंधुहो । जयजयकार करा
सकल मनांचा विकास येतो आज आपुल्या घरा ध्रु०

विमलहास्यसुमवृष्टीमध्ये असो तुझे स्वागत
निरंतर । असो तुझे स्वागत
परमात्म्याच्या चित्सौंदर्या, येई बा हासत १.

आत्मवेलिच्या स्फूर्तिफुलांवर वसंत जे विकसती
बुद्धिचे । वसंत जे विकसती
त्याच वसंता, तदिय विकासा, सरस्वती बोलती २.

विश्वकाव्य वाचीत बैसली चित्तमयूरावरी
दीप्ति जी । चित्तमयूरावरी
त्या दीप्तीला, त्या ज्ञप्तीला, वदती वागीश्वरी ३.

हे वाग्देवी, असे प्रार्थना ये या संकीर्तना
उत्सवा । ये या संकीर्तना
जगन्मंगले सकल मंगलांसह दे पददर्शना ४.

सौंदर्याहुनि दिव्य दिव्यतर हिचे ज्ञान सुंदर
खरोखर । हिचे ज्ञान सुंदर
त्या ज्ञानाहुन जगात सुंदर एकच परमेश्वर ! ५.

विचारकारंजावर तुषार शब्दांचे नाचवी
देवि ही । शब्दांचे नाचवी
जीवात्मा त्यांतून बोलवी परमात्मा डोलवी ६.

चराचराचा दावि चित्रपट अमुच्या स्मरणावर
भराभर । अमुच्या स्मरणावर
विजेऐवजी त्यात जळे चिच्चंद्राचे झुंबर ! ७.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों दि ...

# प्रा ची न प द्य

# अ. श्री-व्यास-प्रशस्ती

आतां भारतकमलपरागु । गीताख्यु प्रसंगु
जो संवादला श्रीरंगु । अर्जुनेंसीं १.

ना तरी शब्द ब्रह्माब्धी । मथिलें व्यासबुद्धी
निवडलें निरवधी । नवनीत हें २.

मग ज्ञानाग्निसंपर्कें । कडसिलें विवेकें
पदा आलें परिपाकें । आमोदासीं ३.

जें अपेक्षिजे विरक्तीं । अनुभविजे संतीं
सोहंभावें पारंगतीं । रमिजे जेथ ४.

जें आर्कणिजे भक्ति । आदिवंद्य त्रिजगती
ते भीष्मपर्वीं संगति । सांधिजैल ५.

जे भगवद्गीता ह्मणिजे । जे ब्रह्मेशानीं प्रसंसिजे
जे सनकादिकीं सेविजे । आदरेंसीं ६.

आणि कृष्णार्जुनिं मोकली । गोठि केली निरालीं
ते व्यासें दाविली करतलीं । घेऊं ये ऐसी ७.

बालकांतें वोरसें । माये जेवऊं बैसे
तेव्हांलि तेया ठाकति तैसें । घांस करी ८.

कां अफांटा समीरणा । आपैतेपणेंसि आणा
केलें जैसें वीजणा । निर्मूनियां ९.

तैसें शद्बें जें न लभे । तें घडूनु अनुष्टुभें
स्त्रीशूद्रादिप्रतिभे । सामविलें १०.

स्वातींचेनि पाणिये । न्हवंति जरि मोतियें
तरि आंगीं सौंदरांचिये । कां शोभती तियें ११.

नादु वाद्या नेयंता । तरि कां गोचरु होंता
फुलें नव्हतां घेपता । आमोदु केवि १२.

गोडें नव्हंति पक्वान्नें । तरि कां फावती रसने
दर्पणें विण नयनें । नयनु कां दीसे १३.

द्रष्टा श्रीगुरुमूर्त्ति । न रिगतां दृश्यपंथीं
तरि काह्या उपास्ती । आकलता तो १४.

तैसें वस्तु जें असंख्यात । तेया संख्या इयें शतें सात
नव्हंति तरि कोण एथ । लागों ये तें १५.

मेघु सिंधुचें पाणी वाहे । तऱ्हीं जग तेयातें चि पाहे
कां जें उमप तें नोहे । टाकतें कोण्हां १६.

आणि वाचा जें न पवे । तें श्लोक न्हवंति बरवें
तरि कानें मुखें फावे । ऐसें कां होंतें १७.

ह्मणौनि व्यासाचा हा थोरु । विश्वा जाला उपकारु
श्रीकृष्णउक्ति आकारु । ग्रंथाचा केला १८.

आणि तो मियां हा आतां । व्यासाचि पदें पाहातपाहातां
आणिला श्रवणपथा । मऱ्हाटिया १९.

# आ. श्रोत्यांस विनंती

जैसें शारदियेचिये चंद्रकले । माझि अमृतकण कोवले
ते वेंचिति मनें मौआलें । चकोरतलगे १.

तेयापरीं श्रोतां । अनुभवावी हे कथा
अति हलुवारपण चित्ता । आणूनियां २.

हें शब्देंविण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे
बोला आधीं झोंबिजे । प्रमेयासि ३.

जैसें भ्रमर परागु नेति । परि कमलदलें नेला नेणति
तैसी परि आहे सेविती । ग्रंथीं इये ४.

कां आपुला ठाउ न संडितां । आलंगिजे चंद्रु प्रकटतां
हा अनुरागु भोगितां । कुमुदिनी जाणें ५.

ऐसेनि गंभीरपणें । थिरावलेनि अंतष्करणें
आथिला तो जाणे । मातु इये ६.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...३७२५८... दि: ...८।७४...
क्रमांक ...७५३२... नों दि ...

# ' धांव धांव गा ! श्रीपती ! '

लावूनियां नेत्रपातीं । हृदयीं चिंतिली कृष्णमूर्ती
म्हणे, 'धांव धांव गा ! श्रीपती ! । ये आकांतीं स्वामियां १.

पडती बहुतांचीं कारणें । करितां बहुतांचें धावणें,
सर्व सांडोनि मजकारणें । ये आकांतीं पावावें २.

कृष्णा, मी तंव तुझीच कुमरी । यथार्थ जन्मले तुझेच उदरीं
स्नेहें सुभद्रेचिये सरी । बहिण म्हणें मी पाठींची ३.

परी मज येवढें भाग्य कैचें ? । मी दासी किंकरी साचें
पादुकातळीं मृत्तिकेचे । रज लागले जरी म्हणूं ४.

तेही दुर्लभ सनकादिकां । तेथे मी किती यदुनायका
मस्तक ओढवी पादोदका । शंकर आपण निजांगें ५.

पक्षियातें तुझें नाम । ठेऊनि कुंटिणी स्मरे राम
तियेलागीं वैकुंठधाम । वस्तीस तुवां दीधलें ६.

पाय स्पर्शोनियां मुरारी । शिळा केली दिव्य नारी
तिये अहल्येचिये सरीं । मज उद्धरीं श्रीरंगा ७.

सहस्र व्याघ्रामाजी गाय । सांपडता जेवीं बोभाय
तेवीं तूतें मोकलिली धाय । कृष्णा, धावें म्हणउनी ८.

हरिसी भक्तांचीं संकटें । सांडिसी दासांचीं दुर्घटें
तो पुरुषार्थ आजि कोठें । आच्छादिला सांग पां ? ९.

सर्वीं सर्वत्र तूं अनंत । जाणसी जीवींचें मनोगत
माझा न कळेचि वृत्तांत । हे काय अज्ञान तुज आलें १०.

कृष्णा, तूंच जनक जननी । वित्त गोत चक्रपाणी
तुजवेगळा न दिसे कोणी । मज निर्वाणीं सोइरा ११.

तूंचि गे माझी कुळस्वामिणी । मानसतुळजापुरवासिनी
कौरवमहिषासुरमर्दिनी । धांवें पावें धावणिया १२.

कौरवसभा पाणीयाडि । नक्रदु:शासनें आवघडि
तयां करोनि कडोविकडी । वोढितां आंडि पडियेली १३.

तयालागीं तूं घाली उडी । फेडीं दीनाचीं सांकडीं
धांवें पावे गा तातडी । कृपाळुवा गोविंदा १४.

दु:शासन शंख वहिला । स्मरणसंतोषवेद हारविला
कौरवसागरीं बुडविला । तो कवणातें न काढवे १५.

मत्स्यरूपिया नारायणा । धांवे पावें मधुसूदना
विभांडूनि याचिया वदना । समाधान मज द्यावें १६.

माझा स्वधर्ममंदरगिरी । कौरवसमुद्रीं पडिला फेरीं
तया बुडतिया उद्धरीं । कांसव होई केशवा १७.

कासवदृष्टीं विलोकावें । मातें पाठीसीं घालावें
पाय पोटीं न धरावें । धावे पावे ये काळीं १८.

माझी लाज हे धरित्री । रसातळा नेतो वैरी
यज्ञवराहरूपिया हरी । दाढें धरी प्रतापें १९.

माझा भाव तो प्रऱ्हाद । निष्ठुरीं गांजितां पावला खेद
शत्रुअहंकारस्तंभभेद । करूनि प्रगटे नरहरी २०.

कौरवअहंता महीतळी । वामनरूपिया वनमाळी
दाटी त्रिपादपायांतळी । बळिबंधना, पावावें २१.

माझा भाव आणि भक्ती । तेचि जगदग्निरेणुकासती
कुशब्दशस्त्रीं कौरवदैत्यीं । संत्रासिली अवनिये २२.

ते निवटूनि धराभारा । फेडी भार्गवपरशुधरा
द्रौपदी सती वसुंधरा । पांडवद्विजा अर्पी कां २३.

लाज हरिली दु:शासनें । तेचि सीता या रावणें
हरिली ते तुवां रघुनंदनें । प्रतापरुद्रें रक्षावी २४.

आतां कृष्णा, आठविया । तूच आमुच्या विसांविया
कौरवअहंकारकाळिया । पायांतळीं रगडीं कां ? २५.

बौद्धरूपिया जगदीशा । कौरवीं मांडिली माझी हिंसा
करुणाकरा, कृष्णा, परेशा, । प्राणरक्षक मज होई २६.

सांडूनि निष्ठुरतेचें वसन । दिशा वेढीं काय करून
मातें न देखतां नग्न । वस्त्रप्रद मज होईं २७.

वळंघोनि प्रतापाचा घोडा । परजी सुदर्शनकाळखंडा
कौरवम्लेंच्छ वधूनि होडा । निष्कलंक मज करीं २८.

कौरवदुरुक्तिशिळाधारीं । मेघवृष्टी होतसे भारी ।
अचळकृपेचा गोवर्धनगिरी । मजवर धरीं गिरिधरा २९.

माझें मानससरोवर । प्रेमकल्हारीं सुमनोहर
राजहंसरुक्मिणीवर । सदा स्वानंदे क्रीडसी ३०.

आजी गेलासी कवणे ठाया ? । मुक्त मुक्ताफळें चरावया
गोविलासी, म्हणोनि माया । माझी तुवां सांडिली ? ३१.

वृंदावनींचे विहारिणी । कृष्णसखिये सांगातिणी
धाव पाव मायबहिणी । वेळ न लावी स्नेहाळे ३२.

सगुणउपासकांचे पूजे । की योगियांचे समाधिसेजे
विश्रामलीस म्हणोनि माझें । स्मरण तूंतें नव्हेचि ३३.

तेवीं धांवा करितां तुझा । हृदयस्फोट झाला माझा
कंठ शोषला अधोक्षजा । तुज बाहतां आकांतीं. ३४.

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ... वि: ...
... १८३२ ... नों: दि: ..

# ' आवडे हें रूप गोजिरें सगुण '

१.

आवडे हें रूप गोजिरें सगुण । पाहातां लोचन सुखावले १.
आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहीं । जों मी तुज पाहें पांडुरंगा २.
लाचावलें मन लागलीसे गोडी । तें जीवें न सोडी ऐसें जालें ३.
तुका म्हणे आम्ही केली जे लडिवाळी । पुरवावी आळी मायबापें. ४.

२.

तूं माउलीहून मायाळ । चंद्राहूनि शीतळ । पाणियाहूनि पातळ कल्लोळ प्रेमाचा १.
देऊं कशाची उपमा । दुजी तुज पुरुषोत्तमा । ओंवाळूनि नामा तुझ्यावरूनि टाकिलों २.
तुवां केलें रे अमृता । गोड त्याही तूं परतां । पांचां तत्त्वांचा जनिता सकळसत्तानायक ३.
कांहीं न बोलोनि आतां । उगाच चरणीं ठेवितों माथां । तुका म्हणे पंढरिनाथा । क्षमा करीं अपराध. ४.

३.

आम्हां घरीं एक गाय दुभता हे । पान्हा न समाये त्रिभुवनीं १.
वान ते सांवळी नांव तें श्रीधरा । चरे वसुंधरा चौदा भुवनें २.
वत्स नाहीं माय भलत्यासवें जाय । कुर्वाळी तो लाहे भावभरणा ३.
चहूं धारीं क्षीर वोळली अमुप । धाले सनकादिक सिद्ध मुनी ४.
तुका म्हणे माझी भूख तेथें काय । जोगविते माय तिन्ही लोकां. ५.

४.

कासियानें पूजा करूं केशीराजा । हा चि संदेह माझा फेडीं आतां १.
उदकें न्हाणूं तरी स्वरूप तें तुझें । तेथें काय माझें वेचे देवा २.

गंधाचा सुगंध पुष्पाचा परिमळ । तेथें मी दुर्बळ काय करूं ३.
फळदाता तूंच तांबोल अक्षता । तरी काय आतां वाहों तुज ४.
वाहूं दक्षिणा जरी धातु नारायण । ब्रह्म तें चि अन्न दुजें काई ५.
गातां तूं ओंकार टाळी नादेश्वर । नाचावया थार नाहीं कोठें ६.
तुका म्हणे मज अवघें तुझें नाम । धूप दीप रामकृष्णहरि. ७.

५.

आम्हीं वैकुंठवासी । आलों याचि कारणासी । बोलिले जें ऋषि
साच भावें वर्ताया १.
झाडूं संतांचे मारग । आडरानीं भरलें जग । उच्छिष्टाचा भाग
शेष उरलें तें सेवूं २.
अर्थे लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें । विषयलोभी मनें
साधनें बुडविलीं ३.
पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासा दरारा । तुका म्हणे करा
जयजयकार आनंदें. ४.

६.

पैल आले हरी । शंख चक्र शोभे करीं १.
गरुड येतो फडत्कारें । ना भी ना भी म्हणे त्वरे २.
मुकुटकुंडलांच्या दीप्ति । तेजें लोपला गभस्ति ३.
मेघश्यामवर्ण हरि । मूर्ति डोळस साजिरी ४.
चतुर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ५.
पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ६.
तुका जालासे संतुष्ट । घरां आलें वैकुंठपीठ. ७.

७.

आम्ही जातों अपुल्या गांवा । आमुचा रामराम घ्यावा १.
तुमची आमची हेचि भेटी । येथूनियां जन्मतुटी
आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पायां
येतां निजधामीं कोणी । विठ्ठल विठ्ठल बोला वाणी
रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो वैकुंठाला.

# ' ॐ नमो जी गणनायका '

ॐ नमो जी गणनायका । सर्वसिद्धिफलदायका
अज्ञानभ्रांतिछेदका । बोधरूपा १.

माझिये अंतरीं भरावें । सर्वकाळ वास्तव्य करावें
मजवाग्शून्यासि वदवावें । कृपाकटाक्षेंकरूनी २.

जयाचें आठवितां ध्यान । वाटे परम समाधान
नेत्रीं रिघोनियां मन । पांगुळे सर्वांगीं ३.

सगुण रूपाची ठेव । महालावण्यलाघव
नृत्य करितां सकळ देव । तटस्थ होती ४.

सर्वकाळ मदोन्मत्त । सदा आनंदें डुल्लत
हर्षे निर्भर उदित । सुप्रसन्नवदना ५.

भव्यरूप वितंड । भीममूर्ति महाप्रचंड
विस्तीर्ण मस्तकीं उदंड । सिंदूर चर्चिला ६.

नाना सुगंध परिमळें । थबथबां गळतीं गंडस्थळें
तेथें आलीं षट्पदकुळें । झंकारशब्दें ७.

मुरडीव शुंडादंडें सरळें । शोभे अभिनव आवाळें
लंबित अधर तीक्ष्ण गळें । क्षणक्षणा मदस्रवी ८.

चौदा विद्यांचा गोसावी । ऱ्हस्व लोचन ते हालवी
लवलवीत फडकावी । फडै फडै कर्णथापा ९.

रत्नखचित मुगुटीं झळाळ । नाना सुरंग फांकती कीळ
कुंडलें तळपती नीळ । वरीं जडले झळकती १०.

दंत शुभ्र संदट । रत्नखचित हेमकट
तया तळवटीं पत्रें नीट । तळपती लघु लघु ११.

लवथवीत मलपे दोंद । वेष्टित कटी नागबंद
क्षुद्र घंटिका मंद मंद । वाजती झणत्कारें १२.

चतुर्भुज लंबोदर । कासे कशिला पीतांबर
फडके दोंदीचा फणिवर । धुधुःकार टाकी १३.

डोलवी मस्तक जिव्हा लाळी । घालूनि बैसला वेंटाळी
उभारोनी नाभिकमळीं । टकमकां पाहे १४.

नानायाती कुसुममाळा । व्याळपर्यंत रुळती गळा
रत्नजडित हृदयकमळा–। वरी पदक शोभे १५.

शोभे फरश आणि कमळ । अंकुश तीक्ष्ण तेजाळ
एकें करीं मोदकगोळ । तयावरी अति प्रीती १६.

नटनाटयकळाकुसरी । नानाछंदें नृत्य करी
टाळ मृदंग भरोवरी । उपांग हुंकारे १७.

स्थिरता नाहीं एक क्षण । चपळविषयीं अग्रगण
साजिरी मूर्ति सुलक्षण । लावण्यखाणी १८.

रुणझुणा वाजती नेपुरें । वांकी बोभाटती गजरें
घागरियांसहित मनोहरें । पाउलें दोनी १९.

ईश्वरसभेसी आली शोभा । दिव्यांबराची फांकली प्रभा
साहित्यविषयीं सुसभा । अष्टनायका होती २०.

ऐसा सर्वांगें सुंदर । सकळ विद्यांचा आगर
त्यासी माझा नमस्कार । साष्टांगभावें. २१.

# भरतशोक

भरत जवळि नाहीं मातुल-ग्राम-वासी
भरत-जननि धाडी कानना राघवासी
दशरथ मृत झाला, राम जातां वियोगें
तृण बहुत दिसांचें अग्निच्या जेंवि योगें १.

मग भरत वसिष्ठें आणिला जों अयोध्ये
नगरि गत-धवा तों आणि निर्वीर्य योद्धे
जन मृत-सम देखे हेतु कांहीं कळेना
जननि-कृत कु-चेष्टा बुद्धितें आकळेना २.

वृत्तांत सांगे भरतासि माय। स्वानंद जीचा त्रि-जगीं न माय
भेदूनि वक्षःस्थल शब्द तीचा। करी महा-क्षोभ महा-मतीचा ३.
जाळील तीतें निज-दृष्टि-पातें। पाहे असा हालविनाच पातें
म्हणे, ‘ अवो पापिणि पाप-रूपे। जळो तुझें तोंड जड-स्वरूपे ४.
जाळीन हें तोंडचि जाण आधीं। मुखें जया देशि अनंत आधी
न माय तूं वैरिण होसि साची। माझे मनीं भाव खरा असाची ५.
केला तुवां देखत भर्तृ-घात। क्षणें ति-वाटा रचिल्या तिघांत
शत्रुघ्न मी, लक्ष्मण-राम जोडे। राजा तिजा, तींस अनर्थ जोडे ६.

वना धाडिलें जेधवा राम-राया
तुवां हेतु केला स्वभर्ता मराया
अहा राम-सीता अशा दंपतीतें
वना धाडिलें, मारिलें कां पतीतें ७.

न कळत पतिताचें खादलें अन्न वोकी
तरि पतित नव्हे तो पाप-रूपे अवो कीं
म्हणुनि उदरिं तूझ्या देह हा जन्मला गे
त्यजिन तरि मला हें पाप तूझें न लागे ८.

अवो कैकयी हें काय । केलें तुवां हाय हाय
न म्हणवे तुज माय । जन्मोजन्मीं वैरिणी
सर्व-जगदभिराम । वना धाडिला तो राम
केलें विख्यात कु-नाम । कीं हे पति-मारिणी
तुझ्या वधें न अधर्म । तूज मारावें हा धर्म
परि निंदील हें कर्म । राम पाप-कारिणी
नाहींतरी प्राण आज्य । तुझे घालूनियां प्राज्य
जाळूनियां सामराज्य । दाखवितों करणी ' ९.

धिक्कारूनी गोष्टि मातेसि सांगे । कौसल्येच्या ये गृहा सानुरागें
त्यातें देखे जेधवां राम-माय । श्रीरामाचा शोक लोकीं न माय १०.

मोकळा करुनि कंठ तेधवां । आठवूनि मनिं जानकी-धवा
ते रडे, भरतही तसा रडे । जोंवरी नयन होति कोरडे ११.

म्हणे, ' वासरा, घात झाला असा रे । तुझ्या माउलीचेच हे खेळ सारे
वृथा धाडिला राम माझा वनासी । न देखों शके त्या
जगज्जीवनासी १२.

अरे, राघवें व्यापिले लोक सारे । तरी नावरे शोक माझा कसा रे
तृषाक्रांत डोळे घनश्याम रामा । पहायास रे सर्व-
लोकाभिरामा १३.

जानकी जनकराजकुमारी । पाय कोमळ जिचे, सुकुमारी
चालली जसि वना अनवाणी । बोलली कटकटा जन-वाणी १४.

सून सूनुहि वनाप्रति जाती । आणि जो जित असेल कु-जाती
मानवी तनु पशूंत गणावी । ते शिळा परि सजीव म्हणावी ' १५.

भरतशोक अनेक तिचे असे । परिसतां मग बोलत तो असे
' जननि, गोष्टि समस्तहि हे खरी । परिस येविषयीं मम वैखरी
मी ब्रह्म-हत्या-शत-पाप लाहें । ठावें असे लेश जरी मला हें
खड्गें वसिष्ठासि अरुंधतीतें । वधीं जरी ठाउक हें मतीतें ' १७.

म्हणे राममाता, 'अरे वासरा, मी । तुझा जाणतें प्रेम-उल्हास रामीं
तुला राम-सेवेविणें काम नाही । न राज्यादिकांची जया कामनाही' १८.

तों वसिष्ठ वदला भरतातें । राम-पाद-निज-लाभ-रतातें
'पाळि यावरि समस्त धरा हे । राज-नीति करिं, सावध राहे. १९.

रायें तुतेंचि दिधले स्व-नृपासना रे
संपूर्ण तूं जननिची करिं वासना रे'
शब्दार्थ हे न कळती गुरु-लाघवाचे
साचे म्हणूनि पद आठवि राघवाचे २०.

स्मरोनि ऐसें रघु-नंदनातें । त्या राघवाच्या पद-वंदनातें
जावें असा भाव धरूनि साच । बोले वसिष्ठाप्रतिही तसाच २१.

'राजाधिराज रघु-राजचि एक जाणा
पाहो चला सकळ जाउनि त्या सु-जाणा
आम्ही समस्त जन किंकर राघवाचे
जे राम-नाम जपतों अजि नित्य वाचे २२.

विना राक्षसी-कैकयी काननातें । चला सर्व पाहूं मृगांकाननातें
प्रयत्नेंचि घेऊनि येऊं गृहातें । न येतां समर्पूं शरीरें स्वहातें २३.

येणार ते या अथवा नकाही । राहेन मी हें न घडेचि कांहीं'
बोलोनियां स्पष्टचि चालिला हो । शोकांतही घे प्रभु-नाम-लाहो २४.

# ‘ रथचक्र उद्धरूं दे ! ’

पार्थाकडील कटकें कर्णें, कर्णाकडील त्या पार्थें
केलीं तीव्रशरांहीं भग्नें मग्नें भयीं, हृतस्वार्थें १.

वर्षति अन्योन्यावरि कर्णार्जुन ते घनावरी घनसे
पुरुहूत-दूत-वात-द्युमणिकरां शरगृहांत रीघ नसे. २.

तों आला वधसमय, द्विजशापहि भूमुखेंचि तो डावें
गिळवी रथचक्र, म्हणे, ‘ रामास्त्रा, प्रेम तूंहि तोडावें ’ ३.

चक्र क्षितिने गिळितां न स्मरतां भार्गवास्त्र रविजाला
स्पर्शे विषाद, म्हणती ‘ बळ-तेजो-नाश-हेतु ’ कवि ज्याला ४.

तो वृष भूमिग्रस्तस्यंदनचक्रासि उद्धरायातें
उतरे स्वरथाखालें करुनि असें अतुल युद्ध राया तें ५.

उद्धरण करूं पाहे कर्ण भुजांनी धरूनि चक्राचें.
परि पृथ्वी सोडीना, जाणों व्रत घेतलेंचि नक्राचें. ६.

स्ववधोद्यतार्जुनातें कर्ण म्हणे, ‘ बळ तुझें अनंत, रहा
स्वस्थ मुहूर्तभरि, रणश्रद्धा पुरवील गा अनंतर हा. ७.

रथचक्र उद्धरूं दे, श्रुति-शास्त्र-ज्ञा, महारथा, कुलजा,
साधु न हाणिति अरिला, पाहति अ-धृतायुध व्यथाकुल ज्या ८.

तूं स्वरथीं, क्षितिवरि मी, तूं सायुध, मी अ-शस्त्र-कवच रणीं
न वधावें मज, जों मी रथचरणीं लाग तूंहि भव-चरणीं ९.

भ्यालों न तुज हरीसहि, जो न तुला विमुख काय कातर तो
कथितों यास्तव कीं, जन धर्में भवसिंधुनायका तरतो १०.

रक्षावा धर्म बुधें, कुशळाचा धर्म हा निधी, राहें
स्थिर जें करिसि निरायुध-मथन करिल धर्महानि धीरा हें.’ ११.

कृष्ण म्हणे, ‘ राधेया, भला बरा स्मरसि आजि धर्मातें
नीच-व्यसनीं बुडतां निंदिसि दैवास, न स्वकर्मातें १२.

जेव्हां तूं, दुर्योधन, दुःशासन-शकुनि, एक-मति झालां,
कैसे कपट-द्यूतीं चित्तींहि न धर्म लंघितां भ्यालां ? १३.

जेव्हां सभेसि नेली पांचाळी मानिलें मनीं शर्म,
तेव्हां गेला होता कोठें राधा-सुता तुझा धर्म ? १४.

फेडी वस्त्र सतीचें जेव्हां उघडें करावया आंग,
गेला होता कोठें धर्म तुझा तेधवा वृषा, सांग, १५.

चारुनि विषान्न भीमा सर्प डसविले नृपें, असें खोटें
कर्म करवितां, कर्णा, होता तव धर्म तेधवां कोठें ? १६.

केले दग्ध जतु-गृहीं त्वां पांडव वारणावतीं जेव्हां,
गेला होता कोठें धर्म तुझा सूत-नंदना तेव्हां ? १७.

अभिमन्यु बाळ बहुतीं वधितां त्वां वारिलें न तें कर्म
तेव्हां गेला होता कोठें राधा-सुता, तुझा धर्म ? १८.

पूर्वीं धर्म न रुचला, त्यजिला निपटूनि जो जसा कुचला
आतांचि बरा सुचला, काळ-गृहा सर्व व्हा परासु चला. १९.

आतां रक्षील कसा धर्म, तुम्हीं वित्तमद्यमत्तांनीं
जो लोटिला दहादा स्वहितहि मानूनि अहित लत्तांनीं २०.

रक्षावा धर्म असा करिशी उपदेश तरि असे मान्य
रक्षितसों धर्मातें आम्हांला धर्म ठाउका नान्य. ’ २१.

आश्रित-जनाभिमानी प्रभु बोले जेधवां असें रागें
निश्वास वृषें लज्जावनत-मुखें सोडिला जसा नागें २२.

न वदे कांहींच, रथीं वेंधे घे सूर्य-सूनु चापातें
सोडी बाण कराया मूर्छित शक्रासि सूनुच्या पातें २३.

तेव्हा पर-पुरुष म्हणे, “ पार्था, दिव्यास्त्र-वात सोडावा,
झोडावा, मोडावा वैर-द्रुम-कर्ण, बाण जोडावा. ” २४.

कर्णावरि बहु कोपे पार्थ जई तेधवा अनळसाचा
देह ज्वाला-माली भासे त्या रण-मखीं अनळ साचा २५.

शर सोडिला रवि-सुतें, धीर जनेंहि स्व-धीर यामागें
जो सोडिलाचि नव्हता व्यसनांत कधींहि मणि जसा नागें २६.

तो शर गर-धर-वर-सा पवि-सा रवि-सा स्मरारि-सायक-सा
पार्थ-भुजांतरि शिरला, वल्मीकामाजि नाग-नायक-सा २७.

त्या खर-शर-प्रहारें विव्हळ झाला महेंद्र-सुत राया
जरि होता निकट कुशल मंत्री प्रभु बाण-सर्प उतराया २८.

ऐसा निज-भुज-विक्रम दावुनि सर्वां भटांसि शुद्ध-रणीं
उतरे वृष दावाया भू-ग्रस्त-रथांघ्रिच्याहि उद्धरणीं २९.

बहु यत्न करी, प्रार्थी, परि धरिलें सोडिनाचि चाक रसा
द्विज-शाप मान्य पति-सा गुरु, कर्ण न मान्य तीस चाकर-सा ३०.

# अर्वाचीन पद्य

# नवा शिपाई

नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे,
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे !
ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा,
तेच पतित की जे आखडिती प्रदेश साकल्याचा !

खादाड असे माझी भूक,
चतकोराने मला न सूख;
कूपातिल मी नच मंडूक;

मळ्यास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे !
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे !

जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत,
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत;
कोठेही जा,– पायांखाली तृणावृता भू दिसते;
कोठेही जा, – डोईवरते दिसते नीलांबर ते !

सावलीत गोजिरी मुले,
उन्हात दिसती गोड फुले,
बघता मन हर्षून डुले;

ती माझी, मी त्यांचा,—– एकच ओघ अम्हांतुनि वाहे !
नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे !

पूजितसे मी कवणाला ?—–तर मी पूजी अपुल्याला,
आपल्यामधे विश्व पाहुनी पूजी मी विश्वाला;
'मी' हा शब्दच मजला नलगे; संपुष्टी हे लोक
आणुनि तो, निजशिरी ओढिती अनर्थ भलते देख !

लहान-मोठे मज न कळे,
साधु-अधम हे द्वयहि गळे,
दूर-जवळ हा भाव पळे.
सर्वंच मोठे-साधु-जवळ, त्या सकली मी भरुनी राहे !
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे !

हलवा करिता तिळावर जसे कण चढती पाकाचे,
अहंस्फूर्तिच्या केंद्राभवते वेष्टन तेवि जडाचे;
आत समचि निर्गुण तिलक, वरी सदृश सगुण तो पाक;
परि अन्यां बोचाया धरितो काटे की प्रत्येक !
अशी स्थिती ही असे जनी !
कलह कसा जाइल मिटुनी ?
चिंता वागे हीच मनी.
शांतीचे साम्राज्य स्थापू बघत काळ जो आहे,
प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे !

# आम्ही कोण ?

शा र्दू ल वि क्री डि त

‘ आम्ही कोण ’ म्हणूनि काय पुससी ?– आम्ही असू लाडके
देवाचे, दिधले असे जग तये आम्हांस खेळावया;
विश्वी या प्रतिभाबले विचरतो चोहीकडे लीलया,
दिक्कालातुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके !

सारेही बडिवार येथिल पहा ! आम्हांपुढे ते फिके;
पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया
सौन्दर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या;
फोले पाखडिता तुम्ही, निवडितो ते सत्त्व आम्ही निके !

शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणी सुरांच्या बरे !
पृथ्वीला सुरलोकसाम्य झटती आणावया कोण ते ?
ते आम्हीच, सुधा कृतींमधुनिया ज्यांच्या सदा पाझरे;
ते आम्हीच शरण्य मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभते !

आम्हांला वगळा,– गतप्रभ झणी होतील तारांगणे;
आम्हांला वगळा,– विकेल कवडीमोलावरी हे जिणे !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...३५२५८... दि: ......
क्रमांक ...२५३... नों: दि: ......

ना. वा. टिळक

# पाखरा ! येशिल का परतून ?

चाल : खचित बाई व्यर्थ आम्ही

पाखरा ! येशिल का परतून ?
मत्प्रेमाने दिल्या खुणांतुन । एक तरी अठवून ? पाखरा !
हृवेसवे मिसळल्या माझिया । निःश्वासा वळखून ? पाखरा !
वाऱ्यावरचा तरंग चंचल । जाशिल तू भडकून ! पाखरा !
थांब, घेउ दे रूप तुझे हे । हृदयी पूर्ण भरून ! पाखरा !
जन्मवरी मजसवे पहा ही । तव चंचूची खूण ! पाखरा !
विसर मला, परि अमर्याद जग । राही नित्य जपून ! पाखरा !
ये आता घे शेवटचे हे । अश्रू दोन पिऊन ! पाखरा !

# कृष्णा कुमारी

चाल : चंद्रकांत राजाची

१

कळी उमलली जो न पावली पूर्ण विकासाला
अदय कराचा तोच तिजवरी पडला की घाला !
सुनील गगनी चमकू लागे सुंदर इंदूकला,
तोच तिचा निर्घृण राहूने धरिला हाय गळा !
भीम नृपाला प्रियतर बाला कृष्णा वेल्हाळा,
नडली, पडली बली अकाली, त्यायोगे, काळा !
स्वार्थसंसृतीलोभपरायण जगताची रीती,
उठे सुतेवर पिता हितास्तव, विसरे नयनीती !

२

उपवर झाली भीमकबाळी रूपवती कृष्णा,
तत्प्राप्तीस्तव सहज लागली भूपवरां तृष्णा;
जयपुरराजा म्हणे, 'गुणवती व्हावी मज भाजा,'
जोधपूरचा भूप म्हणे, 'तो भाग असे माझा !'
शिद्यांच्या जोरावर चढला मारवाडवाला,
वांछी व्हावी प्राप्त आपणा कृष्णेची माला;
जयपुरची मागणी तयाने धाके परतविली,
राजस्थानी वैराग्नीची ज्वाला भडकविली;
कृष्णेसाठी सज्ज जाहले खड्गाचे हात,
घोर युद्ध माजले वाहले रक्ताचे पाट !

३

अमीरनामा पठाण घातक, नीच, अविश्वासी,
उदेपुराधिप मानासाठी ये भीमापाशी;
वदे, 'हितास्तव करा स्वदुहिता अर्पण मानाते,
अपकारक होईल जोडिले अन्याशी नाते,
अथवा हे खंडूनच टाका मूळ अनर्थाचे,
का कारण होता पाडाया बळी सहस्रांचे?'
विचार पडला, कसा पोटचा गोळा तोडावा?
चुकवावे वा काय उपाये शत्रूंच्या घावा?
चालक, मंत्री अजित नृपाचा तोचि मार्ग दावी;
'समयीच' म्हणे, 'ही अग्नीची ज्योत मालवावी!'

४

आप्त जवळचा दौलत त्यावर ये ती कामगिरी,
कोसळून आकाश गमे त्या पडले काय शिरी!
'धिक्कार असो!' वदे, 'जीविता तुमच्या धिक्कार!
व्यर्थ जन्म घेऊन जाहला धरणीला भार!
छत्र शिरी मिरविता, म्हणविता स्वता लोकपाळ!
पोर एक पोटची तिचाहि न करवे सांभाळ!
हाच काय पुरुषार्थ? कुलाचा हाच काय मान?
पुरुष सजावा की अबलेची कापाया मान?
रजपूतांचे छावे आम्ही अबलांचे साथी,
वागवितो तलवार कटीला नित्य तयांसाठी!
वदा, कोण त्या मृणालिनीच्या जीवावर उठला?
तद्रक्ताचा तिच्या कपाळी लाविन खास टिळा!
पडेल जेथे मृगनयनेचा अश्रुबिंदु एक,
अरिरुधिराने त्या स्थानावर लिहू सूड-लेख!
नको बुद्धि ती, नका अमंगल वच ते उच्चारू,
धीर न सोडा; धर्म आपला रणी मरू-मारू!'

५

बोध खलास न रुचे, अहिमुखी दुग्ध होय गरल,
श्वानपुच्छ नलिकेत घातले होईना सरल !
दौलत थिजला, परि न खलांचा दुष्ट यत्न विझला,
जवान दुसरा ती नव कलिका तोडाया सजला !
करूनिया निर्धार मनाचा, धरून तलवार,
गेला कृष्णेजवळ नीच तो करावया वार !
करीत होती हार फुलांचा जाईच्या रमणी,
जणो करी स्वकरे तरुणांची हृदये बद्ध गुणी !
हिमधवलांगी धवलचंद्रिकाहृदया बाला ती,
धवल फुले ती धवल कराने धवल गुणी गाठी !
कृष्णहृदय धवलतेजवळ ते झाले धवल पळी,
नवल न, धवलच बिंब शशीचे विलसे नील जली !
तिच्या दिव्य तेजाने दिपला भाला, कंप करी,
उगारलेले शस्त्र तयाचे गळले भूमिवरी !
टिकले पुण्यप्रभावापुढे नाही पळ दुरित,
भग्नमनोरथ परत दुरात्मा गेला थरथरत !

६

गळून पडले शस्त्र पुढे ते – निशाण मरणाचे !
धरून जे स्वकरी भूमिवरि स्वैर मरण नाचे !
परि नाही ती धैर्यदेवता तिळभर डगमगली,
मधुस्मिताची खळी कपोली उलट तिच्या पडली !
परि मातेने तिच्या मांडिला एकच आकांत,
मातृहृदय ते ! करील कैसा सहन सुताघात !
पिटी उरःस्थल, कुंतल तोडी, कर माथा हाणी,
धाय मोकलुनि रडे, धरेला अश्रूंनी न्हाणी.

७

पाषाणालाही शोकाने त्या पाझर फुटता,
परि न तयाने वळले खळ ते, त्यजी न विष कटुता !
शस्त्र न चाले म्हणुनि विषाने भरलेली वाटी,
आणून दिली जनकाज्ञेने कृष्णेच्या हाती.
स्मितवदनाने करी विषाचा धरून तो प्याला
पदरे नयन पुशी मातेचे, वदे वीरबाला,
‘का करिसी हा शोक ? आणिसी का नयनी पाणी ?
कवण वाचला सांग, भूवरी आजवरी प्राणी !
मृत्युबलाने तुटे भवाची दुःखाची गाठी !
वाट जिवाला चिरसौख्याची मृत्यु मात्र दावी,
वद, मग आली मरणाची का संधि घालवावी ?
जन्म जयाने दिला तोच या जीवाचा स्वामी;
भाग्यवंत ती, पडे संकटी जनकाच्या कामी !
धिग् जीवित ज्याकरिता पडती बळी असंख्यांचे !
मरण यशाचे जर त्या योगे देश-धर्म वाचे !’

८

देऊन असा धीर, विषाचा घेई ती घोट,
मोहमूढ मातेस नावरे अश्रूंचा लोट !
एकदोनदा घोट विषाचा नाही तिज पचला,
दुष्टांनी यास्तव नाशाचा बेत नवा रचिला !
हाय ! कुसुंबा प्याया धरिला पुढे तिच्या ओठी,
मालविली यापरी खलांनी ती रत्नज्योती !
केला, अनुमोदिला जयांनी कृष्णेचा अंत,
त्यां शासाया चुकला नाही न्यायी भगवंत !
जसे करावे, तसे भरावे; बीज, तसे दाणे !
‘वि ना य का’ला करी बोध हा कृष्णेचे गाणे.

गो विं दा ग्र ज

# अवेळी ओरडणाऱ्या कोकिळेस

मध्यरात्रीच्या सुमारास कोकिळेचा शब्द विषण्ण व निराश हृदयाला किती सांत्वनपर वाटतो, याची सुखनिद्रित मनाला साक्ष पटणार नाही.

अवेळ तरिही बोल — कोकिळे — अवेळ तरिही बोल ध्रु०

रात्र पसरली जगतावरती,
भुरके काळे मेघहि फिरती,
वारा वाहे भरभर भवती,
बालचंद्रचंद्रिका घाबरी गोरीमोरी होत.

उदासीनता छाया पसरी,
सृष्टि दिसे वरुनी हसरी
खिन्नताच जरि अंतरि सारी,
व्यर्थ बोलतो, व्यर्थ डोलतो, संसाराचा गोल !

आनंदाच्या प्रातःकाळी,
दिवसाच्या गजबजल्या वेळी,
किंवा संध्या जेव्हा नटली,
आनंदाची गाणी गाया गवई लाख-करोड !

असता आनंदाची माया,
वृद्धि क्षणभर तिची कराया
लागे ज्याचा तोच गावया,
आनंदाला द्विगुणित करिती आनंदाचे बोल !

परंतु जेथे उदासीनता
व्याकुल करिते विषण्ण चित्ता,
तेथे त्याला द्याया समता
गाणे गावे, हेच अलौकिक ईश्वरतेचे काम.

बाह्यसृष्टि जरि निद्रा भोगी,
अंतःसृष्टि तरी हृतभागी,
उडते तशीच राहुनि जागी,
निजावया तिजलागी असले गाणे गाई गोड !

अवेळ येथे कसली बाई ?
दुःखसांत्वना गा केव्हाहि !
अनुकंपेला नियम न कांही !
रित्या मनी या ओत सूर, त्यां जाऊ दे अति खोल.

वळवाचा हा वारा गार
झोंबुनि पीडा देई फार,
येत गवाक्षातुनि अनिवार;
येता-जाता सूर काढितो भलभलते भेसूर !

खिन्न चांदणे ढगाआडचे,
भग्न मनोरथ झाले ज्याचे,
हसे जणू ते अशा मनाचे,
पुष्पवतीच्या तोंडावरची छाया काय उदास !

या अवकाळी, या एकांती
निद्रेची मिळवाया शांति
थकुनि भागुनी पडलो अंती,
निद्रा कुठली परि त्या हृदया, भविष्य नाही ज्यास.

हाती संसाराची माती,
मनिच्या आशा मनीच खाती,
भूतकाळची भूते रडती !
मिटल्या-जाग्या डोळ्यांपुढती शून्याचे मैदान !

निष्प्रेमाची शेज सोबती,
भयाण दुनिया सारी भवती,
विषण्ण येती विचार चित्ती,
बाह्यांतर विश्वात खेळते उदासीनता एक !

गा तर चित्ता मम रमवाया;
हीच खरी जादूची माया;
आनंदा खेळविणे वाया,
मशाल दिवसा लावुनि होतो लाभ कुणाला काय !

दूर कराया उदासीनता
गाच गडे ! अंगाई-गीता,
झोप येउ दे माझ्या चित्ता,
लक्ष लागते सुरांकडे तव; वाटति ते बिनमोल !

पाहुनि ही तव दयाशीलता
द्रवेल कोणी भगिनी माता,
शांत कराया हताश चित्ता
रूक्ष जगावर स्त्रीहृदयातिल टाकिल अश्रू एक !

त्या अश्रूच्या शीतलतेने
भोवतालची आग जाळणे,
निद्रा घेता शांत मनाने
'गो विं दा ग्र ज' ऐकत राहिल गुंगीतहि हे बोल !
कोकिळे ! अवेळ तरिही बोल !

बा ल क वी

# पारवा

भिंत खचली, कलथून खांब गेला,
जुनी पडकी उद्ध्वस्त धर्मशाळा;
तिच्या कौलारी बसुनि पारवा तो
खिन्न नीरस एकांतगीत गातो.

सूर्य मध्यान्ही नभा उभा राहे,
घार मंडळ त्याभवति घालिताहे,
पक्षि पानांच्या शांत सावल्यांत
सुखे साखरझोपेत पेंगतात.

तुला नाही परि हौस उडायाची,
गोड हिरव्या झुबक्यांत दडायाची.
उष्ण झळया बाहेर तापताल,
गीतनिद्रा तव आत अखंडीत.

चित्त किंवा तव कोवळ्या विकारे
दुखत खुपते का सांग, सांग बा रे !
तुला काही जगतात नको मान !
गोड गावे मग भान हे कुठून ?

झोप सौख्यानंदात मानवाची
पुरी क्षणही कोठून टिकायाची ?
दुःखनिद्रे निद्रिस्त बुद्धराज
करुणगीते घुमवीत जगी आज.

दुःखनिद्रा ती आज तुला लागे
तुझे जगहि निद्रिस्त तुझ्या संगे.
फिरे माझ्या जगतात उष्ण वारे.
तुला त्याचे भानही नसे बा रे !

# खेड्यातील रात्र

त्या उजाड माळावरती
बुरुजाच्या पडल्या भिंती
ओसाड देवळापुढती
वडाचा पार – अंधार दाटला तेथ भरे भरपूर

ओढ्यात भालु ओरडती
वाऱ्यात भुते बडबडती
डोहात सावल्या पडती
काळचा शार – त्या गर्द जाळिमधि रात देत हुंकार.

भर रानी काकस्थानी
उठतात ज्वाळ भडकोनी
अस्मान मिळाले धरणी
आर ना पार – अवकाळ रात्रिचा प्रहर घुमे तो घोर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....३७२८८.... वि: ......
क्रमांक .. ....१८३२.... नों दि: ......

चंद्रशेखर

# कवितारति

अये कविमनोभवे, सहजसंभवे, स्वामिनी,
सुवर्णमयदेहिनी, नवरसात्मके, भामिनी,
प्रसादमयजीविते, अनुविचार-संचारिणी,
चमत्कृतिविलासिनी, रसिक-सन्मनोहरिणी १

प्रसाद घडता तुझा सहज नाभिमूलांतुनी
अनन्य लहरी उठे, तनुसि टाकि ते व्यापुनी;
तिच्या प्रसरणासवे सकल देह हेलावतो,
क्षणैक चपलौघ की जणु शिरांतुनी धावतो. २

मुखांमधुनि एकदा गदगदा तदा ये ध्वनी,
स्वये उचमळोनि ये हृदय, नीर ये लोचनी;
न काव्यविषयाविना इतर भानही राहते,
रसात्मक पदावली मग मनोहरा वाहते. ३

करोत करणार ते किमपि जल्पना यावरी,
रसज्ञ कविबंधु तो अनुभवील हे अंतरी;
परंतु अनुभूति ही मजसि तीन वर्षे नसे,
अहा! प्रियजनावरी प्रियजने रुसावे कसे? ४

तुझ्यास्तव उपेक्षिल्या बहुविधा सुविद्या, कला,
तुझ्यास्तव न ती पदे, उपपदे मिळाली मला;
तुझ्यास्तव हुजूरचा जरि गुलाम झालो स्वता,
तुझ्यास्तवचि गांजलो परि निबंधनाते अता. ५

तुझ्यास्तव न लोभता विभवमार्ग मी टाळले,
तुझ्यास्तव सखे मला स्वजन तेहि कंटाळले;
तुझ्यास्तवचि हेलना मम गृहावधानी घडे,
तुझ्यास्तव जनाहुनि विजन हा मला आवडे. ६

तुझ्यास्तव तुझ्यापरी मृदुल देहिनी गेहिनी
अनेक समयी दिली ढकलुनी, अये मोहिनी !
तुझ्यास्तव जुमानिले नहि सुबंधु नारायणा,
सदा न सदुपासिले किमपि सूर्यनारायणा. ७

निशा दशदिशांसही गवसणी यदा घालिते,
सुषुप्ति निज मोहिनी स्थिरचरांवरी टाकिते,
प्रशांत समयी अशा भ्रमसि जेथ लीलावती,
अतंद्रितचि तेथ हा अनुसरे तुझा सोबती. ८

शरीरसुख सोडुनी, विभवपाश ते तोडुनी,
निजाप्त मन मोडुनि, अहित सर्वथा जोडुनी,
तुझ्या प्रणयबंधनी सतत गुंतुनी जो बसे,
रुसोनि कवितासखी ! विमुख त्यास व्हावे कसे ? ९

तुझे स्मरण होतसे मजसि राहुनी राहुनी,
उदास मन जाहले विरह साहुनी साहुनी;
तुझे श्रवण मी करी, मनन, घेतला ध्यास ना !
त्वदन्य हृदयेश्वरी ! मम जिवास ना वासना. १०

किती दिवस आणखी तळमळू तुझ्या कारणे ?
वियोगविष पाजुनी उचित का मला मारणे ?
नको, करु नको असे, सकल संग मी त्यागितो,
प्रसन्न परि हो मला, वर अनन्य हा मागतो. ११

भा. रा. तांबे

# निजल्या तान्ह्यावरी

जाति सुष्टिलता, राग केदार

निजल्या तान्ह्यावरी माउली दृष्टि सारखी धरी ।। ध्रु०

तिचा कलीजा पदरी निजला,
जिवापलिकडे जपे त्याजला,
कुरवाळुनि चिमण्या राजाला
चुंबी वरचेवरी. १

सटवाई जोखाइ हसविती,
खळी गोड गालांवरि पडती,
त्याची स्वप्ने बघुनि मधुर ती
कौतुकते अंतरी. २

अशीच असशी त्रिभुवनजननी,
बघत झोपल्या मज का वरुनी ?
सुखदु:खांची स्वप्ने बघुनी
कौतुकशी का खरी ? ३

भा. रा. तांबे

# निजल्या तान्ह्यावरी

जाति सुष्टिलता, राग केदार

निजल्या तान्ह्यावरी माउली दृष्टि सारखी धरी ।। ध्रु०

तिचा कलीजा पदरी निजला,
जिवापलिकडे जपे त्याजला,
कुरवाळुनि चिमण्या राजाला
चुंबी वरचेवरी. १

सटवाई जोखाइ हसविती,
खळी गोड गालांवरि पडती,
त्याची स्वप्ने बघुनि मधुर ती
कौतुकते अंतरी. २

अशीच असशी त्रिभुवनजननी,
बघत झोपल्या मज का वरुनी ?
सुखदु:खांची स्वप्ने बघुनी
कौतुकशी का खरी ? ३

# रिकामे मधुघट

अनुक्रम ३७... दि: ...
क्रमांक ... नों दि ...

जाति नववधू, राग बागेश्री

मधु मागशि माझ्या सख्या, परी
मधुघटचि रिकामे पडति घरी ! ध्रु०

आजवरी कमळाच्या द्रोणी
मधू पाजिला तुला भरोनी,
सेवा ही पूर्विची स्मरोनी
करि रोष न सखया, दया करी. १

नैवेद्याची एकच वाटी
अता दुधाची माझ्या गाठी;
देवपुजेस्तव ही कोरांटी
बाळगी अंगणी कशी तरी. २

तरुण-तरुणिंची सलज्ज कुजबुज,
वृक्ष-झऱ्यांचे गूढ मधुर गुज,
संसाराचे मर्म हवे तुज,
मधु पिळण्या परि रे, बळ न करी ! ३

ढळला रे, ढळला दिन सखया !
संध्याछाया भिवविति हृदया,
आता मधूचे नाव कासया ?
लागले नेत्र रे पैलतिरी. ४

माधव

# जिवबादादा बक्षी

१.

समशेरीला समशेर – गनिमाची अजुनि न भिडली,
गर्जना न एकहि अजुनी – गगनाला फाडित उठली,
राजांची मैदानाच्या – पहिलीच सलामी झडली !
सैन्याचे काळिज मूर्त
जरिपटका ध्वज विख्यात
घेउनी रणातुनि पळत
नादान तोच हा कोण ?

२.

यदुवंशविलासनृपांनी – आसेतु करुनि थैमान
लाविले द्रविडराजांना – ज्यापुढे कराया नमन.
जो मिरवित भाऊराये – हालविले हिन्दुस्तान,
हालत्या घड्यांवर ज्याच्या
मसनदी हलति यवनांच्या;
त्या ध्वजास निज राष्ट्राच्या
कालिमा कोण हा लावी ?

३.

पळपुट्या राउताला या – गाठुनी ओढुनी खाली
दावील जरीपटक्याला – रण पुन्हा असा बलशाली
सुत एक महाराष्ट्रीची – माय काय नाही व्याली ?
दासींचे सगळे पोर
दास्यची जयांना प्यार
काय हे असे झुंजार
झुंजाया जमले समरी ?

४.

निर्जीव परी राष्ट्राचा – जीव ते निशाण निघाले !
एकाहि तरी धमनीत – नाहीच रक्त सळसळले !
थंडेच जागच्या जागी – सर्वही मराठी भाले !
विस्मरण न हे स्वत्वाचे,
हे मरण राष्ट्रधर्माचे !
हे भावि गुलामगिरीचे
डोहाळे समजा पहिले !

५.

पण नको अशुभ ही वाणी – आल्याच दुरुनि या हाका !
ये दौडत दौडत वेगे – भालाइत कोणी वाका !
कोण हा महाराष्ट्राच्या – इभ्रतिचा पाठीराखा ?
रोधिले पुढुनि मार्गाला,
अडविला पलायनवाला !
हिसकिले जरीपटक्याला,
थुंकुनी मुखावर बोले,

६.

" नेशील कुठे नादाना ! – चेतना महाराष्ट्राची ?
जोवरी जागती ज्योत – जीवाची या जिवबाची;
जा खुशाल आता पळुनी – परवा न कुणाला त्याची !
नवतिचा न हा हंगाम,
हा नव्हे सुरतसंग्राम,
हा सर्वस्वाचा होम
राष्ट्रास्तव रणफन्द्यांचा !

७.

" पळशील किती रे पळुनी – अति नाजुक तू उमराव !
शिद्यांच्या तोफांमागे – जा लपुनि बैस ! वाचीव
निज राष्ट्राहुनिही प्यारा – आपुला अमोलिक जीव !

तान्हेल्या शस्त्रां आजी
रिपुरुधिरे पाजुनि ताजी
एकलाच राखिल बाजी
हा जिवबा शिवशाहीची !

८.

" अकलेचे शहर पुण्याच्या – वाजले दिवाळे खास !
भरितात घरे मुत्सद्दी – दौलतिचा करुनी नाश !
सर्दारी म्हणुनिच असल्या – ये रांडचा राघोजीस !
गुल्जार असे सर्दार
संगरी काय करणार ?
एकची खास खंबीर
दौलतिचे दौलतराव ! "

९.

इतुकेच बोलुनी बोल – मारिली टाच अश्वाला,
एकदाहि वळुनी मागे – पाहिले न त्या भ्याडाला !
रणकेसरि हरिपंताला – रणभीरु कारटा झाला,
म्हणुनिया व्यथित जरि चित्त
फौजेत परतला त्वरित;
फडकत्या ध्वजासह शिस्त
चैतन्य नवे दळभारी.

१०.

फडफडे जवे जरिपटका – तडफडे शत्रु लवलाही
तोफांच्या मारगिरीने – यवनांची फुटली लाही !
तुटुनिया शिरे किति पडली – गणतीच तयांना नाही !
चेतले युद्ध घनघोर
लागला निजामा घोर !
स्वाधीन करुनि मश्रूर
श्रीमंतां आला शरण !

११.

धन्य धन्य जिवबामर्द – मर्दुमकी त्याची न्यारी !
धन्य ते तयाचे वीर – धन्य तीहि कर्तबगारी !
हा जरिपटका ध्वज धन्य – धन्य ही यशस्वी स्वारी !
या महाकालिका धन्य !
हे विजयी भाले धन्य !
समरघोष 'हर ! हर !' धन्य !
धन्य ही धन्य शिवशाही !

१२.

सजवुनि दलबादलडेरे – दरबार भव्य भरवोनी,
सत्कारुनि जिवबालागी – गौरविले श्रीमंतांनी,
केला मग जयजयकार – दरबारी उमरावांनी !
"शौर्याचा पारावार !
शिवशाहीचा आधार !"
गर्जले मराठे वीर,
"हा जिवबादादा गाजी !"

१३.

जरि अन्याच्या उत्कर्षी – असहिष्णु आजवरि झाले,
चमकले तेहि परि आज – नानाचे हिरवे डोळे !
मारुनी मिठी जिवबाला – फडनवीस नाना बोले,
"आणोनी परत निशाण
रक्षिला न केवळ मान,
परि वाचविला रे प्राण,
जिवबा, त्वा शिवशाहीचा !"

# प्रेम होईना तुझ्याने

प्रेम होईना तुझ्याने, प्रेम माझे राहु दे !
आचरू ये धर्म तूझा तू नि मी माझा मुदे.
    प्रेम होईना तुझ्याने, दोष हा नाही तुझा,
    स्वस्थ राही तू सुखे, ठेवी न चित्ती किन्तु, जा.
प्रेम होईना तुझ्याने, प्रेम होई का हटे ?
प्रेम द्या, अन् प्रेम घ्या, काव्यीच हा सौदा पटे.
    प्रेम होईना तुझ्याने, दैव ही क्रीडा करी,
    वारि-भासाची मजा ती वालुकेच्या सागरी !
प्रेम होईना तुझ्याने, मी न दैवाला गणी,
स्वप्नवत राहील चित्ती गोड माझी लागणी.
    प्रेम होईना तुझ्याने, स्वर्ग थाम्बे स्वस्थली,
    भूतलीची सम्पदा नाही अजूनी सम्पली.
प्रेम होईना तुझ्याने, राख का घालू शिरी ?
का श्मशानाची कळा आणू मनाच्या मन्दिरी ?
    प्रेम होईना तुझ्याने, जाउ दे ते बापुडे !
    मत्स्मृतीला माळ तू घालू नको वाया पुढे !

# रावबहादूर ठोसर

बडे सुधारक कोण खरोखर !
भव्य बङ्गला, बगिचा भवती,
विचित्र सुमने नव टवटवती,
ठळक अक्षरे पाटीवरती
'रावबहादुर के. व्ही. ठोसर' १

शहराबाहिर नवी वसाहत,
अलग बङ्गले बड्याबड्यांचे
वकील, डाक्तर, हपीसरांचे,
रङ्गाकारहि विविध तऱ्हांचे,
गमे फिरावे शोभा पाहत. २

बहादुरांची तऱ्हा आगळी ।
आत चहाच्या त्या मेजावर
उपकरणी झळकतात सुन्दर,
प्रातराचमन करिती मन्थर
रावबहादुर आणि मण्डळी. ३

नाव न सुललित – केरो विष्णू
दोष कुणाचा ? अडले कोठे ?
पदवी मिळवुन झाले मोठे,
म्हणोत कोणी काही खोटे !
असती ठोसर आणि सहिष्णू ४

गरीब होते, झाले गब्बर,
शोधक बुद्धी, भेदक दृष्टी;
रसवन्तीची मोहक वृष्टी
सलील अभिनव निर्मी सृष्टी;
अदालतीमधि हे मातब्बर. ५

हटकूनी जो जिङ्की खटला,
बुद्धिधने जो खऱ्यास अडवी,
कशीहि बाजू छानुन पटवी,
‘ वकील ’ त्याला यथार्थ पदवी;
न्याय कायद्यापुढे लटकला. ६

यात का बरे म्हणता अर्थ न ?
अर्थप्राप्तीस्तव हा धन्दा;
कुणीहि निन्दा अथवा वन्दा ?
पोटोबाचा कोण न बन्दा ?
वकिली म्हणजे पक्षसमर्थन. ७

ठोसर त्यातुन निकोप मध्यम,
वृत्ति सदोदित आशावादी,
स्वार्थ बघुन ती परार्थ साधी,
समुचित वदुनी स्वर संव्वादी,
न ढळायाचा बहुधा संय्यम. ८

असे कायदेबाज बिलन्दर !
सद्दीची वर कमान चढते,
विलायतेची यात्रा घडते,
परी स्वताला पैहि न पडते;
ताले त्यांचे असे शिकन्दर. ९

नरम गरम माण्डघोळ डगला,
सरळ उभा, ती तऱ्हा पारशी,
पगडीची झिळमिळ पहा कशी !
सोनकडी डोळ्यांस आरशी,

स्वच्छ वेष सम्भावित सगळा. १०
नेत्रे निळसर आणि थोर ती.

दोन आडव्या रेषा भाळी,
ओठ मिशांच्या लपले खाली,
मानेवरती अर्धी काळी
सञ्ज.बाची चन्द्रकोर ती. ११

अ णि पुढे तकतकीत टक्कल.
उगीच का हे दैव उगवले?
वदन गुलाबी हे घवघवले,
शरीर सुखवस्तू लवथवले,
वकिली परि तरतरीत अक्कल. १२

थकता रात्री आरामास्तव
तर्र कराया मेन्दू सुकला
नेमस्त असा चषक न चुकला;
शुद्धीला कधि जीव न मुकला,
निन्दा वास्तव नको अवास्तव. १३

सुशिक्षिताचा, अन मर्यादित,
म्हणुन, दोष हा, परन्तु वगळा;
संन्सार पहा यांचा सगळा,
धुतला तान्दुळ, सफेत बगळा.
चाले योगक्षेम अबाधित. १४

भङ्गायाचा यांचा नेम न;
अन्थरुणी हरिनाम, भुपाळी,
सहल मागुनी दूर सकाळीं,
स्नान आणि मग गन्धहि भाळी;
करि गीतामृतपान पुढे मन. १५

विद्यार्थ्यांची जिवन्त कळकळ;
दिवस कठिण ते कधीच सरले

न हे म्हणूनी त्यांस विसरले,
यांच्या मदतीवर बहु तरले,
पसार झाले असेहि पुष्कळ. १६

सार्वजनिक हितकारक संस्था,
हातभार यांचा न चुकावा,
वचनांचा वर्षाव न ठावा,
सर्कारला लव न सुगावा,
गुप्तदान हा धार्मिक रस्ता. १७

अध्यक्षाचे यांस सदा पद.
उदार यांची रसाळ वाणी
माण्डी जनतेची गाऱ्हाणी;
तडजोडीची रीत शहाणी,
थोडी का जनसेवा तापद? १८

नाशनिष्ठ भावनानुसारी
बेफामीने म्हणती, 'धावा'!
पुढील मागिल पोच न ठावा;
कार्यभाग तर कुणि साधावा?
नेमस्तांनी, तेच पुढारी. १९

आपुलिकीची त्यांची भाषा
स्पष्ट दोष दे हिन्दूंनाही,
परी कुणाला विषाद नाही;
त्यात मिठाची मिठास राही.
सावधता, अन श्रद्धा, आशा. २०

'विलायतेमधि असता आम्ही'
यायचेच हे ध्रुवपद मधुनी,
हसायचा परि सभेत न कुणी

सूक्ष्म निरीक्षण येता दिसुनी
आणि अस्खलितपणी न खामी. २१

घरी अमूल्यच तो ग्रन्थाशय,
स्पेन्सर, मोर्ले, लट्ठ पुस्तके,
लेख, चरित्रे, क्वचित नाटके,
परि न त्यातले एक फाटके,
नीटनेटके फार महाशय. २२

न रुचायाचे काव्यरसायन;
वस्तुस्थितिची ज्यात न गमके
अशी जुळविणे सताल यमके,
श्रेयस्कर त्याहुन हे चरके,
देई अडके तरि सूत्रायण. २३

शौक बुकांचा परी न अवसर,
अशिलांची वर्दीवर वर्दी,
कामाचीही अलोट गर्दी,
कायद्यात हे पक्के दर्दी,
अमदानीला कोठुन ओसर ? २४

पथ्य राहणी शिष्ट ठराविक,
भोजन साधे साजुक-नाजुक;
नेमस्तपणामधे सदा सुख,
घरी ' डबल्टी ' नव्हते ठाउक
तर का गुपचुप ? बुजलिल भाविक. २५

कळपात न कुणी खाई रञ्जक
निवडक रत्ने जेव्हा जमती,
काटे, चमचे जव चमचमती;
उधळी मुक्ताफळे शीघ्रमति;
अनश्लील ती भाषा, व्यञ्जक ! २६

रावबहादुर हे लोकप्रिय,
नसती केवळ बोलघेवडे,
– तशी मिरवती बहुत भेकडे;
कण्ठीरव ! बल कण्ठि तेवढे –
सुधारणा पण यांची सक्रिय. २७

# वंदन तुज मायभूमि

चाल : बहु असोत सुंदर ०

वन्दन तुज मायभूमि ! हे अखेरचे,
न कळे तव दर्शन कधि फिरुन व्हायचे !
विसकटली बसवावी फिरुन ती घडी,
तव काजी झिजवावी शक्य तो कुडी,
आशेची फोल परि भ्रमुनि वावडी,
देशोधडि लागे ही आज बापुडी,
आचवलो जननीच्या सौख्यकारणा,
आचवलो तेवि तुझ्या क्लेशवारणा,
काय म्हणू परिसमाप्ति ही तुला रुचे ?
वन्दन तुज मातृभूमि हे अखेरचे. १

यश मळले उजळाया फिरुनि त्याप्रती
तळमळलो, धडपडलो निशिदिनी किती,
परि भूवरि पाय कुणी टेकु ना दिला,
काकांचे जेवि थवे भ्रष्टल्या पिला,
काडीचा आधारहि मानिला महा,
झाली परि फसवणूक नित्य दुस्सहा.
मान उन्च करु पाहे कोवळी कळी,
धडगत लागेल तिची केवि वादळी ?
झिडकारुनि दिधले जे लेकरू तुवा,
टाकलास ज्याचा तू तोडूनि दुवा,
तरि त्याच्या नच खळती अश्रु नेत्रिचे,
वन्दन तुज मातृभूमि हे अखेरचे. २

मरणाच्या दाढेमधि चाललो जरी
मरणाच्या भीतिचा न लेशही उरी,
मरणाच्या खाईमधि आयु कण्ठले,
मरणाचे काय तया बुजग-बाहुले ?
ग्रीष्माचा दाह काय वाळल्या तृणा ?
राखेला जाळिल का अग्नि तो पुन्हा ?
परि तुझी न भेट मला व्हायची पुढे,
ह्या शल्ये हे तुटते मात्र आतडे,
मिळणार न अन्त्य शयन गे त्वदङ्किचे,
वन्दन तुज मातृभूमि हे अखेरचे. ३

# गृहिणी मी; नच देवी

जाति : इन्दुमुखि

दूर सरा, सुखवु नका, रिझवु नका मज, सखया !
वाढविते माझ्यातिल दुबळेपण तव माया
विकसाया वेलीवर फूल हवे ना सहजी ?
तरि उनात, पावसात डोलू द्या कलिका जी.

दाखविता कळकळ जी सुखमय का ती मजला ?
होइन या कळकळिने अधिकाधिक मी अबला.
अबला नच, तुल्यबळ होऊ द्या मजलागी,
संन्सारी समसमान दोघांची जरि भागी.

आश्रयेचि शोभतसे कविता, लतिका, वनिता,
छे, शोभा गणता जी ती तर की दुर्बलता.
शोभा का वागवुनी दुर्बलास कटि-खान्दी ?
आश्रित मी नच लतिका, अङ्गभूत मी फान्दी.

तुमच्या इतुकेचि मला वाहू द्या शिरि ओझे,
तनु होवो धर्मजले थयथयते कारन्जे.
बिन्दि-बिजवरा न देइ घामाहुनि कधि शोभा,
माय दत्तकावरी न तनयाहुनि धरि लोभा.

प्रेमाने घास तुम्ही मज द्यावा, मी घ्यावा –
प्रेमाचा खेळ काय हक्कचि मी मानावा ?
जोजविता का मज ह्या थाटुनिया सुखसोयी ?
का जीवन-सङ्गीता चाल एक अङ्गाई ?

झगडाया कष्टांशी पदर मला खोवू द्या,
विघ्नांच्या नजरेशी नजर मला भिडवू द्या,
घ्या करुनी मज तुमच्या इतुकी बल-गुणशाली,
मज पाङ्गुळगाड्याविण चालू द्या निज चाली.

हा प्रपञ्च दोघांचा; समायीक ही शेती —
दो हाती का मग हो! — पिकवू या चौहाती.
थापिन मी भाकरीहि चालवीन आणि विळा,
वाहिन शिरि घागरीहि, तेवि मोट वा शिवळा.

काच-बाहुलीसमान जपणे का प्रीत तरी?
आपुलिया सारखेच करणे ही प्रीत खरी!
मज अपुल्यासारखीच करुनी घ्या श्रमजीवी,
गेह नव्हे देव्हारा; गृहिणी मी, नच देवी.

घरकुलास दोघांच्या कष्टांच्या फुलमाळा
बान्धाया येतिल तरि तोच खरा सोहाळा,
त्यात शिळोप्यास बसू बोलत मग गुजगोष्टी,
आणि त्यातल्याहि काही अडखळल्या जर ओष्ठी
कळवाया त्या मजला वाटल्यास कुरवाळा,
प्रीत तीच रिझवील; नच निगराणी, नच चाळा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ...३५२५८... वि: ...
क्रमांक ...२६३२... नों दि. ...

अ नि ल

## पेर्तेव्हा

व्याकुळ पृथ्वी
प्रखर उन्हात होरपळता
जळताना जागोजाग वणव्यात
नव्हती एकहि हुंदका देत
दिसू देत अश्रू नयनांमधे
दाबीत होती आतल्या आत
दुःखांचे कढ
करूनी आपल्या जिवाचे पाणी
पुरवीत होती खोल मुळांना
फुटत होती तरूलतांवर
नवी पालवी
फुलोर, बहर, फुलाफळांचा
गाऊ लागले बुलबुल आणि
कोकिळहि घेऊ लागले ताना
उन्मत्त प्रीतीच्या, विरहार्ततेच्या
नवोन्मेषाच्या
वसंत ....... वसंत !
.......... तू मात्र शांत ! !

तू मात्र शांत........
दाटलेल्या कंठी
आटले होते जणू तुझे शब्द
वाढत होती तळमळ पण
हृदयामधे
नव्हते संगीत सळसळत —
व्याकूळ पृथ्वी

प्रखर उन्हात होरपळत !
..........तू मात्र शांत ! !

वसंत सरे, मोहर गळे
बिलगून फळे फांद्याफांद्यांना
वाढत होती, पक्व होत होती
कितीक गळून पडत होती
वाहता थोडेसे वादळी वारे
कोकिळाच्या गोड गीतात आता
भरलेली होती किती आर्तता -- !
वाट पाहत वेळ येण्याची
हृदयात पण हळहळत
तू मात्र शांत.........! !

.........तू मात्र शांत
पृथ्वीचाहि होता ताप वाढत
आसावलेल्या जीवांना भास
मृगजळाचेहि भुलवीत होते
वाऱ्याचा वाढत होता पण जोर
फडफड होत तुझ्या पंखांची
दूरची क्षितिजे न्याहळून तेव्हा
पाहून आलास वादळाच्या खुणा
आतुरपणे
तरीहि नव्हता फुटत शब्द
तू मात्र शांत.......!

घोंघावत होता रात्रभर वारा
दिवसा धुळीचे लोट, वावटळी
उठवीत होता
कडाडत होते जीर्ण वृक्ष आणि
मोडून पडत होत्या कितीतरी

कोवळ्या फांद्या
आणि संध्याकाळ होण्यापूर्वीच
क्षितिजाच्या कडा आक्रमीत होते
काळे-निळे मेघ
आणीत होता ओढून त्यांना
सोसाट्याचा वारा........
तुफान...वादळ....
आदळत ढग ढगावरती
व्यापीत आकाश
पृथ्वीच्या जवळ जवळ आले
अंधार भरे.........
क्षणभर होई सारे निःस्तब्ध !
आणि ओठावर आले तुझे शब्द ! !

चकाकली वीज
गंभीर घुमली घनगर्जना
निनादले तिचे साद पडसाद
सुरू झाली वृष्टी
मृगाचा पाऊस बरसू लागे
—— थरारे सृष्टी !
कडाडू लागल्या विजावर विजा
सरीवर सरी वर्षत गर्जत
वादळात आणि कल्लोळात त्या
आसरा निवारा सोडून देत
उडालास तू भराऱ्या घेत
बेफामपणे
मेघामध्ये वर
परत खालती माळरानावर
पुन्हा वर खाली नव्या भूमीवर
नांगरलेल्या

आणि विजांच्या लखलखाटात
मेघांच्या गंभीर गडगडाटात
फुटे तुला शब्द --
"भिऊ भिऊ भिऊ
नका भिऊ भिऊ
उठा रे, उठा रे सत्वर सत्वर
तत्पर तत्पर
पेरा, पेरा, पेरा,
नव बीजे पेरा,
नव्या आशा धरा,
पेर् ते व्हा! पेर् ते व्हा!!"

वादळ ओसरे तरीहि स्फुरे
तेच आर्त गीत!
माळरानावर
नांगरलेल्या नव्या भूमीवर
घिरट्या घालीत भराऱ्या घेत
ओतीत जासी तू कळकळीच्या
भावपूर्ण स्वरे
तेच शब्द आणि त्याच लकेरी
त्याच गीताच्या
पेर् ते व्हा! पेर्तेव्हा!!

# तटस्थ

अंधारी रात्र, सागर-किनारा
एकटाच मी, पडलेला वारा
कुणा न दिसता अस्ता जाणारा
असाच एक अनोळखी तारा

उगीच थोडेसे जळ चुळबुळे
मिसळत काही निळ्यात काळे
शिणून आणून तोंडाला फेस
वाळूच्या कणांना सांगत क्लेश

कुणीच कुणाला जाणत नाही
दिसते तरीहि पाहत नाही
कानी पडे पण ऐकत नाही
कुणीहि आपल्या भानावर नाही

निर्वेद क्षण हा रितेपणाचा
आपला आपण थांग घेण्याचा
तटस्थ मीहि, तटस्थ पसारा
अंधारी रात्र, सागर-किनारा !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....३५७८८ वि: काव्य
क्रमांक ....२६३२ नों दि: ..........

केशवकुमार

# प्रेमाचा गुलकंद

–बागेतुनि वा बाजारातुनि कुठुनि तरी 'त्याने'
गुलाबपुष्पे आणुनि द्यावित 'तिज'ला नियमाने!
कशास सांगू प्रेम तयाचे तिजवरती होते?
तुम्हीच उकला बिंग यातले काय असावे ते!

गुलाब कसले? प्रेमपत्रिका लालगुलाबी त्या!
लाल अक्षरे जणु लिहिलेल्या पाठपोट नुसत्या!
प्रेमदेवता प्रसन्न होई या नैवेद्याने!
प्रेमाचे हे मार्ग गुलाबी जाणिति नवतरणे!

कधी न त्याचा ती अवमानी फुलता नजराणा
परि न सोडला तिने आपुला कधिही मुग्धपणा!
या मौनातच त्यास वाटले अर्थ असे खोल!
तोहि कशाला प्रगट करी मग मनातले बोल?

अशा तऱ्हेने मास लोटले पुरेपूर सात,
खंड न पडला कधी तयाच्या नाजुक रतिबात!
अखेर थकला! ढळली त्याची प्रेमतपश्चर्या,
रंग दिसेना खुलावयाचा तिची शांत चर्या!

धडा मनाचा करुनि शेवटी म्हणे तिला, "देवी!"
(दुजीं आणखी विशेषणे तो गोडस तिज लावी.)
"बांधित आलो पूजा मी तुज आजवरी रोज!
तरि न उमगशी अजुनि कसे तू भक्ताचे काज?
गेंद गुलाबी मुसमुसणारे तुला अर्पिलेले
सांग तरी सुंदरी, फुकट का ते सगळे गेले?"

तोच ओरडुनि त्यास म्हणे ती, " आळ वृथा हा " की !
" एकही न पाकळी दवडली तुम्ही दिल्यांपैकी ! "
असे बोलुनी त्याच पावली आत जाय रमणी
क्षणात घेउनि ये बाहेरी कसलीशी बरणी !
म्हणे, " पहा मी यात टाकले ते तुमचे गेंद,
आणि बनविला तुमच्यासाठी इतुका गुलकंद !

कशास डोळे असे फिरविता का आली भोंड ? "
बोट यातले जरा चाखुनी गोड करा तोंड ! "
क्षणैक दिसले तारांगण त्या – परी शांत झाला !
तसाच बरणी आणि घेउनी खांद्यावरि आला ! !
" प्रेमापायी भरला " बोले, " भुर्दंड न थोडा !
प्रेमलाभ नच ! गुलकंद तरी कशास हा दवडा !"

याच औषधावरी पुढे तो कसा तरी जगला,
हृदय थांबुनी कधीच ना तरि तो असता ' खपला '!
तोंड आंबले असेल ज्यांचे प्रेमनिराशेने,
' प्रेमाचा गुलकंद ' तयांनी चाटुनि हा बघणे !

अनंत काणेकर

# चांदरात

चांदरात पसरिते पांढरी माया धरणीवरी;
लागली ओढ कशी अंतरी !
हा तालतरू गंभीर शांतता धरी;
लेउनी सुधेचे वल्कल अंगी शिरी,
कुणि शुचिर्भूत मुनि तपा जणू आचरी !
केस पिंजुनी उभी निश्चला कोणी वेडीपिशी,
भासते छाया काळी तशी !

जलवलयांचे तरल रुपेरी नूपुर पदि बांधुनी,
खळखळत गुंग झरा नर्तनी.
पांढरा पारवा हूं हूं कोठे करी,
क्षण मंद वायुने लता हले कापरी,
जणु शांतताच ही निःश्वसनाते करी !
लपतछपत विधुकिरण खेळती हिरव्या पानांवरी;
लागली ओढ कशी अंतरी !

निळ्या, तांबड्या, हिरवट, पिवळ्या तेजाची सांडणी,
करितसे व्याधाची चांदणी.
बेफाम पसरिते पंख हृदय-पाखरू
उडुनिया पाहते अनंत अंबर धरू !
या इवल्या देही कसे तया आवरू ?
चैन पडेना काय करू ?– ही आग लागली उरी,
लागली ओढ कशी अंतरी !

# ‘बेगमेच्या विरहगीता*’ला शिवाजीचे उत्तर—

मज पाहुनी तुवा गे । लिहिलेस बेगमे ते
अडखळत वाचुनीया । आनंद होइ माते.
ते ‘नाथ’ आणि ‘स्वामी’ । मज सर्व काहि उमजे
इश्की, दमिश्कि, दिलनूर । कांहीच गे, न समजे !
जरि या मराठमोळ्या । शिवबास बोध व्हावा,
तरि फारशी-मराठी । मज कोश पाठवावा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.......................... वि: ....................
क्रमांक .......................... नों: दि: ..................

* ‘बेगमेचे विरहगीत’— माधव जूलियन

बा. भ. बोरकर

# माझ्या गोव्याच्या भूमीत

माझ्या गोव्याच्या भूमीत
गड्या नारळ मधाचे
कड्याकपारींमधोनी
घट फुटती दुधाचे

माझ्या गोव्याच्या भूमीत
आंब्याफणसांची रास
फुली फळांचे पाझर
फळी फुलांचे सुवास

माझ्या गोव्याच्या भूमीत
वनश्रीची कारागिरी
पानाफुलांची कुसर
पशुपक्ष्यांच्या किनारी

माझ्या गोव्याच्या भूमीत
उन्हाळ्यात खारा वारा
पावसात दारापुढे
सोन्याचांदीच्या रे धारा

माझ्या गोव्याच्या भूमीत
येते चांदणे माहेरा
ओलावल्या लोचनांनी
भेटे आकाश सागरा

माझ्या गोव्याच्या भूमीत
चाफा पानाविण फुले
भोळाभाबडा शालीन
भाव शब्दांविण बोले

माझ्या गोव्याच्या भूमीत
गड्या साळीचा रे भात
दाढी आईच्या मायेने
सोनकेवड्याचा हात

माझ्या गोव्याच्या भूमीत
सागरात खेळे चांदी
आतिथ्याची अगत्याची
साऱ्या षड्रसांची नांदी

माझ्या गोव्याच्या भूमीत
जिव्या सुपारीचा विडा
अग्निदिव्यातुन हसे
पाचपोवळ्यांचा चुडा

माझ्या गोव्याच्या भूमीत
काळे काजळाचे डोळे
त्यात सावित्रीची माया
जन्मजन्मांतरी जळे

माझ्या गोव्याच्या भूमीत
लाल माती, निळे पाणी
खोल आरक्त घावात
शुद्ध वेदनांची गाणी

माझ्या गोव्याच्या भूमीत
खड्गा जडावाची मूठ
वीर-शृंगाराच्या भाळी
साजे वैराग्याची तीट.

माझ्या गोव्याच्या भूमीत
उंच घूड देवळांचे

ताजमहाल भक्तीच्या
अश्रूंतल्या चांदण्याचे.

माझ्या गोव्याच्या भूमीत
तृणी सुमनांचे गेंद
सिद्ध कुणब्यांच्या तोंडी
शुद्ध सौंदर्याचे वेद.

माझ्या गोव्याच्या भूमीत
सुखाहुनी गोड व्यथा
रामायणाहुनी थोर
मूक उर्मिलेची कथा.

# हृदयच जेव्हा होते कोकिळ

हृदयच जेव्हा होते कोकिळ
जरठ वनातहि फुले वसंत.
हृदयच होते भजन जेधवा
तृणातही भेटे भगवंत.

हृदयच जेव्हा घनी बहरते
जिणे बाहते बनुनी मोर.
हृदयच जेव्हा भरुनि वाहते
गंगेहुनि ते होते थोर.

आज अचानक असे जहाले
सांजहि भासे मला सकाळ.
प्राजक्ताच्या आसवात सखि
सवे मौक्तिके आणि प्रवाळ

सर सोन्याची होउन आलिस
गाढ कालची झाली ओढ.
आज लाभल्यामुळे हृदय तव
विषहि कालचे झाले गोड.

कु सु मा ग्र ज

# देवाच्या दारी

अभंग

– १ –

नाम तुझे गाती गाती थोर-सान
दारी तुझ्या दीन दान घेती.

चिखलात येता मूल माखोनिया
प्रेमे न्हाऊ तया घालितोसी.

किंवा ज्याचा प्राण भूके कासाविस
त्याला दोन घास भरविसी.

आणि येता कोणी पांगळा वा खुळा
त्यालाहि तू ळळा लावितोसी.

केव्हाचा रे उभा मीहि तुझ्या दारी
उशीर का परी आज असा ?

तूच भक्तासाठी सोसलीसे झीज
आणि आता नीज कशी आली ?

किंवा दारी तुझ्या आलो रित्या करी
म्हणोनिया दूरी राहिलास ?

अपेक्षिसी देवा काय नजराणा ?
कारण तू राणा जगताचा.

पावलात तुझ्या गुंतलेले मन
काय अन्य धन माझ्यापाशी ?

उघळित आज भक्तीचीच फुले
डोळे तुझे ओले करीन मी !

तूच पाठविले हातात या मला
नाही कोणी दिला वाटाड्याही.

वाटा कितीतरी तूच निर्मिल्यासे
बालमन कसे चुकेल ना ?

तूच दिले माझ्या डोईवरी ओझे
पंकी पाय माझे रुतविले.

तूच जागोजाग मांडिलेसी खेळ
राहिला न वेळ ध्यानी माझ्या.

आणि आता होता वेळ परताया
का रे देवराया कोपसी तू ?

– २ –

कोण्या वैभवात होऊनिया लीन
विसरसी दीन लेकरांना ?

म्हणतात तुझ्या दयेला न अंत
पुकारती संत थोरी तुझी.

चिमण्यांच्या घरा लाविसी मशाल
केवढी विशाल दया तुझी !

जळातले जीव तापल्या दुपारी
वाळवंटावरी ओढसी तू !

पाहसी तू शांत त्यांची तगमग
कोणाचा हा राग कोणावरी ?

कोण गुन्हेगार क्षमावंत देवा
क्षमेचा अन ठेवा कोणासाठी ?

तुझ्या महिम्याची प्रचंड पुराणे
गमती तराणे अर्थहीन !

तुझी पाषाणाने पहिलीच मूर्ति
घडविली, मति थोर त्याची !

आणि आता त्याच मूर्ति पुजवून
वेडे विडंबन करितात !

असो, भलेबुरे वदलोसे वाचा
काय मानायचा त्याचा राग ?

निखाऱ्यात बद्ध असताना पाय
अपेक्षिसी काय संकीर्तन ?

– ३ –

आणि आज मन शंकित हे होई
आहेस की नाही मुळात तू ?

भित्या भावनेला शोधायासी धीर
पाषाणास थोर मीच केले.

दुर्बलता माझी दडवाया गेलो
अधिक जाहलो दुर्बल मी.

टाकूनिया शस्त्र सोडूनिया रण
वाचवाया प्राण येथ आलो.

भीरुतेत माझ्या तुझे संगोपन
मीच केले मन रंजवाया.

परततो आता रणात माघारा
शूरांना निवारा समरात.

माझ्या जीवनाचा मीच शिलेदार
व्यर्थ हा पुकार तुझ्या दारी.

आहेस की नाही आज नसे चिंता
दोहीमधे आता भेद नुरे !

# ताजमहाल

वर पूर्ण चंद्रमा पसरी मायाजाल
वसुधेच्या वदनी लहरे हास्य सलील
ते समूर्त होउन तीरावर यमुनेच्या
हिमशुभ्र उभा हा संगमरवर विशाल !

कुणि देवदूत वा फुलवुनि पंख फुलांचे
तीरावर बसला मोजित कण शतकांचे
दे सूवर्णपूजक जनतेला संदेश
'धन एकच आहे जगती अमर कलेचे !'

की कालिंदीवर करण्याला जलकेली
कुणि यक्षलोकिची रूपगर्विता आली
त्या नितळ दर्पणी विवस्त्र होउनि पाही
निज लावण्याची उसासलेली वेली !

वा काव्य मनोहर, हो रचनेत बहार
यमकांपरि गमती भव्य समान मिनार
वर विहग कल्पना कलानंद बेहोष
तळि समाधिस्थ हो पण कारुण्य अपार !

पुनवेच्या अथवा सुधाशयावर शांत
हो विहार करुनी राजहंस विश्रांत !
चंद्रिका-मधूने भरे धरेचा पेला
हा तरंग मोत्यापरी तरारे त्यात !

जे घुमले, स्फुरले असंख्यशा हृदयात
प्रीतीचे उज्ज्वल उन्मादक संगीत
मधुगीताची त्या ही मंजूळ लकेर
चालली युगांतुन एका अन्य युगात !

की ब्रह्मांडाच्या अथांग या कासारी
ग्रहनक्षत्रांची फुलली कमले सारी !
या भू-पद्माच्या एक पाकळीवरती
हा थेंब दवाचा विलसे विमल रुपेरी !

हा अमर मानवी प्रतिभेचा शृंगार
तो उन्मन होता अथवा रचनाकार,
स्वप्नात पाहिला इंद्रमहाल, उठोनी
या धवल शिलेतुन करी स्वप्न साकार !

की असत्य केवळ प्रणयाचे प्राचीन
खोटीच देवता, मंदिर मात्र महान
वर उदात्ततेचे हे स्वर्गीय मनोरे
दडलेली खाली देहलालसा हीन !

कामांध शहाचे सजवायास पलंग
अपराध एकला ज्यांचा स्त्रीत्व अपंग
ओढल्या किती त्या रमणी राणिवशात
तो असे अनात्मा, नाही मदन अनंग !

शत अनामिकांचे त्या हे कबरस्तान
त्या अबल आसवांचे हे करुण विधान,
मखमली उशीपरि अवघे जीवितकार्य
हो मृदुल मंचकावर ज्यांचे बलिदान !

# मोट हाकलतो एक

येहेरीत दोन मोटा
दोन्हीमधी पानी एक.
आडोयाले कना, चाक
दोन्हीमधी गती एक.

दोन्ही नाडा-समदूर
दोन्हीमधी झीज एक.
दोन्ही बैलांचं ओढणं
दोन्हीमधी ओढ एक.

उतरनी-चढनीचे
नाव दोन धाव एक.
मोट हाकलतो एक
जीव पोसतो कितीक !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३८२५८ वि: काव्य
क्रमांक १६३२ नों दि:

# लपे करमाची रेखा

लपे करमाची रेखा
माझ्या कुकवाच्या खाली
पुशीसनी गेलं कुकू
रेखा उघडी पडली.

देवा, तुझ्याबी घरचा
झरा धनाचा आटला
धनरेखाच्या चऱ्यानं
तयहात रे फाटला.

बापा, नको मारू थापा
असो खऱ्या, असो खोटच्या
नही नशीब नशीब
तयहाताच्या रेघोटच्या.

अरे, नशीब नशीब
लागे चक्कर पायाले
नशिबाचे नऊ गिऱ्हे
ते भी फिरत राह्यले.

राहो दोन लाल सुखी
हेच देवाले सांगन,
त्यात आलं रे नशीब
काय सांगे पंचागन ?

नको, नको रे जोतिषा,
नको हात माझा पाहू.
माझं दैव माले कये
माझ्या दारी नको येऊ !

**बा. सी. मर्ढेकर**

# फलाटदादा, फलाटदादा,

*फलाटदादा, फलाटदादा,*
*येते गाडी, जाते गाडी;*
*फलाटदादा, आली ही-*
*पण*
*शिंगल पडला, गेली गाडी !*

हिम्मत तुमची खरी पहाडी,
फलाटदादा, फलाटदादा;
कितीक गेला गडी तुडवुनी
छातीवरती तुमांस समदा !

*फलाटदादा, फलाटदादा,*
*येते गाडी, जाते गाडी;*
*फलाटदादा, आली ही-*
*पण*
*शिंगल पडला, गेली गाडी !*

फलाटदादा, इंजनवाली
पसंद पहिली भपकेदार ?
का आता ही विलेक्ट्रिकीची
नवटी नागिण तल्लख-तार ?
किति पायाची छोट्या मोठ्या
मऊ चामडी गेला हुंगुन;
किती बुटांच्या ठोकर टाचा
फलाटदादा, गेला पचवुन !
सपाट, नाजुक, नखरेबाज
बिलगुन गेल्या किती चंपल्या;

किती रांगडी ठसकेदार
वहाण गेली दावित टिकल्या !

*फलाटदादा, बोला वो तुमि !*
*आली गाडी, गेली गाडी;*
*परी न हसला अथवा रडला,*
*रामरामचा फुफाट हरघडी !*

किती बावटेवाले दादा
मुछीदार अन मुछीबगर बी;
हमाल-पोर्टर निळेतांबडे
तुमी पाहिले हजर्‌जबावी !
पचक् पान ह्यो कुनी थुंकले;
कुनि मायेचे निरोप दिधले;
बिडि-माचिस् कुनि इकीत फिरले;
विलायती कुनि मुके घेतले !
हर् गार्डाची न्यारी शिट्टी;
हर् ड्रायव्हर्‌चा न्यारा हात;
तुमांस दादा ठाउक आहे
पर् समद्यांची बारिक बात !

*बोला वो तुमि, बोला वो तुमि,*
*फलाटदादा, आली गाडी:*
*उरात गुपिते कितीक तुमच्या !*
*बोला वो तुमि !*
*गेली गाडी:*

किति तोऱ्याने ऐटबाज अन
दिमाख दावित, घेत सलामी,
'शरू' गाडी ही येई-जाई
झगाळ, जनु की रानीवानी !
मनात ठसली फलाटदादा,

झोकदार ही पल्लेवाली ?
फटाकडी वा ‘लोकल’ गाडी
चटक्‌चांदणी थिल्लर पटली ?
लटांबराची गबाळ संथ
मालगाडि का बोलघेवडी –
बरी वाटली ऐसपैसशी,
घरलक्षुमि जनु यडीभाबडी ?

*फलाटदादा, बोला, बोला !*
*मिस्किल शिंगल हिरवा झाला;*
*गेली गाडी:*
*फलाटदादा,*
*आता तरि वो बोला, बोला !*

मिस्किल शिंगल, भोळा साधा;
सीधे रूळ नि खडी गोमटी;
कुरूप काळी पाठ लावता,
ज्या जीवाला धरिले पोटी.
ह्या समद्यांच्या गोष्टी सांगा;
फलाटदादा, आली गाडी;
बोला वो तुमि ! पाठ टेकतो.
शिंगल पडला:
गेली गाडी.

फलाटदादा,
फलाटदादा,
बोला वो तुमि;
गेली गाडी :
बोला वो तुमि !
फलाटदादा,
फलाटदादा...!

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम ३५४२८ वि: ०८३/०८
क्रमांक ७६३२ नों दि:

टीपा

## ज्ञानदेव ( इ. स. १२७५–१२९६)

'ज्ञानियांचा राजा गुरु महाराव । म्हणती ज्ञानदेव तुम्हां ऐसे' असे म्हणून संत तुकारामांनी संत ज्ञानदेवांना वंदन केले आहे. महाराष्ट्रातील भागवतधर्ममंदिराचा पाया संत ज्ञानदेवांनी घातला. ज्ञानदेवांची ज्ञानदेवी (श. १२१२) म्हणजे श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे सुंदर 'देशीकार लेणें' होय. गीतेतील प्रतिपदाचा झाडा देत लिहिलेली ही मराठी टीका ज्ञानदेवांच्या प्रसन्न वृत्तीमुळे, अपूर्व कल्पनाशक्तीमुळे आणि प्रत्यक्षानुभवामुळे खऱ्या अर्थाने 'भावार्थदीपिका' झाली आहे. ज्ञानदेवीची अक्षरे पैज मारून अमृताला रसाळपणात जिंकितात. गूढानुभव आणि अध्यात्मविद्या प्रकट करणारा ज्ञानदेवांचा 'अमृतानुभव' हाही ग्रंथ आपले काव्यरूप लपवू शकत नाही. यामुळेच परतत्त्वाला स्पर्श करणारे ज्ञानदेवांचे कवित्व संजीवनी-सारखे महाराष्ट्राला सतत चैतन्य देत राहिले आहे. 'चांगदेवपासष्टी' म्हणजे ज्ञानदेवांनी हटयोगी चांगदेव यांच्याशी केलेला पत्रसंवाद. द्वैतापासून अद्वैतापर्यंत आलेल्या स्वानुभवाचे केवळ ६५ ओवींत केलेले हे चित्रण. ज्ञान-देवांचे 'अभंग' सुबोध आणि सुंदर आहेत. कृष्णाच्या सगुण रूपाचे त्यात मनोहारी दर्शन घडत जाते. हे 'परलोकीचें तारूं' अवघ्या एकविसाव्या वर्षी ऐलथड सोडून पैलथडी निघून गेले. पुण्याजवळील आळंदीत समाधिस्थ झाले !

प्रस्तुत ओव्या राजवाडे-प्रतीतून अ. १ (५०–५५) अ. १८ (१६७५–१६८७) आणि, आणि (५६–६१) अशा घेतल्या आहेत.

**आता भारतकमलपरागु ......** **आमोदासीं** – दोन सुंदर रूपके. **गीताख्यु** – गीता नांवाचा. **कडसिले** – कढविले. **सनकादिकीं** – 'मुक्तेश्वरा'वरील टीप पहा. **मोकली गोठि** – मनमोकळ्या, खुल्या गोष्टी. **चावलिली निराली** — निराळ्या, वेगवेगळ्या बोलल्या गेल्या. **वोरसें** – प्रेमाने. वोरस = पान्हा, प्रेम, **वोजणा** – वीजण = पंखा; त्याचे द्वितीयेचे रूप. **चकोरतलगे** – चकोर पक्ष्याचीं पिलें. **थिरावलेनि अंतष्करणें** – स्थिरावलेल्या, शांत झालेल्या अंतःकरणाने. **आथिला** – संपन्न.

ज्ञानदेवांच्या ओवीतील उपमा-रूपक-दृष्टान्त-चातुर्य हृदयंगम आहे.

## मुक्तेश्वर ( इ. स. १६०९–१६६० )

संत एकनाथांचे नातू. पैठण येथे बराच काळ घालविल्यावर काशीक्षेत्री वास्तव्य. नंतर खूप देशाटन.

मुक्तेश्वर हे पहिले कलाकवी म्हणून ओळखले जातात. ग्रंथलेखनाचा हेतु ‘ जेणें वाढे उत्कट भक्ति ’ असे मुक्तेश्वरांनी म्हटले खरे; पण या हेतू-प्रमाणे त्यांचे लेखन झालेले दिसत नाही. मुक्तेश्वरांच्या महाभारताचा एकूण थाट भक्तिमार्गी संताचा नसून प्रतिभासंपन्न, अतिरसिक कवीचाच आहे. आपल्या महाभारताच्या रचनेमध्ये आपण व्यासांपेक्षाही काही विशेष करणार असल्याची मुक्तेश्वर अनेकदा जाणीव करून देताना दिसतात. मुक्तेश्वरांची प्रतिभा रूपकात फार रमते. एकनाथांप्रमाणे आध्यात्मिक रूपकेही मुक्तेश्वर लीलया रचू शकतात. श्लेष किंवा अनुप्रास या शब्दालंकारांचीही मुक्तेश्वरांना गोडी आहे. मधूनमधून निसर्गसौंदर्याचे रंगून जाऊन ते कलात्मक चित्रण करताना आढळतात. कल्पनावैभवाच्या बाबतीत बाणभट्टाबरोबर मुक्तेश्वराची तुलना करावीशी वाटते. मुक्तेश्वराच्या महाभारताचे, आदि, सभा, वन, विराट आणि सौप्तिक ही पाचच पर्वे उपलब्ध आहेत. पण तेवढयांतही मुक्तेश्वरांची व्यक्तिदर्शने, मनोविकारदर्शने, प्रसंगवर्णने, स्थल-चित्रणे अतिशय परिणामकारक झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. क्वचित संयम सोडून मुक्तेश्वरांची कल्पनाशक्ती उत्तानशृंगार रंगवू पाहते.

‘ संक्षेप-रामायण ’ या ग्रंथांत अंत्ययमके आणि विविध वृत्ते साधण्याचा मुक्तेश्वरांनी प्रयत्न केला आहे. पुढील पंडितकवींच्या परंपरेचे हे उगमस्थान होय. मुक्तेश्वरांची शुकरंभासंवाद, शतमुखरावणवध, एकनाथचरित्र, गजेंद्र-मोक्ष, हनुमंताख्यान इत्यादि लहान प्रकरणे आहेत.

प्रस्तुत वेचा मुक्तेश्वरकृत महाभारताच्या सभापर्वातील पंधराव्या अध्यायातील (ओ. १२१–१५४) आहे. यातील मुक्तेश्वरी रूपकांचे सौंदर्य विलोभनीय आहे.

**पूर्वसंदर्भ** — द्रौपदीवस्त्रहरणाचा प्रसंग. दुःशासन डाव्या हाताने द्रौपदीची वेणी धरून उजव्या हाताने तिचे वस्त्र हिसडीत आहे. अशा वेळी आपल्या पतींची आणि आप्तवर्गाची आशा संपली, हे पाहून द्रौपदीने आपला

मनोदूत द्वारावतीला पाठविला; आणि डोळे मिटून ती कृष्णाचा धावा करू लागली.

**सनकादिक** — ब्रह्म्याने तप केल्याने सनक, सनंदन, सनातन आणि सनत्कुमार या चार रूपांनी विष्णु त्याचा मानसपुत्र झाला. हे सर्व विष्णुभक्त आहेत. वैकुंठीच्या द्वारपाळांनी यांना आत जाण्यास अटकाव केला, तेव्हा त्यांनी द्वारपाळांस शाप दिला.

**कुंटिणी** — पिंगला ही रामभक्त होती. आपल्या पोपटाचे नाव 'राम' ठेवल्याने तिला सदैव रामनामजप घडला व ती वैकुंठाला गेली. **निर्वाणीं** – निरुपायाच्या स्थितीत; अतिसंकटात. **मानसतुळजापुरवासिनी** — विष्णूला माउली कल्पून वत्सलभक्तीचा उत्कट आविष्कार येथून पुढे साधला आहे. कालविपर्यासाचे हे मजेदार उदाहरण आहे. **पाणियांडि** — पाणोठ्यावर. **आवर्घांड** — कोंडणे, अडचणीत आणणे. **कडोविकडीं** — जोराने. **आडी पडणें** — प्रतिबंध करणे. **ओवी** १५ ते २६ या १२ ओव्या म्हणजे मुक्तेश्वराने द्रौपदीच्या तोंडी घातलेले दशावताराचे रूपक होय. मुक्तेश्वराची एकसंध रूपकमाला बांधण्याची चातुरी अभ्यसण्यासारखी आहे. **बौद्धरूपिया** — पुन्हा कालविपर्यासाचा दोष. **ओ.** ३०–३१–हे एक सुंदर परंपरित रूपक.

## तुकाराम ( इ. स. १६०८–१६५१ )

'तुका झालासे कळस ।'

संत ज्ञानदेवांनी पाया घातलेल्या महाराष्ट्रभागवतधर्ममंदिराचा कळस म्हणजे संत तुकाराममहाराज होत. सुखासमाधानाने वाण्याचा व्यवसाय करणाऱ्या तुकोबाला विरक्ती आली. कारण 'दुष्काळे' द्रव्य आटले, मान गेला, अन्न-अन्न करता बायको मेली. व्यवसाय तुटींत आला. तुकोबा जिवाला त्रासले, आणि डोंगरावर जाऊन बसले. बाबाजी चैतन्य यांनी त्यांना स्वप्नातच गुरूपदेश दिला. असे हे तुकोबा भावबळावर पुढे साक्षात्कारी संत झाले.

तुकारामांचे अभंग म्हणजे त्यांचे आत्मिक जीवनचरित्रच. त्यात भावनेच्या

कितीतरी उत्कट छटा आहेत, आणि त्या साऱ्या भक्तीच्या रंगाने रंगून गेलेल्या आहेत. देव भेटेल ही आशा आहे, तो काही केल्या भेटत नाही, याचे दारुण दु:ख आहे, पण देव आपणांस असा पोरका सोडणार नाही. याचा विश्वास आहे. तरीही त्याच्या अंत पाहण्याला सीमा नाही; लोक उगीच आपणास मोठे मानतात याची खंत आहे. धड प्रपंच नाही, धड परमार्थही नाही, अशी फजिती आहे; अखेर देह कर्वती घालण्याची सिद्धता आहे... देव भेटतो; तुकारामांना सगुण साकार विट्ठलमूर्ती दिसू लागते. अणुरेणूहून थोकडा तुका आकाशाएवढा होतो ! जेथे जाईल, तेथे देव त्याचा सांगाती ! तुकारामांच्या आनंदाला आता क्षय नाही. त्यांना मिळविण्या-सारखे काही उरलेच नाही. तुकाराम उपकारापुरते उरले; ते भक्तीचा डांगोरा पिटीत राहिले. मुक्तीहून श्रेष्ठ अशा भक्तीचे सुख लुटीत राहिले. एके दिवशी वैकुंठीचे विमान आले, आणि जगाचा 'राम-राम' घेत तुकाराम सदेह वैकुंठी गेले.

तुकारामांची 'अभंगवाणी' पंढरीला, पुंडलिकाच्या भेटी आलेल्या, अट्‌ठावीस युगे विटेवर उभ्या राहिलेल्या सावळ्या सुंदर विट्ठलाला वाहिली आहे. त्यांच्या वाणीचा तोच बोलविता धनी आहे. स्वप्नात येऊन संत नामदेवांनी शतकोटी अभंगांची रचना करण्यास त्यांना सांगितले. पण तुकारामांची अभंगसंख्या पाच-एक हजारच भरते. देहूच्या या संताच्या वाणीचे सारे सौंदर्यसर्वस्व त्याच्या जिव्हाळ्यात, भावोत्कटतेत आणि आश्चर्य वाटावे इतक्या अचूक शब्दयोजनेत आहे. 'मंत्रगीता' हा गीतेचा अभंगानुवादही तुकारामांचाच असल्याचे आज मान्य होत आले आहे.

प्रस्तुत निवडलेले अभंग सरकारी गाथ्यावरून घेतले आहेत. तुकोबांचा विठोमाउलीवरील अनन्यसाधारण 'प्रेमा' या अभंगांतून उत्कटतेने जाणवतो.

**आळी** — बालकाचा गोड हट्ट. **धाले** – तृप्त झाले.

## रामदास (इ. स. १६०८–१६८१)

रामदास हे रामाचे उपासक. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांना रामदर्शन झाले; आणि त्यांचे मूळ 'नारायण' हे नाव जाऊन 'रामदास' हे नाव आले.

प्रभु रामचंद्र हेच रामदासांचे गुरू. नाशिकजवळ टाकळी येथे गुहेत बारा वर्षे त्यांनी तपश्चरण केले. नंतर बारा वर्षे तीर्थाटन. काशी, प्रयाग, रामेश्वर, गोकर्ण, पैठण इत्यादि देशांतील परिस्थिति त्यांना पाहवेना. कृष्णातीरी चाफळ खोऱ्यात वास्तव्य केले. मारुतीची मंदिरे आणि मठ यांची स्थापना केली. शिष्यसंघटना करून प्रभावी उपदेशास व कार्यास ते लागले. वास्तविक तीर्थयात्रा संपताच महाराष्ट्राचे 'आनंदभुवन' कसे व्हावे, याचे स्वप्न त्यांनी चित्रिले होते. 'अस्मानी सुलतानी', 'परचक्रनिरूपण' या प्रकरणाची निर्मिती तीर्थयात्रेतील अनुभवातूनच झालेली असावी. 'करुणाष्टके' रामदासांची भावार्तता प्रकट करतात. 'मनोबोधां'त ('मनाच्या श्लोकां'त) मनाला 'भक्तिपंथेचि जावे' म्हणून रामदासांनी सांगितले असले, तरी त्यात खूप उपयुक्त असा व्यावहारिक उपदेशच आहे. रामदासांची पदे, भारुडे, स्तोत्रे, डफगाणी अशी विविध आणि विपुल रचना आहे. पण 'दासबोध' हा त्यांचा खरा ग्रंथराज होय. या ग्रंथात गुरुशिष्यसंवादाच्या रूपाने भक्तिमार्ग विशद करून सांगितला असला, अथवा वैराग्याचे लक्षण सांगून अध्यात्मनिरूपण केले असले, तरी लो. टिळक म्हणतात त्याप्रमाणे 'कर्मयोगाचे खरे महत्त्व' या ग्रंथांत पहावयास मिळते. रामदासांना भागवतधर्मापेक्षा महाराष्ट्रधर्माची खरी चिंता होती. 'दासबोधांतील सौंदर्य इतर कोणत्याही प्रकारचे असण्यापेक्षा विचारांचे आहे. या विचारापाठीमागे प्रचीतीचे बळ आहे. (रामदासांच्या) काव्याचे बाह्य स्वरूप निरलंकृत,अनेक वेळा ओबडधोबड, बहुधा लालित्यविरोधी, पण दणगट असे असते... सरळ, सकस, समर्थ, सुदृढ म्हणून सुरूप अशी विचारसंपदा त्या काव्यात भरली आहे. जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोण नाजूक, हळवा किंवा स्वप्नाळू मुळीच नसून तो सकस, वास्तववादी, युयुत्सू असा आहे... कवीपेक्षा प्रेषिताचीच त्यांची भूमिका होती, समाजोद्धार हे त्यांचे ध्येय आहे.' (रा. श्री. जोग.) रामदासस्वामी इतर भागवत-संतांहून या बाबतीत निराळे वाटतात.

**बोधरूपा** – ज्ञानरूपा. **पडळें** – पडदे. **भीममूर्ती** – प्रचंड, भयंकर आकृति. **मुरडीव** – वळलेले. **शुंडादंड** – सोंड. **चौदा विद्या** – ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद हे चार वेद, शिक्षाकल्पादिक सहा वेदांगे, पद्मादि पुराणें, धर्मशास्त्र, न्यायशास्त्र आणि मीमांसा, मिळून अशा चौदा विद्या. **गोसावी** – स्वामी.

**कीळ** – प्रभा, तेज, कांती. **संदट** – ठसठशीत, वळकट. **हेमकट** – सोन्याचे लहान कडे. **मळपे** – हाले. **दोंद** – मोठे पोट. **नागबंद** – नागांचा करदोटा. **क्षुद्र घंटिका** – वारीक घागऱ्या. **व्याळपर्यंत** – कमरेत असलेल्या सर्पापर्यंत. **भरोवरी** – गर्दी. **उपांग** – गाण्याचे इतर, अवांतर साहित्य. **वोले** – प्रसन्न होते.

प्रस्तुत ओव्या दासबोध, दशक १, समास २-मधील आहेत. हे गणेशाचे वर्णन सांकेतिक किंवा आध्यात्मिक नसून अगदी वास्तव म्हणूनच प्राचीन मराठी वाङमयात वेगळे उठून दिसते.

## वामनपंडित ( इ. स. १६०६–१६९५ )

रामदास, तुकाराम आणि वामनपंडित हे तीन समकालीन कवी. तिघेही शिवकालांतलेच; पण तिघांच्या वृत्ती वेगळ्या म्हणून साहित्यस्वरूपही वेगळे.

वामनपंडितांचे अध्ययन काशीक्षेत्री झाले आणि पांडित्याबद्दल त्यांनी विजयपत्रेहि मिळविली. आत्मज्ञानाच्या तळमळीने त्यांनी मलयपर्वतावर तपश्चर्या केली. एके दिवशी त्यांना श्रीसच्चिदानंदांचे यतिवेषात दर्शन झाले. ब्रह्मप्राप्तीनंतर लोकोद्धारासाठी वामनपंडितांनी ग्रंथलेखनास प्रारंभ केला.

वामनपंडितांची आवडती कथा म्हणजे कृष्णाची. नामसुधा, वनसुधा, इत्यादि पंचसुधा किंवा भामाविलास, राधाविलास, राधाभुजंग इत्यादि भागवती प्रकरणे यांत वामनपंडितांचे पांडित्य, कलाभक्ती आणि रसिकवृत्तीही चांगलीच प्रकट होते. सीतास्वयंवर, रामजन्म, भरतभाव, अहिल्योद्धार इत्यादि रामायणी प्रकरणेही त्यांनी लिहिली. 'या खंडकाव्यात्मक नूतन काव्यप्रकाराने व विविधाक्षरगणवृत्तात्मक सगुण सालंकार रचनेने (वामनपंडितांनी) कलाकवीच्या एका नवीन संप्रदायास जन्म दिला,' असा प्रा. द. सी. पंगु यांचा अभिप्राय आहे. पण वामनपंडित खरे ओळखले जातात, ते 'यथार्थदीपिका'कार म्हणूनच !

'यथार्थदीपिका' ही बावीस हजार ओव्यांची गीताटीका आहे. ज्ञानोत्तर भक्ती हाच गीतेचा यथार्थ आहे, हे सिद्ध करून दाखविण्याच्या हेतूने वामनपंडितांनी 'यथार्थदीपिके'ची रचना केली. या टीकेला काव्याची किंचिदपि

कांती नाही. स्वतः ग्रंथकाराचा तो हेतूही नाही. वामनपंडितांची तर्कशुद्ध दृष्टी, बिनतोड युक्तिवादाचे सामर्थ्य, सडेतोड आणि निर्भय प्रतिपादन, स्मृति-पुराणे आणि शास्त्रे यांचा गाढ व्यासंग आणि त्यांतून आलेला प्रचंड आत्मविश्वास यांमुळे या ग्रंथाचे स्वरूप शुद्ध शास्त्रीय झालेले आहे.

प्रस्तुत वेचा वामनपंडितांच्या 'भरतभाव' या स्फुट प्रकरणांतील आहे. त्यांतील जीवनसंघर्ष, मनोभावदर्शन आणि नाट्यपूर्ण संवाद अभ्यसनीय आहेत. वृत्तवैचित्र्यही लक्षणीय आहे.

या वेच्याची वृत्ते – ( आकडे श्लोकक्रमांक दर्शवितात. )

**मालिनी** – १, २, ८. **उपजाती** – ३ ते ६, १७, २१. **भुजंगप्रयात** – ७, १२, १३, १८, २३. **घनाक्षरी** – ९. **शालिनी** – १०. **रथोद्धता** – ११. **स्वागता** – १४, १५, १९. **द्रुतविलंबित** – १६. **वसंततिलका** – २०, २२. **इंद्रवज्रा** – २४.

**महामतीचा** – थोर अंतःकरणाचा भरत, त्याचा. **जडस्वरूपे** – जड म्हणजे पाषाणादि, त्यांप्रमाणे आहे स्वरूप जिचे, म्हणजे जिला अंतःकरणच नाही असा भावार्थ. संबोधनाचे रूप. **आधी** – मनःक्लेश. **सर्वजगदभिराम** – सर्व जगामध्ये अथवा सर्व जगाला सुंदर वाटतो असा. **सानुरागे** – प्रेमाने, आवडीने. **राम-पाद-निज-लाभ-रताते** – रामाच्या चरणाची आपणाला प्राप्ति करून घेण्यासाठी उत्सुक, मन लावून बसलेला, त्याला (भरताला). **मृगांकाननाते** – मृग आहे अंक म्हणजे हरिणाचे चिन्ह ज्याला आहे तो मृगांक, म्हणजे चंद्र. त्याप्रमाणे ज्याचे आनन म्हणजे मुख आहे असा रामचंद्र, त्याला.

## मोरोपंत ( इ. स. १६५१–१७१६ )

पन्हाळगडावर (जन्मग्रामी) मोरोपंतांच्या वयाची पहिली चोवीस वर्षे गेली. त्या अवधीत केशव पाध्ये आणि तात्या पाध्ये यांच्याकडे संस्कृत विद्येचे अध्ययन. लहानपणापासून कविता करण्याचा छंद. पुढे बारामतीस बाबूजी नाईक यांच्या घरी पुराणिक म्हणून राहिले. आयुष्याच्या अखेरीस त्यांची काशीयात्रा झाली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
सा हि अनुक्रमांक ... दि: ...

मोरोपंत हे नीटनेटके, मोठे टापटिपीचे, साक्षेपी कवि आहेत. त्यांची काव्यनिर्मितीची शक्ति उदंड आहे. संपूर्ण 'महाभारता'चे आर्या-वृत्तात मराठीत त्यांनी रूपांतर केले. मंत्ररामायण, मंत्रभागवत, यांसारखी विविध चमत्कृतिपूर्ण आणि विस्तृत रचना त्यांनी केली. कृष्णविजय, हरिवंश, अष्टोत्तरशत ( पण उपलब्ध ९०–च ) रामायणे, स्तोत्रे, स्फुट आख्याने ( हरिश्चंद्राख्यान, प्रल्हादविजय इ. सारखी) संतस्तवन, काशीयात्रा इ. कितीतरी प्रकरणे पंतांनी लिहिली आहेत. सीतागीत, सावित्रीगीत, रुक्मिणीगीत यांसारखी सुबोध आणि प्रासादिक, गानसुलभ, सुंदर गीतकथाहि पंतांनी गुंफिल्या. आर्या-केकावली, श्लोककेकावली किंवा संशयरत्नमाला यांतून पंतांचे परमेश्वरभेटीस आसावलेले मन स्पष्ट दिसून येते. 'कांही तरावया गावे !' हाच पंतांच्या काव्यनिर्मितीचा हेतू होता. पंत हे अखेरपर्यंत मुमुक्षूच राहिले. काव्यनिर्मिती ही त्यांची परमेश्वर-पूजा होती ती त्यांनी मनोभावे आणि एकनिष्ठपणे व षोडपोपचारे केली, हा प्रा. रा. श्री. जोग यांचा अभिप्राय पटण्यासारखा आहे.

'आर्याभारत' हें पंतांचे खरे भूषण; मोठे मोलाचे आणि तोलाचे. पंतांच्या परिपक्व वयात रचिलेला हा ग्रंथ. यातील कथानुकूल असे संक्षेप-विस्ताराचे धोरण; शृंगार, वीर, करुण अद्‌भुत आणि हास्य हे रस; हंसकाकीयकथा, कचदेवयानीकथा, यांतील सरसरमणीयता; प्रौढ, शुद्ध आणि रसाळ वाणी हीं पाहता 'आर्याभारता'ची काव्यदृष्टया गुणवत्ता मनावर चांगलीच ठसते. पंतांचा यमकाचा हव्यास आणि दीर्घसमासयोजना यांनी येणारी औचित्यहानी, ग्राम्यता किंवा श्रुतिकटुता इत्यादि दोषमाला समर्थनीय नसली, तरी त्यामुळे मोरोपंतांच्या काव्यगुणाचा पूर्ण लोप होत नाही. मयूरपंतांची आर्या ही मराठी काव्याचे भूषणच ठरेल.

प्रस्तुत वेचा मोरोपंतांच्या 'आर्याभारता'तील 'कर्णपर्वा'तील आहे. या कथाप्रसंगातील कर्णाची झालेली करुणास्पद अवस्था, त्याची धर्मयुद्धाची मागणी, त्याच्या वर्मी भिडणारे कृष्णाचे वाक्ताडन अतिशय जिवंत आणि परिणामकारक आहे. मोरोपंतांचे यमकचातुर्य या मर्मभेदक वाग्द्वंद्वाला अतिशय उपकारक ठरले आहे.

**कटक** – सैन्य. **हत-स्वार्थ** – ज्यांचा स्वार्थ (जयाची आशा) नष्ट झाला

आहे अशी. **पुरुहूत** – इंद्र. **द्विज-शाप** – कर्ण मृगयेस गेला असता त्याच्या बाणाने एका ब्राह्मणाची गाय मेली. तेव्हा त्या ब्राह्मणाने 'ऐन आणी-बाणीच्या प्रसंगी युद्धात पृथ्वी तुझ्या रथाचे चक्र गिळील,' असा कर्णाला शाप दिला होता. **रामास्त्र** – परशुरामाने शिकविलेली अस्त्रविद्या प्रसंगी उपयोगी पडणार नाही, असा शाप असलेली. **परिरंभण** – आलिंगन. **स्यंदन** – रथ. **नक्र** – मगर. **नुगळी** – न उगळी. **सद्रसना** – सज्जनांची जिव्हा. **वृष** – कर्ण. **कुचला** – विषारी बी. **परासु** – गतप्राण. **अनळसाचा** – (अन् + अळसाचा) ज्याला आळस नाही अशाचा. **गर-घर-वर** – शंकर.

## केशवसुत (इ. स. १८६६–१९०५)

कृष्णाजी केशव दामले यांचा जन्म मालगुंड (रत्नागिरी) येथे झाला. प्राथामिक शिक्षण कोकणात व इंग्रजी शिक्षण पुणे येथे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये. प्रवेश-परीक्षा १८८९-मध्ये उत्तीर्ण. नोकरी शिक्षकाची. त्या निमित्ताने मुंबई, भडगाव, फैजपूर, धारवाड या ठिकाणी फिरावे लागले. ७ नोव्हेंबर १९०५ साली हुबळी येथे प्लेगने मृत्यू. मृत्यूपूर्वी धारवाडला सरकारी शाळेत शिक्षक होते. 'काव्यरत्नावली'कार नारायण नरसिंह फडणीस यांनी त्यांना 'केशवसुत' हे टोपणनाव दिले.

केशवसुतांचा कवितारचनाकाल १८८५ ते १९०५. त्यांच्या कवितांचा संग्रह त्यांच्या मृत्यूनंतर बारा वर्षांनी म्हणजे इ. स. १९१७ साली सुप्रसिद्ध कादंबरीकार हरी नारायण आपटे यांनी प्रसिद्ध केला.

केशवसुतांच्या पूर्वीच्या काव्याचे बाह्य स्वरूप लक्षात घेतले तर प्रदीर्घ रचना, अक्षरगण-वृत्ते, जुने ओवी-अभंगादि मराठी छंद, वर्णनपर किंवा कथनात्मक रचना हे विशेष नजरेत भरतात. त्या कवितेचे अंतरंग धार्मिक, पौराणिक व ऐतिहासिक विषय, आणि भक्ति, अध्यात्म अथवा नीतिशिक्षण यांनी भरलेले दिसते. कवितेचे स्वरूप व तिचे प्रयोजन यांसंबंधी केशवसुतांनी विशेष विचार केलेला दिसतो. कवितेत कोणते विषय यावे यासंबंधीही त्यांना कांही म्हणावयाचे आहे, व ते त्यांनी आपल्या कवितांतून मांडलेले आहे. केशवसुतांनी स्फुट व भावगीतात्मक रचनेला सुरवात करून

काव्यासाठी मात्रावृत्ते व जाती यांचा सरसहा उपयोग सुरू केला. जुने धार्मिक व पौराणिक विषय टाकून त्यांनी आपल्या कवितेत लौकिक व सामाजिक विषयांना प्राधान्य दिले. आत्माविष्काराचे किंवा कवीच्या मनातील भावनांचे अथवा विचारांचे साधन म्हणून ते काव्याचा उपयोग करू लागले. काव्याच्या स्वरूपात केशवसुतांनी हा बदल घडवून आणल्यामुळे आधुनिक कवितेचे अध्वर्युपद त्यांच्याकडे यावे, हे साहजिकच होते. केशवसुतांनी सुरू केलेल्या परंपरेचे मराठीत सर्वत्र अनुकरण झाले. अर्थात कोणी रूढीविरुद्ध विचार प्रकट केले, कोणी प्रेमविषयक कविता लिहिली, कोणी शिशुगीतांचा प्रवाह आणून सोडला, तर कोणी सृष्टिविषयक कविता लिहिली. प्रत्येक कवीच्या काव्याचे वैशिष्टय जरी निराळे राहिले, तरी परंपरा केशवसुतांचीच.

## नवा शिपाई

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या सामाजिक तत्त्वत्रयीपैकी बंधता वा विश्वबंधुत्व हा या कवितेचा विषय आहे. ही कविता लिहिताना केशवसुतांच्या डोळ्यांपुढे सबंध जग असावे. केशवसुतांच्या 'तुतारी' या कवितेशी या कवितेची तुलना करताना एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते. ती ही की, तुतारीत आवाहन अगर उपदेश करण्याची भूमिका आहे, तर प्रस्तुत कवितेत स्वत:च्या व्यापक व उदात्त भूमिकेचा आविष्कार आहे. समाजात सुधारणा करावयास प्रवृत्त झालेल्या प्रगत विचाराच्या माणसाची भूमिका येथे केशवसुतांनी घेतलेली आहे. शिपाईगडी या अर्थानेच 'शिपाई' हा शब्द केशवसुतांनी येथे योजिला असावा. रणांगणावरील युद्ध त्यांना अभिप्रेत नाही. नव्या विचाराकरिता, नवीन युग निर्माण करण्याकरता प्राणपणाने झगडणारा वीर हीच केशवसुतांची कल्पना आहे. हा शिपाई धर्माच्या पलीकडे आहे. तो विश्वाचा नागरिक आहे. तो स्वाभिमानी आहे. त्याच्या 'मी'मध्ये सर्व जगाचा अंतर्भाव आहे. ज्या भविष्यकालात शांतीचे साम्राज्य स्थापन व्हावयाचे आहे, त्या काळाचा किंवा युगाचा प्रेषित म्हणजे हा 'नवा शिपाई' होय.

"चार कडव्यांच्या या कवितेत पहिल्यामध्ये संकुचित भेदांचा निषेध,

दुसऱ्यात विश्वबंधुत्वाचा प्रत्यक्ष पुरस्कार, तिसऱ्यात ‘स्व’ किंवा ‘मी’ याचा व्यापक आणि समतेवर अधिष्ठित असा अर्थ, आणि चौथ्या कडव्यात कलहकारणाची मीमांसा आणि शांतीच्या साम्राज्याची घोषणा इतका अर्थ आला आहे. प्रथम साकीच्या चार ओळी, मग फटक्याच्या तीन ओळींचा अंतरा आणि पुन: दोन साकीच्या ओळी अशी ही रचना आहे.” (रा. श्री. जोग · केशवसुत, पृ. ९२.)

चौथ्या कडव्यात मानवाच्या जीवनास हलव्याची उपमा देऊन आपले म्हणणे विशद करण्याचा प्रयत्न केशवसुतांनी केला आहे. त्यामुळे रचना थोडी क्लिष्ट झालेली आहे. भिन्न संस्कृती, भिन्न धर्म किंवा पंथ वा जाती नाहीशी झाल्याशिवाय शांतीचे साम्राज्य स्थापन होणार नाही, ही केशवसुतांची भावना आहे. सावलीत असणारी गोजिरी मुले व उन्हात दिसणारी गोड फुले यांचा अर्थ असावयाला पाहिजे तितका स्पष्ट नाही; संदिग्ध वाटतो. पण कवितेला जे महत्त्व आले आहे, ते त्यातील प्रतिपाद्य विचारामुळे.

**आम्ही कोण ?**

केशवसुतांची कवी व काव्य यांविषयी ही सर्वांत उत्कृष्ट अशी कविता आहे. ही सर्वत्र उद्‌धृत केली जाते. त्याचप्रमाणे तिचा उल्लेखही अनेकदा केला जातो. शेक्सपियर-पद्धतीच्या सुनीतात केशवसुतांनी कवितेची प्रसादपूर्ण, सफाईची रचना केलेली आहे. आव्हान स्वीकारल्याच्या मन:स्थितीत ही कविता लिहिलेली दिसते. एक प्रकारची उद्दाम वृत्ती अथवा कवीच्या अधिकाराबद्दल वा त्याच्या महत्त्वाबद्दल वाटणारा दुर्दम्य विश्वास या कवितेत प्रकट झालेला आहे. प्रसाद व ओज या काव्यगुणांचा इतका संगम इतरत्र क्वचितच आढळतो. अर्थगौरव, रचनासौष्ठव आणि सुश्लिष्ट शब्दरचना हे आणखी काही गुण सांगता येतील. या कवितेत काव्यविषयक महत्त्वाचे विचार आलेले आहेत. सबंध जग हा कवीच्या काव्याचा विषय आहे. काव्यरचना म्हणजे कवीचा खेळ. कवीला इतरांपेक्षा प्रतिभाशक्तीचे देणे अधिक लाभलेले असते. म्हणून तो देवाचा लाडका आहे. कवीचा हस्तस्पर्श लाभला, म्हणजे साध्या गोष्टीलाही सौंदर्य प्राप्त होत असते. शून्यातून वसाहती निर्माण करण्याची शक्ती कवीच्याच ठिकाणी असते. हे कवीविषयक विचार या कवितेत आढळतात.

कवितेच्या पहिल्या बारा ओळींत कवीचे अनन्यसाधारण महत्त्व सांगून शेवटच्या दोन ओळींत सुनीताला योग्य असा पण अत्युक्तिपूर्ण निष्कर्ष काढला आहे.

## नारायण वामन टिळक (१८६५ – १९१९)

रे. टिळक हे केशवसुतांपेक्षा वयाने एक वर्षाने मोठे होते. केशवसुतांच्या अगोदरच त्यांनी कवितालेखनाला सुरवात केलेली दिसून येते. केशवसुतांच्या 'तुतारी' कवितेप्रमाणे त्यांनी 'रणशिंग' व 'बोंबाबोंब' या कविता लिहिलेल्या असल्यामुळे केशवसुतांच्या विचारसरणीचे प्रतिबिंब त्यांच्या या पुढील काही कवितांत पडलेले आढळते. टिळक हे नव्या-जुन्या विचार-सरणीचे उद्गाते होते. किंबहुना, नव्या-जुन्याचा समन्वयही त्यांच्या कवितेत आढळून येतो.

टिळकांच्या स्फुट कवितांत काही काव्यविषयक, प्रेमविषयक, तात्त्विक, सृष्टिविषयक आहेत. स्फुट कविता लिहीत असतानाच काही प्रदीर्घ कविताही त्यांनी लिहिल्या आहेत. सुशीला, बापाचे अश्रू, वनवासी फूल ह्या त्यांच्या प्रदीर्घ कविता काव्यदृष्ट्या महत्त्वाच्या आहेत.

त्यांच्या कवितांत फुलांबद्दलचे व मुलांवरील प्रेम व्यक्त झाले आहे. इतके की, टिळकांना फुलामुलांचे कवी म्हणतात.

इ. स. १८९६ साली त्यांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. ख्रिस्ती लोकांनी मराठी हीच आपली धर्मभाषा समजली पाहिजे, असे त्यांचे मत असल्यामुळे महाराष्ट्रातील ख्रिस्ती लोकांची मातृभाषा मराठीच राहण्यास त्यांचे परिश्रम कारणीभूत झाले. 'स्मृतिचित्रे' लिहिणाऱ्या लक्ष्मीबाई टिळक ह्या त्यांच्या पत्नी होत. त्यांच्या कवितेत ख्रिस्ती धर्मप्रेमाचा आविष्कार झालेला आहे, हे त्यांच्या भजन-संग्रह व अभंगांजली या काव्यांवरून स्पष्ट होते. मात्र ख्रिस्ती धर्माच्या स्वीकाराने ते मराठी भाषेस किंवा स्वदेश-प्रेमास मुकले, नाहीत हा त्यांचा विशेष होय. ते स्वदेशप्रेमी होते; मात्र तसे राजनिष्ठही होते.

**पाखरा, येशिल का परतून ?**

हे एक उत्कृष्ट भावगीत आहे. बऱ्याच कालाचा सहवास घडल्यानंतर दूर उडून गेलेल्या पाखराबद्दलच्या आठवणी हा या भावगीताचा विषय आहे. ते पाखरू पुन्हा परत यावे व आपणास भेटावे यासंबंधी कवीच्या अन्त:करणात निर्माण झालेल्या आर्त भावनांचा आविष्कार मोठ्या प्रभावी-पणाने प्रस्तुत भावगीतात झालेला आढळून येतो. उत्कट भावना, गेयता व त्रुटित रचना हे भावगीताचे प्रधान गुण या कवितेत आहेत. आचार्य प्र. के. अत्रे यांनी लिहिलेले 'परिटा येशिल कधि परतून ?' हे विडंबन प्रस्तुत कवितेचेच होय. 'मला विसरलास तरी चालेल; पण या अफाट जगात तू जपून रहा' या पाखराला उद्देशून लिहिलेल्या कवीच्या उद्‌गारांवरून कवीच्या हळुवार अन्त:करणाची कल्पना येते. बालकवी अहमदनगरला टिळकांच्या घरी काही दिवस राहत होते. त्या थोड्या दिवसांत त्यांनी टिळकांना फार लळा लावला. ते निघून गेल्यामुळे टिळकांना जे विरहाचे दु:ख झाले त्या दु:खावेगात प्रस्तुत कविता जन्मास आली असावी (अशी कल्पना केली) तर प्रस्तुत भावगीताला एक निराळेच महत्त्व प्राप्त होते.

## विनायक (१८७२ ते १९०९)

यांचे पूर्ण नाव विनायक जनार्दन करंदीकर. इ. स. १९२० साली यांच्या स्फुट कवितांचा संग्रह 'विनायकांची कविता' या नावाने प्रसिद्ध झालेला आहे. काव्यरचनाकाल सुमारे १८९० ते १९०९. वास्तव्य खानदेश.

विनायक कवींचे काव्य म्हटले की पद्मिनी, संयोगिता, तारा, कृष्णाकुमारी, पन्ना, अहल्या या ऐतिहासिक स्त्री-रत्नांच्या त्यांनी गायिलेल्या रसाळ काव्यकथा डोळ्यांपुढे येतात. ऐतिहासिक स्त्रियांबद्दल त्यांना वाटत असलेला आदर या कवितांवरून दिसून येतो. त्यांच्या कवितेचे सामान्यपणाने दोन भाग पडतात. एक स्फुट कवितांचा व दुसरा दीर्घ कथनात्मक कवितांचा. विनायक हे मनाने भूतकालातच वावरणारे कवी होते. त्यामुळे ऐतिहासिक व्यक्ती व प्रसंग हेच त्यांच्या कवितेचे विषय झाले. पारतंत्र्यात सापडलेल्या हिंदमातेच्या दैन्यदर्शनाने त्यांच्या कवितेत निराशेचे सूर उमटलेले आहेत. पण 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावि काल' ही त्यांच्या कविमनाची धारणा होती. 'हत-

भागिनी ', ' यापुढे ', ' कवी आणि पोपट ' या कवितांतून त्यांची पारतंत्र्य–विषयक तळमळीची भावना प्रकट झालेली आहे. ' विनायकाची रसरसलेली कोठे प्रतिभा ती । गावया मर्दांची छाती ' या शब्दांत माधव जूलियन यांनी विनायकांच्या प्रतिभेबद्दलचे आपले मत व्यक्त केले आहे.

**कृष्णाकुमारी**

ही एक दीर्घ कथनात्मक कविता आहे. पाल्हाळ न करता, चरित्रातील वर्णनीय घटनेला एकदम हात घालण्याची व कविता परिणामकारक करण्याची त्यांची हातोटी प्रस्तुत कवितेतील पहिल्या दोन ओळी वाचल्या की चांगलीच ध्यानात येते. वर्णनीय व्यक्तीच्या चरित्रातील महत्त्वाच्या घटना, तिच्या चरित्रापासून घ्यावयाचा बोध रसाळ, सुबोध परंतु प्रौढ भाषेत विनायकांनी सांगितला आहे. कविता कंटाळवाणी होण्याइतकी ती लांबवावयाची नाही, हा त्यांचा कटाक्षही पाळला गेला आहे. मधूनमधून समर्पक व काव्यमय उपमा-रूपके यांच्या योगे वर्णनाला उठाव येऊन कविता काव्यमय झाली आहे.

## गोविंदाग्रज (इ. स. १८८५–१९१९)

यांचे नाव राम गणेश गडकरी. त्यांनी ' बालकराम ' या टोपणनावाने विनोदी लेखन, ' गोविंदाग्रज ' या नावाने कवितालेखन व राम गणेश गडकरी या नावाने नाटच-लेखन केले आहे. वाङमयाच्या तिन्ही क्षेत्रांतील त्यांची कामगिरी चिरस्मरणीय झालेली आहे. गुजरातेत नवसारी येथे त्यांचा जन्म झाला. शालेय शिक्षण कर्जत व पुणे येथे. फर्गसन कॉलेजात एक वर्ष शिक्षण घेतल्यानंतर ते किर्लोस्कर नाटक-मंडळीत नट-मंडळीचे शिक्षक म्हणून राहिले. ' गडकरी मास्तर ' या नावाने ते संबोधिले जात. याच ठिकाणी त्यांचा श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांशी परिचय झाला. त्यांना ते आपले गुरु मानीत. ' प्रेम-संन्यास ', ' पुण्यप्रभाव ', ' एकच प्याला ', ' भावबंधन ', ' राजसंन्यास ', ही नाटके, ' वेडयांचा बाजार ' हे प्रहसन, ' संपूर्ण बाळकराम ' हा विनोदी लेखांचा संग्रह व ' वाग्वैजयंती ' हा कवितासंग्रह ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. कोणत्याही दोन गोष्टींत साम्य व विरोध पाहण्याची विलक्षण शक्ती त्यांच्या

ठिकाणी असल्यामुळे विनोदी लेखनाइतकेच नाट्य आणि कवितालेखनही त्यांनी यशस्वी रितीने केलेले आहे.

गोविंदाग्रज स्वत:ला केशवसुतांचे 'सच्चे चेले' असे म्हणवून घेत. 'केशवसुत कसले मेले? केशवसुत गातच वसले' हे त्यांचे उद्‌गार याला साक्ष. गुरूला लाभली नाही अशी कल्पकतेची देणगी शिष्याला लाभल्यामुळे गोविंदाग्रजांच्या काव्याला एक विलक्षण आकर्षण प्राप्त झाले आहे. आधुनिक कविता साधारण वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य प्रथम त्यांनी केले.

**अवेळी ओरडणाऱ्या कोकिळेस**

फर्गसन कॉलेजमध्ये शिकत असताना वर्गात प्राध्यापकांच्या तासाच्या वेळी गोविंदाग्रजांनी ही कविता लिहिली. गोविंदाग्रजांच्या कवितेत पुष्कळ वेळी निराशेचे सूर उमटलेले दिसतात. मनातील उदासीनता दूर करून अंत:करणाला समाधानाचे नि स्वास्थ्याचे सुख द्यावे, ही अपेक्षा ते कोकिळेकडून करतात. हातात संसाराची माती झालेली असून मनातील आशा मनालाच खात आहेत, सोबतीला निष्प्रेमाची शेज असून सभोवतालची दुनिया भयाण झालेली आहे, वगैरे विषण्ण विचार कवीच्या मनात निर्माण झालेले आहेत. त्यामुळे मन निराश बनलेले आहे. अशा मनाला रमविण्यासाठी कोकिळेला, अवेळी का होईना, कवी गात राहण्याचे आवाहन करीत आहे.

साधारणत: कोकिळा ही सकाळी वा दुपारी गात असते. मध्यरात्रीच्या वेळी ती ओरडत नाही. पण रात्र जसजशी वाढत जाते, तसतशी कवीच्या मनांतील उदासीनताही वाढत असते. ही उदासीनता मनाला विषण्ण करीत असते. ती विषण्णता दूर करून मनाला समता प्राप्त करून देण्यासाठी गायन गाणे हे ईश्वराचे एक अलौकिक काम आहे. या भावनेने कोकिळा अवेळी गात असूनही तिला तसेच गात राहण्याचा आग्रह कवी करीत आहे. कवीच्या अंत:करणातील निराशेच्या अगर उदासीनतेच्या सुरांचे प्रतिबिंब प्रस्तुत कवितेत पडलेले आहे. त्या दृष्टीने प्रस्तुत कवितेचे महत्त्व विशेष आहे. सभोवती आनंदाचे वातावरण असेल, तर कोणालाही गाण्याची स्फूर्ती होईल, व त्या गाण्याने तो आनंदाच्या वातावरणात स्वाभाविकच भर घालील. पण जेथे उदासीनता आहे, तिचे निर्मूलन गाण्याने करणे हे एक अलौकिक कार्य

आहे. परमेश्वर ते कोकिळेच्या रूपाने करतो, अशी कवीच्या मनाची धारणा आहे.

## बालकवी (इ. स. १८९०–१९१८)

संपूर्ण नाव त्र्यंबक बापूजी ठोमरे. जन्म खानदेशात धरणगाव येथे झाला. "ठोमरे बालकवी होता; पण कवीपेक्षाही तो बाल अधिक होता," या शब्दांत लक्ष्मीबाई टिळकांनी स्मृतिचित्रांत बालकवींचे चित्र रेखाटले आहे. बालकवींचे जीवन व काव्य यांचे सार या शब्दांत आले आहे. बालकवीचे शिक्षण इंग्रजी चौथी-पाचवीपर्यंत झाले होते. डॉ. कर्नल कीर्तिकर यांच्या हस्ते जळगाव येथे इ. स. १९०७ साली भरलेल्या कवि-संमेलनात 'बालकवी' ही पदवी देण्यात आली. पुढे रे. टिळक यांच्या घरी बालकवी रहावयाला होते. त्यांनी त्यांना मुलासारखे वाढविले. इ. स. १९१८–च्या एप्रिलमध्ये वयाच्या अवघ्या २८–व्या वर्षी रेल्वे अपघातात त्यांचा हृदयद्रावक अंत झाला.

प्रेम हा जसा गोविंदाग्रजांच्या काव्याचा प्रमुख स्थायी भाव, तसा निसर्ग-वर्णन हा बालकवींच्या काव्याचा उल्लेखनीय विशेष होय. निसर्गातील सौंदर्याचे त्यांना विलक्षण आकर्षण होते. 'सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबुनि घ्यावे' ही त्यांची लालसा त्यांना सौंदर्याबद्दल वाटणारे वेड प्रकट करणारी आहे. 'कवीच झाला सृष्टी, सारी सृष्टी झाली कवि' इतके ते सृष्टीशी समरस होत असत.

बालकवींची शैली प्रसन्न व लालित्यपूर्ण आहे. निसर्गाला खेळगडी समजून त्याच्याशी तल्लीन होण्याची त्यांची वृत्ती 'अरुण', 'संध्यारजनी', 'निर्झर या कवितांवरून दिसून येते.

### पारवा

बालकवींच्या ज्या अनेक अपूर्ण कविता आहेत, त्यांपैकी प्रस्तुत कविता आहे. या कवितेत औदासीन्याचे वातावरण पसरलेले आढळते. शब्दांतून जिवंत चित्रे निर्माण करण्याचे सामर्थ्य बालकवींच्या ठिकाणी होते, याचे प्रत्यंतर या कवितेवरून येते. जणू चित्रेच शब्दरूप घेऊन आलेली आहेत, हे

'पारवा' व 'खेड्यातील रात्र' या कविता वाचताना अनुभवास येते. जुन्या व त्यातूनही पडक्या धर्मशाळेच्या कौलांवर बसून एक पारवा उदासीनतेने भरलेले असे गीत आळवीत आहे. बाहेर उडण्याबागडण्याची त्याला मुळीच हौस नाही. जगातील आनंद, गौरव, मान यांच्याकडे त्याने जणू पाठ फिरविलेली आहे! कवी आपली व पारव्याची शेवटी तुलना करीत आहे. सारेच औदासीन्य! कवितेची सुरवातच मोठी कारुण्यपूर्ण आहे. 'झोप सौख्यानंदात मानवाची, पुरी क्षणही कोठून टिकायाची ?" ही कवीची खरी खंत आहे.

**खेड्यातील रात्र**

खेड्यातील रात्रीचे हे एक उदासवाणे चित्र आहे. उजाड माळ, बुरुजाच्या पडक्या भिंती, ओसाड देऊळ, वडाचा पार व तेथील घनदाट अंधार हे वर्णन उदासीन अशा वातावरणनिर्मितीस पोषकच आहे. नुसते उदासीनच नव्हे, तर भयानकता त्याला साथ देत राहिली आहे. भालूचे ओरडणे, वाऱ्याचे भुतांसारखे बडबडणे, खोल डोहावरील गडद काळ्या अशा छाया, रात्री भडकून उठणाऱ्या ज्वाळा वगैरे प्रसंगांची व समुचित शब्दांची योजना कवीच्या वातावरण-निर्मितीच्या अपार सामर्थ्याची खात्री पटवून देतात.

## चंद्रशेखर ( १८७१ – १९३७ )

यांचे संपूर्ण नाव चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे. काव्यरचनाकाल १८९५ ते १९३७. वास्तव्य बडोदे. त्यांच्या स्फुट कवितांचा संग्रह 'चंद्रिका' या नावाने दाजी नागेश आपटे यांच्या प्रयत्नांनी कर्नाटक प्रेसने भारत-गौरव-ग्रंथ-मालेचे १०६-वे पुष्प म्हणून प्रसिद्ध केला. त्यानंतर सयाजीराव गायकवाडांचे आपल्या संस्थानातील या महाकवीकडे लक्ष गेले, व महाराजांनी आपल्या दरबारी 'राजकवि' म्हणून त्यांची नेमणूक केली.

जुन्या अक्षरगणवृत्तांतून काव्यरचना. जुन्या पंडिती युगाचे नवीन कालातील ते प्रतिनिधी होते. त्यांची कविता भावगीतानुकूल नव्हती. मात्रावृत्तांचा वापर त्यांनी क्वचित केला. पण फटका, साकी, आर्या, व चंद्रकांत यांसारख्या रूढ रचनाप्रकारांपलीकडे ते गेले नाहीत. त्यांनी कवितांतून आत्मकथन केले

नाही. किंबहुना, स्वतःच्या जीवनाचे स्पष्ट चित्र वाङ्मयात चित्रित करणे त्यांना नामंजूर होते. नाही म्हणायला त्यांच्या 'गोदागौरव' या त्रुटित खंड-काव्यात व 'कवितारति' या कवितेत त्यांच्या जीवनातील काही वैयक्तिक उल्लेख आलेले आहेत. विषय अन्य वाङ्मयातून मिळाला, तर त्याची ठाकठीक सजावट करावयास त्यांची प्रतिभा समर्थ होती. त्यामुळेच 'काम्र हो चमत्कार' हे रूपांतर सरस उतरले आहे. त्यांची भाषा प्रौढ, पण प्रसादपूर्ण होती. प्रौढता राखूनही प्रसाद साधण्याचे कार्य त्यांच्या समकालीनांत अन्य कोणाला साधले नाही. प्रसादाबरोबर माधुर्य हेही त्यांच्या कवितेचे एक उल्लेखनीय वैशिष्ट्य आहे. चंद्रशेखर हे कवितेचे निःसीम आणि निरपेक्ष उपासक होते. स्वतःची आर्थिक परिस्थिती बिकट, आपल्या कवितेचे चाहते बेताचे व आपली जुनी कविता लोकप्रिय होण्याची चिन्हे कमी, असे असूनही सतत चाळीस वर्षे त्यांनी काव्याची उपासना केली. श्री. वि. द. घाटे यांनी आपल्या 'वृद्ध कवी' या लेखात चंद्रशेखरांचे शब्दचित्र मोठ्या समरसतेने रेखाटले आहे.

**कवितारति**

ज्या दोन कवितांतून चंद्रशेखरांनी आपल्या चरित्रासंबंधीचे वैयक्तिक उल्लेख मोठ्या कळकळीने केले आहेत, त्यांपैकी ही एक कविता आहे. कवितेविषयी आपल्याला असलेली आसक्ती आणि तिच्या प्राप्तीसाठी आपण केलेली तपस्या यांचे हृदयंगम वर्णन या कवितेत आढळते. हे वर्णन केवळ औपचारिक अगर आलंकारिक नाही. काव्यशक्ती ही एक दैवी शक्ती आहे, अशी त्यांच्या मनाची धारणा होती. ही शक्ती साध्य करण्यासाठी चंद्र-शेखरांनी जे कष्ट केले, त्यांचे वर्णन या कवितेत त्यांनी मोठ्या समरसतेने केले आहे. भाषेचे सौष्ठव व विचारांचे सौंदर्य त्यांच्या कवितेत ओतप्रोत भरलेले आहे, याचे प्रत्यंतर त्यांच्या या कवितेवरून येते.

## भा. रा. तांबे (१८७४ – १९४१)

ग्वाल्हेर संस्थानातील मुगावली येथे जन्म. इ. स. १८९३ साली अलाहाबाद विश्वविद्यालयाची प्रवेशपरीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. व्यवसाय

अध्यापन, संस्थानी कारभारी, शिक्षणाधिकारी. वास्तव्य ग्वाल्हेर, इन्दूर, देवास, प्रतापगढ. इ. स. १८९० पासून काव्यलेखनास सुरवात. पण प्रथम १९२० साली त्यांच्या कवितांचा पहिला संग्रह प्रा. वा. गो. मायदेव यांनी संपादन करून प्रसिद्ध केल्यावरच महाराष्ट्रातील रसिकांना त्यांच्या कवितांचा परिचय होऊ शकला. दुसरा काव्यसंग्रह इ. स. १९२७ साली कवी अज्ञातवासी यांनी संपादून प्रसिद्ध केला. पुढे इ. स. १९३५ साली माधव जूलियन् ऊर्फ प्रा. माधवराव पटवर्धन यांनी त्यांच्या सर्व उपलब्ध कवितांचे संपादन केले. महाराष्ट्रातील तीन ख्यातनाम कवींनी त्यांच्या कविता संपादून प्रसिद्ध केल्या हे तांबे यांचे मोठेच भाग्य म्हटले पाहिजे. १९२६ साली इंदूर येथे व १९३४ साली कोल्हापूरला झालेल्या कविसंमेलनाचे ते अध्यक्ष होते.

इ. स. १९२० मध्ये तांबे यांचा काव्यसंग्रह महाराष्ट्रातील रसिकांना उपलब्ध झाला, व त्यानंतरच त्यांच्या प्रतिभेचा एकेक पैलू रसिकांच्या नजरेत भरू लागला. त्यांची कविता प्रामुख्याने भावगीतात्मक स्वरूपाची होती. भावगीताबरोबरच त्यांनी नाटचगीतेही लिहिलेली आहेत. त्यांच्या या गीतांची विशेषतः त्यांच्या रचनेची व राग आणि ताल कवितेच्या मूर्धस्थानी देण्याच्या पद्धतीची छाप पुढील कवींच्यावर पडलेली आढळून येते. किंबहुना, तांबे यांच्या कवितेने १९२०-नंतरच्या कवितेला नवीन वळण लावले, हे कोणाही टीकाकाराला मान्य करावे लागेल.

तांबे यांच्या कवितेचे एकंदर स्वरूप सौंदर्यवादी आहे. स्वतः सौंदर्य पाहणे व इतरांस दाखवून देणे हे कवीचे कार्य तांबे यांनी केलेले आहे.

२०७८

### निजल्या तान्ह्यावरी

मातेला आपल्या निजलेल्या तान्ह्या मुलाबद्दल वाटणारी वात्सल्याची व कौतुकाची भावना येथे प्रकट झालेली आहे. तिसऱ्या कडव्यात तिन्हीं जगांची जी जननी (म्हणजे परमेश्वर), तिची या मातेसारखीच स्नेहल दृष्टी अखिल मानवजातीवर असेल काय, हा गूढ प्रश्न कवीने विचारला आहे. साम्य शोधून काढण्याच्या चिंतनातून असा प्रश्न निर्माण व्हावा, हे साहजिकच नव्हे काय? या संदर्भात Coventry Patmore यांच्या 'Toys' या कवितेचा शेवट पाहण्यासारखा आहे.

पुण्याहून कोणी रसिकाने तांबे यांना लिहिले की, आम्ही तुम्हांला आमचे रसाळ कवी म्हणून ओळखतो, तर एखादी गोड कविता लिहून पाठवा. तेव्हा तांबे *यांनी प्रस्तुत कविता लिहून पाठविली असा या कवितेचा इतिहास आहे.*

इ. स. १९२०–२१ साली तांबे यांच्या मनात मरणाचे विचार आलेले त्यांच्या त्या काळात लिहिलेल्या कवितांतून व्यक्त झालेले आढळून येतात, त्याचप्रमाणे इ. स. १९२७-३४ या कालखंडात प्रतिभा आपल्याला सोडून जात चालली आहे, हेही विचार त्यांच्या मनात प्रबल झालेले दिसून येतात. प्रस्तुत कवितेत याच विचारांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. ही कविता १९३३ साली लिहिलेली आहे. प्रतिभा आपल्याला सोडून गेली अगर जात आहे हे पाहण्याचे दुर्भाग्य कलावंताच्या वाट्याला त्याच्या जिवंतपणी यावे, ही घटना मरणाहूनही दुःखद अशीच होय. तांबे यांची कविता फार उशिराने महाराष्ट्रातील रसिकापर्यंत पोहोचली.

प्रस्तुत कवितेतील 'मधु' हा शब्द काव्याचे प्रतीक म्हणून योजण्यात आला आहे. शेवटच्या कडव्यात आयुष्य उताराला लागले असून इहलोकापेक्षा— परलोकाकडे नेत्र लागलेले आहेत, ही आपल्या मन ची झालेली स्थिती मोठ्या आर्ततेने त्यांनी येथे प्रकट केली आहे.

## माधव ( इ. स. १८९२–१९५८ )

यांचे नाव माधव केशव काटदरे. कस्टम खात्यात सरकारी नोकर होते. इ. स. १९१०– पासून काव्यरचनेस सुरवात. सरकारी नोकर असल्यामुळे पेशवाई नष्ट होऊन ब्रिटिशांचा अंमल हिन्दुस्थानात सुरू झाला. तेव्हा १८१८– पुढील राष्ट्रीय विषयावर कविता लिहावयाची नाही, असे बंधन त्यांनी आपणहून आपल्यावर लादून घेतले होते. त्यामुळे त्यांची राष्ट्रीय कविता इ. स. १८१८– च्या पूर्वीच्या काळातील आहे. म्हणजे तिचे स्वरूप ऐतिहासिकच आहे. मराठीतील निर्भेळ ऐतिहासिक कवितेचे ते एका दृष्टीने जनकच होते. इतिहासविषयक ग्रंथांचे वाचन हा त्यांचा एक छन्द होता. ऐतिहासिक कविता लिहिण्यासाठी त्यांनी ती-ती स्थळे प्रत्यक्ष पाहिली.

आणि त्यांचा खरा इतिहास अभ्यसून कवितेच्या रचनेला आवश्यक ती ऐतिहासिक माहिती त्यांनी कष्टाने मिळविली. ऐतिहासिक कवितेप्रमाणेच कोकणातील निसर्गसौंदर्यासंबंधीही त्यांनी कविता लिहिलेल्या आहेत. 'हिरवे तळकोकण' ही त्यांची कविता कोकणातील निसर्गाचे यथातथ्य वर्णन करणारी आहे. मराठ्यांच्या इतिहासातील स्फूर्तिप्रद व काव्याला अनुकूल असे प्रसंग वेचून त्यांनी 'शाहीरगिरी' केलेली आहे. ऐतिहासिक कविता लिहिताना त्यांचे लक्ष प्रचारापेक्षा कलात्मक रचनेकडे असे. शुद्ध भाषा, नादमधुर रचना, अन्वर्थक शब्दयोजना व अलंकारांचा संयमित वापर ही त्यांच्या काव्यरचनेची वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील. त्यांची बहुतेक कविता वस्तुनिष्ठ आहे. मात्र निर्मिती ही अभ्यास व निरीक्षण यांतून झाल्यामुळे उत्कटता हा काव्यगुण त्यांच्या कवितांत प्रायः नाही. त्यांच्या प्रतिभेला अद्भुताचे आकर्षण आहे, हे त्यांच्या 'मोऱ्यांची मोहना', 'संत तुकाराम' इत्यादि कवितांवरून दिसून येते.

**जिवबादादा बक्षी**

ही कविता पेशव्यांचे एक सरदार जिवबादादा बक्षी याच्या आयुष्यातील एका मर्दुमकीच्या प्रसंगावर लिहिलेली आहे. रणांगणातून मराठ्यांचा जरिपटका पळवून घेऊन जाणाऱ्या शत्रुपक्षांतील एका सैनिकाचा पाठलाग करून व त्याच्याशी दोन हात खेळून जरिपटका हस्तगत करण्याची व तो शनिवारवाड्यावर लावण्याची मर्दुमकी जिवबादादा बक्षीने केली, असा स्फूर्तिदायक प्रसंग कवीने कवितेसाठी निवडिला आहे.

## माधव जूलियन (इ. स. १८९४–१९३९)

यांचे संपूर्ण नाव माधव त्र्यंबक पटवर्धन. बालपण व शिक्षण प्रामुख्याने बडोदे येथे. इंग्रजी व पर्शियन घेऊन मुंबई विद्यापीठाची एम्. ए. ही पदवी मिळविल्यावर फर्गसन कॉलेज, पुणे व राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे ते फारसी व इंग्रजी भाषांचे प्राध्यापक झाले. छंदःशास्त्रविषयक प्रबंधाबद्दल मुंबई विद्यापीठाची डी. लिट्. ही पदवी त्यांनी मिळविली. काव्यरचना : विरहतरंग – एक प्रेमकाव्य; सुधारक – सामाजिक उपहासपर खंडकाव्य;

गज्जलांजली, स्वप्नरंजन–स्फुट कवितांचा संग्रह, तुटलेले दुवे – सुनीतांचा संग्रह करून सांगितलेली कथा, नकुलालंकार – वाङमयीन झब्बूशाहीवरील उपहासपर काव्य. रविकिरण-मंडळाचे एक प्रमुख सभासद.

रविकिरणमंडळाची स्थापना पुणे येथे १९२३ साली झाली. माधवराव पटवर्धन (माधव जूलियन), यशवन्त, गिरीश हेच मंडळाचे खरे कार्यकारी सदस्य ठरले. मंडळाच्या स्थापनेनंतर पहिल्या दहाबारा वर्षांत मराठी साहित्याची मंडळाने जी सेवा केली, तिला तोड सापडणार नाही. मंडळाचे काव्यग्रंथ आजपर्यंत २५-च्या वर झाले आहेत. त्यांत खंडकाव्यापासून सुनीतापर्यंत काव्याचे विविध प्रकार आलेले आहेत. या मंडळाची कामगिरी प्राधान्याने काव्यविषयकच झाली. आणि तीही महत्त्वाची झाली.

मंडळाच्या सदस्यात माधव जूलियन यांची कामगिरी इतर सदस्यांपेक्षा अधिक वैशिष्टयपूर्ण झाली. त्यांच्या कवितेची स्फूर्तिस्थाने फारसी, इंग्रजी व गुजराती या भाषांतच पहावी लागतील. काव्य हे आत्मप्रकटीकरणाचे मुख्य साधन म्हणून माधवरावांनी वापरले. आपले यौवनांतील बरेचसे काव्य माधवरावांनी गज्जलांमधून लिहिले. कविजनांस न लाभणारी बुद्धीची तीव्रता जशी माधव जूलियनांच्या ठिकाणी होती तशीच पंडितास साधारणपणे न लाभणारी भावनाशीलताही त्यांच्या ठिकाणी होती. त्यामुळे पांडित्याचे व भावनेचे विलक्षण मिश्रण त्यांच्या कवितेत झालेले आढळते. सर्व प्रकारच्या रसिकांचे समाधान करू शकेल, अशीच माधव जूलियन यांची कविता आहे. काव्यात प्रत्यक्षपणाने त्यांनी भर घातलीच, पण गज्जलासारखा एक काव्यप्रकारही मराठीत त्यांनी दृढमूल केला. समस्त जातिरचनेस व्यवस्था लावून देण्याचे मोठेच कार्य त्यांनी ' छन्दोरचना ' या ग्रंथात केलेले आहे; अगदी सुरवातीला त्यांच्या कवितेत फारसी शब्दांचा भरणा फार असे, पण पुढे भाषाशुद्धीची मोहीम त्यांनी सुरू केल्यावर फारसी शब्द खड्यां-सारखे निवडून काढून त्यांनी त्यांच्या जागी शुद्ध मराठी शब्द घालण्याचे परिष्करण केले.

**प्रेम होईना तुझ्याने**

ही कविता एका संस्थेला उद्देशून माधवरावांनी लिहिली आहे, हे फारच

थोड्यांना माहीत असेल. पण ही माहिती बाजूला ठेवून प्रस्तुत प्रेमगीत वाचले, तरी या कवितेची गोडी कमी होणार नाही. प्रेमगीतातून पूर्वीच्या काळापेक्षा अधिक मोकळेपणाने नि डौलदारपणाने विविध भावना चित्रित करण्याचे कवीचे सामर्थ्य प्रस्तुत कवितेवरून सहज कळण्यासारखे आहे.

## रावबहादूर ठोसर

माधव जूलियन यांच्या सुधारक या उपहासपर खंडकाव्यातून ' रावबहादूर ठोसर ' हे व्यक्तिचित्रण उद्धृत केले आहे. जगातील व्यवहार व जीवन यांवरची प्रखर टीका या खंडकाव्यात वाचावयास मिळते. यात मानवी स्वभावाचे सूक्ष्म ज्ञान आणि मनोविश्लेषण आढळते. ' सुधारक ' वाचताना कवीच्या सर्वस्पर्शी निरीक्षणाचा प्रत्यय येतो. रावबहादूर ठोसर या व्यक्तिचित्रात चळवळ, सुधारणा, परोपकार या साऱ्यांतच आढळून येणारा त्यांचा ' नेमस्तपणा ' दिसून येतो. कवीचे स्वभावलेखनसामर्थ्य कौतुक करण्यासारखे आहे.

सुधारक हे खंडकाव्य अठरा अध्यायांचे दीर्घकाव्य आहे. केशवसुतांनी ' तुतारी'साठी योजिलेल्या पंचचरणी धावत्या वृत्ताचा येथे उपयोग केला आहे. सुधारकात सामाजिक घटना आणि वाङमय यांचे उल्लेख आणि जुन्या वाङमयातील शेकडो निर्देश हे कवीची मार्मिकता व बुद्धिसामर्थ्य प्रकट करणारे आहेत. ' सुधारक ' हे एक समाजचित्र असून त्यात मुख्य कथेच्या अनुषंगाने अनेक व्यक्ती, संस्था व सामाजिक रूढी यांचे केलेले दोषदर्शन मोठे बोचक, रोचक व बोधप्रद आहे.

## यशवन्त ( जन्म १८९९ )

यांचे नाव यशवन्त दिनकर पेंढरकर. रविकिरण मंडळाचे सतत चाळीस वर्षे, आजतागायत काव्यलेखन करणारे एक प्रमुख सदस्य. महाराष्ट्रराज्य-स्थापनेच्या सुमुहूर्तावर महाराष्ट्र-सरकारने ' महाराष्ट्रकवी ' अशी पदवी व आजीव वेतन देऊन यशवन्तांच्या काव्यलेखनाचा यथोचित गौरव केला आहे.

सातारा जिल्ह्यातील चाफळ या गावी जन्म. शालेय शिक्षण चाफळ, कऱ्हाड व सांगली येथे झाले. स्कूल फायनलची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर पुणे

येथे शिक्षणखात्यात नोकरी. इ. स. १९४० साली नोकरीतून ते निवृत्त झाले. त्याच साली त्यांना बडोदे संस्थानचे राजकविपद प्राप्त झाले. कविता-लेखनास १९२०-पासून सुरवात. १९२१ साली बडोदे येथे भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनात ‘देहाचा पूल’ ही राष्ट्रीय स्वरूपाची कविता खड्या सुरात गाऊन दाखविली व रसिकांचे लक्ष वेधून घेतले. त्याच बडोद्यात १९ वर्षांनंतर त्यांनी ‘राजकवि’ ही पदवी संपादन करावी, ही औचित्यपूर्ण घटना होय.

यशवन्तांनी जीवनात ज्या हालअपेष्टा व जी सुखदुःखे अनुभविली, त्यांचे उत्कट प्रतिबिंब त्यांच्या कवितेत पडलेले दिसून येते. त्या दृष्टीने त्यांची कविता मराठी जीवनाशी प्रामाणिक आहे. त्यांच्याइतकी विपुल व विविध काव्यरचना आधुनिक कवींत दुसऱ्या कोणाची नाही. यशोधन, भावमंथन, यशोगंध, यशोगिरी, ओजस्विनी, मोतीबाग, कमंडलू इत्यादि त्यांचे स्फुट-कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. जयमङ्गला, बन्दिशाळा, काव्यकिरीट ही त्यांची खंडकाव्ये. काव्यगायनाने ज्या कवींनी महाराष्ट्रातील रसिकांच्या मनाला भुरळ घातली व मराठी कविता सामान्य वाचकांपर्यंत आणून सोडली, त्या कवींत यशवन्तांचे स्थान अग्रभागी आहे.

## वन्दन तुज मायभूमि हे अखेरचे

‘बन्दिशाळा’ या खंडकाव्यातील संजीवच्या तोंडी घातलेले हे एक भावगीत आहे.

संजीव लढाईवर जाण्यासाठी निघत असून सैनिक घेऊन जाणारी बोट मायभूमीचा किनारा सोडण्याच्या बेतात आहे. वृकोदर वकिलांच्या कारवाईमुळे संजीवला बन्दिशाळेत ( Reformatory School ) जावे लागते. तेथून कालावधीने त्याची सुटका होते. पण बन्दिशाळेचा शिक्का लागल्यामुळे जीवनात ढासळलेली घडी त्याला बसविता येत नाही. आईची व त्याची फारकत होते. शेवटी तो सैन्यात भरती होण्याचे ठरवितो. मुंबईला घेऊन येणारी आगगाडी सुटताना आपली आई त्याला दुरून दिसते व तो ‘आई ! आई !’ असा हंबरडा फोडतो. दुसऱ्या दिवशी तो बोटीवर चढतो व हळूहळू मायभूमीचा किनारा दूर सरकतो. अशा वेळी तो मायभूमीला

अखेरचे वन्दन करून तिचा निरोप घेत असताना त्याच्या मनात ज्या भावना उचंबळून आल्या, त्यांचा आविष्कार प्रस्तुत गीतात झालेला आहे. कल्पना आणि भावना यांचा उत्कृष्ट संगम असलेल्या ज्या परिणामकारक कविता यशवन्तांनी लिहिल्या आहेत, त्यात या कवितेला प्रमुख स्थान आहे. भावगीते लिहिण्यात यशवन्तांचा हातखंडा आहे. प्रस्तुत काव्यातील भावगीतांना कथानकाची सुंदर पार्श्वभूमी मिळाल्यामुळे ती उठावदार झालेली आहेत. 'वन्दिशाळा या खंडकाव्याचे सौंदर्य त्यातील भावगीतांनी वृद्धिंगत केले आहे' या विधानाची सत्यता पटविण्याचे सामर्थ्य प्रस्तुत गीतात आहे, यांत संदेह नाही.

### गृहिणी मी; नच देवी

कवीच्या 'ओजस्विनी' या काव्यसंग्रहातील ही एक कविता आहे. प्रस्तुत कवितेची खुद्द कवीने विशद केलेली भूमिका पुढीलप्रमाणे आहे.

"स्त्रीजातीला fair sex ह्या विरुदाने भूषवून तिची पुरुषवर्गाकडून जपणूक केली जाते. समाजाच्या तळातला श्रमजीवी वर्गच फक्त याला अपवाद. बाकी जो-जो वरवरच्या वर्गात पहावे, तो-तो साधनसंपत्तीच्या प्रमाणात ती जपणूक स्पष्टपणे दृष्टोत्पत्तीस येते. 'अनाश्रया न शोभन्ते कविता वनिता लताः' हे सुभाषितही ह्या जपणुकीचेच काहीसे द्योतक असावे. पण ज्या दिवशी ह्या पुरुषी जपणुकीचा उबग येऊन महिलावर्ग जागृत होईल, त्या दिवशी त्याची भाषा अशी काहीशी राहील."

## अनिल (जन्म १९०१)

यांचे नाव आत्माराम रावजी देशपांडे. शिक्षण फर्गसन कॉलेज, पुणे. वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर काही वर्षे न्यायाधीशाची नोकरी. नंतर त्या वेळच्या मध्यप्रदेशात समाज-शिक्षण-खात्याचे उपप्रमुख व आता भारत सरकारच्या त्याच खात्याचे सल्लागार. इ. स. १९२२-पासून काव्यरचनेस सुरवात. स्फुट कवितांचा पहिला संग्रह 'फुलवात' १९३६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'प्रेम आणि जीवन' (१९३२) व भग्नमूर्ति

(१९४०) ही मुक्तच्छंदातील दोन खंडकाव्ये. 'निर्वासित चिनी मुलास' ही दीर्घ मुक्तच्छंदात्मक कविता १९४३ साली प्रसिद्ध झाली. 'पेर्तेव्हा' (१९४७) व 'सांगाती' (१९६२) हे स्फुट कवितांचे आणखी दोन काव्यसंग्रह.

मराठीतील मुक्तच्छंदाच्या प्रवर्तनाचे कार्य त्यांनी केले, हे त्यांचे एक उल्लेखनीय वैशिष्टच होय. अनिल हे रविकिरणमंडळाचे समकालीन कवी असले तरी प्रतिभा व प्रवृत्ती या दोन्ही गोष्टींत त्यांचे निराळेपण जाणवते. 'फुलवात' या संग्रहातील बरीचशी कविता आत्मलक्षी व किंचित गूढ आहे. पण 'पेर्तेव्हा'मधील त्यांचा दृष्टिकोण समाजनिष्ठ बनलेला दिसतो

**पेर्तेव्हा**

ही कविता मुक्तच्छंदातील आहे.

'पेर्तेव्हा' हे एका पक्ष्याचे नाव आहे. या पक्ष्याचे इंग्रजी नाव 'कॉमन हॉक कुकू' किंवा 'ब्रेन फीव्हर बर्ड'. हिंदुस्थानात हा पक्षी सार्वत्रिक आहे. ह्याचा आवाज पावसाळ्याच्या सुरवातीस विशेषेकरून ऐकू येतो. मृगाच्या पावसात याला कंठ फुटतो, अशी समजूत आहे. ह्या पक्ष्याच्या आवाजात शेतकऱ्यांना 'पेरते व्हा,' हे शब्द ऐकू येतात. ह्या पक्ष्याचा शब्द ऐकल्याशिवाय शेतकरी पेरणी धरीत नाहीत. ह्या पक्ष्याची हाक स्पष्ट असते व तो लागोपाठ पाचसहा वेळा ती हाक देत असतो. प्रस्तुत कवितेत "भिऊ, भिऊ, भिऊ" ... ते 'पेरते व्हा' येथपर्यंत ह्या पक्ष्याच्या हाकेशी साम्य असलेले शब्द बुद्ध्या योजिले आहेत. कोकणात याला 'पावश्या' म्हणतात.

## केशवकुमार (१८९८)

यांचे नाव प्रल्हाद केशव अत्रे. शिक्षणशास्त्रातील बी. टी. व टी. डी. (लंडन) या उच्च पदव्या संपादन करून अध्यापनाच्या व्यवसायाला त्यांनी सुरुवात केली. पुणे येथील कँप एज्युकेशन सोसायटीचे ते प्राचार्य होते. गोविंदाग्रजांच्या सान्निध्यात त्यांच्या प्रतिभाशक्तीचा विकास झालेला आहे. गोविंदाग्रजांची कल्पकता व बालकवींचे भाषालालित्य यांचे आकर्षण वाटणाऱ्या तरुण कवींत केशवकुमारांचे स्थान प्रमुख समजावे लागेल. गडकरी-

संप्रदायाचे एक प्रमुख प्रतिनिधी म्हणून आज ते सर्वपरिचित आहेत. सुरवातीला काव्याच्या प्रांतात व त्यानंतर नाट्यवाङ्मय व विनोदी लेखन यांत हे सांप्रदायिकत्व त्यांनी प्रकट केलेले दिसून येते. शिवाय अत्रे हे गोविंदाग्रजांना गुरुस्थानी मानतात.

आज आचार्य अत्रे यांचे नाव नाटककार व 'दैनिक मराठा' या पत्राचे संपादक म्हणून लोकांच्या डोळ्यांपुढे आहे. पण शिक्षणशास्त्रज्ञ व लोकप्रिय विनोदी पटकथांचे लेखक म्हणूनही त्यांचे यश उल्लेखनीय आहे.

केशवकुमारांची आरंभीची जी गंभीर काव्यरचना आहे, ती त्यांच्या 'गीतगंगा' या संग्रहात संकलित करण्यात आली आहे. यात बऱ्याच प्रेम-कविता आहेत. सुनीत-रचनाही त्यांनी विपुल केलेली आहे. पण पुढे-पुढे काव्य-लेखनापेक्षा काव्याचे विडंबनच त्यांनी केले. या स्वरूपाची कविता 'झेंडूची फुले' या संग्रहात प्रसिद्ध झालेली आहे. काव्यरचनेमधील हास्यास्पद लकबांची व विषयांचीही टर या कवितांतून अत्रे यांनी विनोदी पद्धतीने उडविलेली असल्याचे दिसून येईल. लेखनातील व रचनेचे दोष दाखविणे हा 'झेंडूच्या फुलां'तील कवितांचा प्रधान हेतू होता; व तो यशस्वी झाला यात शंका नाही.

**प्रेमाचा गुलकंद**

या कवितेत विडंबन किंवा उपहास नसून केवळ विनोद करण्यासाठीच कवीने ही कविता लिहिलेली आहे.

अत्रे यांची कांही विडंबने लेखनदोषांच्या दर्शनापेक्षा केवळ विनोदार्थ लिहिली गेली आहेत. मूळ कवितेची थट्टा करण्याचा हेतू नसतानाही विनोदार्थ तिचा उपयोग केल्याची उदाहरणे म्हणजे 'कादरखां', 'पाहुणे', 'परिटास' या कविता होत. 'प्रेमाचा गुलकंद' या कवितेत कवीने शुद्ध विनोदच योजिलेला आहे.

## अनंत काणेकर (जन्म १९०५)

कवी, लघुनिबंधकार, कथालेखक, प्रवासवर्णनांचे लेखक, नाटककार या विविध नात्यांनी काणेकरांनी केलेली वाङ्मयसेवा जितकी विपुल तितकीच ती विविध आहे. शिक्षण बी. ए., एल्‌एल्. बी. पुरोगामी विचारसरणीचे कवी व

लेखक म्हणून त्यांची कीर्ती सुरवातीपासूनच झाली. कवितालेखनाने त्यांच्या साहित्यसेवेला सुरवात झाली. 'चांदरात आणि इतर कविता' हा स्फुट कवितांचा संग्रह १९३३ साली प्रसिद्ध झाला. प्रेमगीते, विडंबनगीते, निसर्गवर्णन-पर कविता कोळ्यांच्या जीवनावरील गीते, समाजवादी विचारसरणी प्रकट करणाऱ्या कविता अशा विविध कविता या संग्रहात आहेत. १९३३–१९३५ या काळात 'नाट्यमन्वंतर' या नाट्यसंस्थेच्या द्वारे मराठी रंगभूमीवर मन्वंतर करण्याच्या प्रयत्नात ते सहभागी होते. 'चित्रा', 'आशा' इत्यादि साप्ताहिकांचे संपादक या नात्याने वृत्तपत्रीय क्षेत्रातही ते चमकले आहेत. गेली कित्येक वर्षे ते सिद्धार्थ कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक आहेत. त्यांचे व्यक्तित्व प्रसन्न असून ते एक लोकप्रिय वक्ते व लेखक आहेत.

**चांदरात**

काणेकरांचे निसर्गातील सौंदर्याचे सूक्ष्म निरीक्षण व कल्पकता यांचा सुंदर संगम या कवितेत झालेला आहे. चांदण्याचा कविमनावर झालेला परिणाम वर्णन करताना कल्पकता, चित्रणसौंदर्य आणि कवीचे व्यक्तित्व यांचे येथे सुंदर मिश्रण झालेले आढळून येते.

**'बेगमेच्या विरहगीता'ला शिवाजीचे उत्तर**

या कवितेतील विनोद मार्मिक आहे. 'बेगमेचे विरहगीत' ही मूळ कविता माधव जूलियन यांची. त्या कवितेला काणेकरांनी लिहिलेले हे उत्तर. कवितेत फारसी शब्दांचा पुष्कळ वापर करण्याकडे सुरवातीला माधवरावांची प्रवृत्ती होती. (शेवटी-शेवटी फारसी शब्द खड्यांसारखे निवडून त्यांच्या जागी शुद्ध मराठी शब्द घालण्याची शुद्धीकरणाची मोहीम त्यांनी सुरू केली, ही गोष्ट निराळी.) त्या फारसी शब्दांना उद्देशून काणेकरांच्या उत्तरातील टीकेचा रोख आहे.

## बा. भ. बोरकर (जन्म इ. स. १९१०)

बालकृष्ण भगवंत बोरकर हे एक प्रमुख गोमंतकीय कवी. कवितालेखन इ. स. १९३०-पासून. सुरवातीला गोमंतकातच अध्ययन व लेखन. तेथील

राजकीय चळवळीत भाग. त्यामुळे गोवा सोडून मुंबई–पुणे येथे वास्तव्य. सध्या ते आकाशवाणीच्या पणजी येथील केंद्रात अधिकाराच्या जागेवर आहेत. पोर्तुगीज, कोकणी व मराठी यांचा अभ्यास. घरात संतवाणीचा, विशेषत: ज्ञानदेवीचा संस्कार त्यांच्या मनावर झाल्यामुळे त्यांचे कविमन बहरून यावे, हे साहजिकच. या साऱ्यांचा परिणाम त्यांच्या कवितेवर व त्यातील शब्दकळेवर झालेला आहे. त्यांनी मधूनमधून कोकणीतूनही काव्यरचना केली असली, तरी त्यांची बहुसंख्य उत्स्फूर्त कविता मराठीतूनच आहे. 'प्रतिभा', 'जीवन-संगीत', 'दूधसागर' 'आनन्दभैरवी', आणि 'बोरकरांची कविता' (संपूर्ण) हे त्यांचे कवितासंग्रह. 'मावळता चंद्र' व 'भावीण' या त्यांच्या कादंबऱ्या व 'कागदी होड्या' हा त्यांचा लघुनिबंधसंग्रह.

रविकिरणमंडळानंतरच्या पिढीतील कवींत बोरकरांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे.

## माझ्या गोव्याच्या भूमीत

गोव्यातील निसर्गसौंदर्याचे कविप्रतिभेने चोखंदळपणाने टिपलेले हे वर्णन आहे. " प्रत्येक भूभागातील निसर्गाला स्वत:चा असा Persona असतोच. तो खऱ्या निसर्गकवीला स्वभावत:च जाणवतो आणि त्याच्या कवितेत आपोआप प्रकट होतो. त्या दृष्टीने कोणतीही अस्सल निसर्गकविता प्रादेशिकच असते. बालकवींच्या निसर्गकवितेला प्रादेशिक असे म्हटले गेले नाही, आणि माझ्या कवितेला मात्र ते विशेषण लावले गेले, याचे कारण चटकन डोळ्यात भरणारा गोव्याच्या निसर्गातला वेगळेपणा आणि नवाई हे असावे, असे मला वाटते. " (बा. भ. बोरकर).

## कुसुमाग्रज ( जन्म इ. स. १९१२ )

यांचे नाव विष्णु वामन शिरवाडकर. वास्तव्य नाशिक येथे. तेथेच त्यांचे शालेय व कॉलेजचे शिक्षण झाले. त्यानंतर काही वर्षे चित्रपटव्यवसायात व 'प्रभात', 'धनुर्धारी', 'सारथी', वगैरे नियतकालिकांत उपसंपादक म्हणून वृत्तपत्रलेखन व्यवसायात काढली. कॉलेजात असतानाच काव्यलेखनास सुरवात. 'जीवनलहरी' हे त्यांचे काव्याचे पहिले पुस्तक. नाशिक येथील 'ध्रुवमंडळ'

या कवी व काव्यरसिक यांनी स्थापन केलेल्या संस्थेच्या विद्यमाने ते प्रसिद्ध झाले. इ. स. १९३६-पासून कवी म्हणून विशेष प्रसिद्धीस आले. 'विशाखा' (१९४२) या पहिल्या स्फुट कवितांच्या संग्रहाने त्याच्या कीर्तीत विशेष भर घातली. 'विशाखे'नंतर 'किनारा', 'मराठी माती', 'स्वगत' व 'हिमरेषा' हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. कथा, कादंबरी, नाटक, लघुनिबंध, गद्यकाव्य हे वाङ्मयप्रकारही त्यांनी यशस्वी रितीने लिहिलेले असून त्यांत त्यांच्या कल्पनारम्य प्रतिभेचा मनोज्ञ विलास आढळून येतो. काव्याइतकेच ते गद्य समर्थतेने लिहितात. लेखन हा त्यांचा व्यवसाय झाला आहे. 'दूरचे दिवे', 'दुसरा पेशवा', 'कौंतेय', 'राजमुकुट', 'ऑथेल्लो' वगैरे नाटके, 'वैष्णव', 'जान्हवी', 'कल्पनेच्या तीरावर' या कादंबऱ्या, 'फुलवाली' हा लघुकथा-संग्रह, 'आहे आणि नाही' हा लघुनिबंधसंग्रह व 'समिधा' हा गद्यकाव्याचा संग्रह हे त्यांचे प्रकाशित साहित्य.

कुसुमाग्रजांच्या कवितेची आविष्कारपद्धती स्वतंत्र आहे. उत्कट भावना-शीलता, तरल व भव्य अशी कल्पकता, ओजःपूर्ण भाषाशैली व पुरोगामी विचारधारा हे त्यांच्या कवितेचे उल्लेखनीय विशेष होत. त्यांच्या काव्यातील सामाजिक आशय केशवसुतांच्या परंपरेतीलच आहे. त्यांना पारतंत्र्य, गुलाम-गिरी, अन्याय, विषमता, दांभिकपणा यांच्याबद्दल त्वेषयुक्त चीड वाटते व ती तितक्याच आवेशपूर्ण शैलीने त्यांच्या कवितेत प्रकट झालेली आहे.

## देवाच्या दारी

"जुना धर्म, जुनी नीती, जुनी समाजरचना म्हणते, 'देवाला शरण चला. तो दयाधन आहे. सर्व दुःखांचा परिहार करण्यास तोच समर्थ आहे!' पण हा उपदेश भोंदूपणाचा नसला, तरी मूर्खपणाचा आहे, हे कुसुमाग्रजांना कळून चुकले आहे. मानवजातीने ज्या दिवशी दगडातून देव निर्माण करून त्याच्या-पुढे आपले डोके वाकविले, त्याच दिवशी तिने आपल्या प्रगतीच्या मार्गात एक अनुल्लंघनीय धोंड निर्माण करून घेतली. हा काल्पनिक देव दुर्बलांचा मित्र होऊ शकत नाही. तो सत्ताधाऱ्यांना आणि धनवंतांना मात्र साहाय्य करतो. या दृष्टीने 'देवाच्या दारी' या कवितेत कुसुमाग्रज देवाची जी संभावना करतात, ती यथार्थ वाटते...अनुभवांतील देव दगड ठरतो!

पण मनुष्य काही केल्या दगड होऊ शकत नाही. आपला उद्धार आपणच केला पाहिजे, याची जाणीव त्याला हळूहळू होऊ लागते. " (वि. स. खांडेकर)

या कवितेचे तीन विभाग आहेत. पहिल्या विभागात देवाबद्दलच्या पारंपरिक, श्रद्धायुक्त अशा कल्पना आहेत. दुसऱ्या विभागात देवाची उपहासात्मक संभावना केलेली आहे. आणि तिसऱ्या भागात देवाच्या अस्तित्वाबद्दलच शंका प्रकट करण्यात आली असून, मानवानेच पाषाणाला देवाचे रूप दिले, मानवाच्या भीरुतेतच देवासंबंधीच्या कल्पनेचे संगोपन झालेले आहे, याची जाणीव आहे. इतकेच नव्हे, तर मानव हाच आपल्या जीवनाचा खरा शिलेदार आहे, हा विचार प्रकट झाला आहे.

**ताजमहाल**

कुसुमाग्रजांच्या उत्तुंग कल्पनाशक्तीचा विलास जसा प्रस्तुत कवितेत आढळतो, त्याचप्रमाणे एका ऐतिहासिक प्रेमाची करुणरम्य कथाही या कवितेत वाचावयास मिळते. पहिल्या आठ कडव्यांत 'ताजमहाला'कडे कुसुमाग्रज सौंदर्यपूजक दृष्टीने पाहतात, तर शेवटच्या तीन कडव्यांत त्यांची दृष्टी सामाजिक बनते व देहलालसेची प्रीतीशी विसंगत असलेली भावना म्हणून ते उल्लेख करतात.

## बहिणाबाई (जन्म १८८० – १९५१)

यांचे नाव बहिणाबाई चौधरी. नाशिक येथील कवी सोपानदेव चौधरी यांच्या या मातोश्री. 'बहिणाईची गाणी' या नावाने त्यांच्या कवितांचा संग्रह त्यांच्या मृत्यूनंतर एक वर्षाने प्रसिद्ध झाला. खानदेशातील एका शेतकरी कुटुंबातील या स्त्रीने शिक्षणाचा गंध नसताही उत्स्फूर्त अशी लोकगीते अहिराणी भाषेत लिहून शेतकरी व सांसारिक जीवनातील आपले अनुभव ओवीछंदात व्यक्त केलेले आहेत.

"लक्ष्मीबाई टिळकांसारखाच बहिणाबाईचा जिव्हाळा जबर आहे. त्यांच्या शब्दाशब्दांतून प्रतिभा नुसती झिरपत आहे. असे सरस आणि सोज्ज्वल काव्य मराठी भाषेत फार थोडे आहे. जुन्यात चमकेल आणि नव्यात झळकेल, असे त्याचे तेज आहे ... त्यांच्या काव्याचा सर्व आविष्कार

सुभाषितांचा आहे. मराठी वाङमयात अमर होतील, अशी अनेक सुभाषिते जागोजाग त्यांच्या काव्यात विखुरलेली आढळतील.... मराठी मनाला मोहिनी घालील आणि स्तिमित करून टाकील, असा भाषेचा, विचाराचा आणि कल्पनेचा विलक्षण गोडवा त्यांच्या काव्यात शिगोशीग ओथंवलेला आहे" असे त्यांच्या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहिताना प्र. के. अत्रे यांनी म्हटले आहे.

**मोट हाकलतो एक**

**येहेर** – विहीर. **आडोप** – आडोळ, विहिरीच्या दोन्ही भिंतींवरील दोन मोठी लाकडे, त्याला कणा व चाक लावलेली असतात. **नाडा समदूर** – मोटेला लावलेले दोन दोर.

**लपे करमाची रेषा**

**रेखा** – रेषा. **गिऱ्हे** – ग्रह. **लाल** – मुलगे **पंचागन** – पंचांग. **कये** – कळे, कळते.

ऐन तारुण्यात सौभाग्य गमावलेल्या स्त्रीचे उद्‌गार हा प्रस्तुत कवितेचा विषय आहे. वैधव्याचे असे हृदयभेदक करुणकाव्य लिहिणाऱ्या कवयित्रीची प्रतिभा किती असामान्य असली पाहिजे!

## बा. सी. मर्ढेकर ( १९०९–१९५६ )

यांचे नाव बाळ सीताराम मर्ढेकर. मराठी कवितेला व समीक्षेलाही एक निराळे वळण लावण्याचे श्रेय यांचे. एक प्रयोगशील कवी व कादंबरीकार. शालेय शिक्षण फैजपूर-सावदे ( खानदेश ) व धुळे. उच्च शिक्षण पुणे, फर्गसन कॉलेजात. पदवी घेतल्यावर इंग्लंडला प्रयाण. फ्रेंच, इटालियन वगैरे भाषांचे अध्ययन. Arts & the Man या इंग्रजी ग्रंथाचे लेखन. विलायतेहून परत आल्यावर एल्फिन्स्टन व इस्माईल युसुफ या सरकारी कॉलेजात इंग्रजीचे प्राध्यापक. त्यानंतर भारतीय नभोवाणीवर वरिष्ठ अधि-कारी–अगदी मृत्यूपर्यन्त. 'शिशिरागम' हा मर्ढेकरांचा पहिला काव्यसंग्रह. त्यानंतर 'काही कविता' ( १९४७ ) व 'आणखी काही कविता'

( १९५१ ) हे काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. 'रात्रीचा दिवस' ( १९४२ ), 'तांबडी माती' ( १९४३ ) व 'पाणी' (१९४८) या त्यांच्या कादंबऱ्या. संज्ञा-प्रवाह वर्णन करण्याचा त्यांत त्यांनी प्रयत्न केलेला आहे. 'वाङमयीन महात्मता', 'सौंदर्य आणि साहित्य' हे त्यांचे साहित्यविवेचनात्मक ग्रंथ. समीक्षासाहित्यात या ग्रंथांनी टीकेची एक नवीन दृष्टी निर्माण केली, निराळे वळण लावण्यास मदतच केली. त्यांनी एकांकिका, संगीतिका, व नभोनाट्ये लिहिली आहेत.

जीवनाकडे बघण्याचा त्यांचा एक विशिष्ट असा दृष्टिकोण होता. ढोंगाचे वडेजाव माजवण्यात आले आहेत, जीवनात साफल्यापेक्षा वैफल्यच अधिक आहे, सौंदर्यापेक्षा मेसूरता, भीषणता, विषण्णताच अधिक आहे, अशी त्यांची कविवृत्ती होती. त्यांनी काव्यात नव्या उपमा, नवी प्रतीके, नव्या प्रतिमा वापरल्या आहेत. विचार, कल्पना व्यक्त करण्यासाठी त्यांनी इंग्रजी शब्दही काव्यात वापरले आहेत. लोकप्रियतेच्या मापाने त्यांनी कधीच लिहिले नाही. ते स्वयंकेंद्रित होते. काव्यातील सामर्थ्याला त्यांचा हा गुण कारणीभूत झाला असावा.

आधुनिक कविपंचकांपैकी फक्त बालकवी यांचीच कविता त्यांना आवडे. त्यांच्या काही कवितांची त्यांनी रसग्राही पद्धतीने चर्चा केलेली आहे. इ. स. १९५० साली महाराष्ट्रकवी यशवंत यांच्या अध्यक्षतेने मुंबईला झालेल्या मराठी साहित्यसंमेलनाच्या ३२–व्या अधिवेशनाचा एक पोटभाग म्हणून काव्यशाखा-संमेलनाचे अधिवेशन झाले. मर्ढेकर त्याचे अध्यक्ष होते. 'भावना-निष्ठ समताનतेची विचारसरणी' हा त्यांच्या भाषणाचा विषय होता. काव्यविषयक प्रश्नांचा त्यांचा अभ्यास कसा सखोल होता, हे या भाषणाने स्पष्ट होते.

**फलाटदादा, फलाटदादा**

रेल्वेच्या प्लॅटफॉर्मला मर्ढेकरांनी 'फलाटदादा' अशा ग्रामीण भाषेतील नावाने संबोधिले आहे. अचेतनावर सचेतनत्वाचा आरोप करून लिहिलेली ही एक कविता आहे. अगदी बालकवींच्या फुलराणीप्रमाण. फलाटाच्या दैनंदिन जीवनातील घडामोडींचे व विविध स्वरूपाच्या आगगाड्यांशी आलेल्या

त्याच्या संबंधांचे उपरोधपूर्ण व प्रसंगी अर्धविनोदी असे वर्णन हा प्रस्तुत कवितेचा विषय आहे. हीतील प्रतिमा व प्रतीके लक्षणीय आहेत. कवितांतून इंग्रजी शब्द वापरून वर्णन प्रत्ययकारी करण्याचे मर्ढेकरांचे सामर्थ्य येथे दिसून येते. फलाट हा प्रियकर व आगगाडी ही प्रेयसी असे कल्पून केलेले वर्णन रंजक वाटते. तो अबोल व उदासीन असल्यामुळे 'बोला वो तुमि' ही कवीने ध्रुवपदाच्या रूपाने पुन्हा-पुन्हा त्याला केलेली अजीजीची विनवणी निष्फल ठरते. तो अनेक दृष्टींनी 'मूकनायक' आहे. तो हसत नाही, रडतही नाही. अंतःकरणात लपवून ठेविलेली कितीतरी गुपिते उघड करण्याची त्याला उमखाही होत नाही. तो दुर्बळ, चैतन्यहीन आहे. सर्वस्वी मुखदुर्बल, गतिदुर्बल, व कर्तृत्वदुर्बल झालेल्या व्यक्तीचे हे प्रतीकात्मक वर्णन आहे. 'हिम्मत तुमची खरी पहावी' ही फलाटाची स्तुती उपरोधिक आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक ............ नों: दि: ............

REFBK-0014079

REFBK-0014079

## परिषद - प्रकाशने

‘ प्राज्ञ ’
परीक्षेसाठी

**साहित्य – चिंतामणी**

अरविंद मंगरूळकर
भीमराव कुलकर्णी

**साहित्य – प[illegible]**

कृ. ब. निकुम्ब
गो. म. कुलकर्णी

‘ प्रवेश ’
परीक्षेसाठी

**साहित्य – कलश**

वा. रा. ढवळे
व. दि. कुलकर्णी

**साहित्य – प्रासाद**

पां. कृ. सावळापूरकर
श्री. मा. कुलकर्णी
भीमराव कुलकर्णी

‘ प्रथमा ’
परीक्षेसाठी

**साहित्य – समीर**

श्री. के. क्षीरसागर
ग. स. शुक्ल
मो. रा. वाळंबे

## महाराष्ट्र - साहित्य - परिषद

*टिळक रोड, पुणे २*